# केशवसुतांची कविता

हस्तलिखितांची प्रतीनुसार आवृत्ती

[illegible] मुंबई

# केशवसुतांची कविता



(चित्रकार : आचरेकर)

कै. कृष्णाजी केशव दामले उपाख्य 'केशवसुत'

जन्म : ७ ऑक्टोबर १८६६] [मृत्यु : ७ नोव्हेंबर १९०५

# केशवसुतांची कविता

## हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**प्रथमावृत्ती :** ऑक्टोबर, १९६७
(केशवसुत जन्मशताब्दी समारोह समिती, मुंबई)

**पुनर्मुद्रण :** ऑक्टोबर, २००७

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रविंद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© **प्रकाशकाधीन**

**मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड रेल्वे स्टेशनजवळ,
नेताजी सुभाष मार्ग,
मुंबई ४०० ००४.

**किंमत :** रुपये २५०/-

# निवेदन

कविवर्य केशवसुत (कै. कृष्णाजी केशव दामले १८६६-१९०५) यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक मानले जाते व ते सार्थ आहे, कारण त्यांच्यापासूनच आधुनिक मराठी कविता आपल्या बदलत्या वैशिष्ट्यानिशी प्रगट होऊ लागली व केशवसुतांनंतरच्या गेल्या १०० वर्षांमध्ये त्या कवितेने स्वत:ची अशी एक उज्ज्वल परंपरा व समाजाभिमुख प्रतिमा निर्माण केली. केशवसुतांनंतरचे बालकवी, गोविंदाग्रज, रेव्हरंड टिळक असोत, किंवा त्यानंतरच्या रविकिरण मंडळ पंथाचे कवी असोत, मर्ढेकर, करंदीकर, कुसुमाग्रज, मुक्तिबोध, सुर्वे, चित्रे यांच्यासारखे मानवी जीवनाचे प्रगल्भ भाष्यकार कवी असोत; वा, भा.रा.तांबे, बोरकर, ना.घ.देशपांडे, अनिल, बापट, पाडगांवकर, महानोर यांच्यासारखे परंपरा आणि नवता यांचा सुरेख मेळ घालून अभिनव सौंदर्यवादी कविता लिहिणारे लोकप्रिय कवी असोत; गेल्या १०० वर्षांतील आधुनिक मराठी काव्यावर केशवसुतांच्या मानवतावादी, पुरोगामी, वैश्विक विचार व्यक्त करणाऱ्या, त्याबरोबरच गूढ रंजनात्मक (रोमँटिक) कवितेचा कमी अधिक प्रभाव असलेला जाणवतो. आजच्या घडीची मराठी कविता पूर्वसूरींच्या मळवाटेने चालत असतानाच स्वत:चे कालसापेक्ष संदर्भ, नवनवोन्मेषशाली रुप नाना परीने अभिव्यक्त करताना आढळते. या ‘ नवते ’चे मूळ १०० वर्षांपूर्वी कविवर्य केशवसुत यांनी लिहिलेल्या कवितेमध्ये आहे. त्यामुळे आधुनिक मराठी कविता व महाराष्ट्र केशवसुतांचे निरंतरचे ऋणी आहेत. मालगुंड या केशवसुतांच्या जन्मगावी कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे केशवसुतांचे जे भव्य व देखणे स्मारक उभारण्यात आले आहे, त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी केशवसुतांच्या मार्गावरुन चालणारे थोर कवी कुसुमाग्रज यांनी मालगुंड या त्यांच्या जन्मगावाला **‘ कवितेची राजधानी ’**, **‘ काव्यतीर्थ ’** असे संबोधून केशवसुतांचा कृतज्ञतापूर्वक स्मृतिजागर केल्याचे आपणा सर्वांनाच माहीत आहे.

याच कृतज्ञ भावनेतून महाराष्ट्र शासनाने १९६७ मध्ये केशवसुत जन्मशताब्दीच्या निमित्ताने **केशवसुतांची कविता** ही कविवर्यांच्या हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती प्रकाशित केली. त्या नंतरच्या प्रदीर्घ काळात ती आवृत्ती अनुपलब्ध झाली व तिच्या पुनर्मुद्रणाची निकड भासू लागली. कारण जसजसा काळ लोटतो तसतसे केशवसुतांच्या कवितेचे महत्त्व वाढत असल्याचे दिसते. केशवसुतांच्या कवितेतून प्रगट झालेला वैश्विक विचार हे या महत्तेचे कारण होय. आजच्या पिढीसाठी तर ही यथामूल आवृत्ती म्हणजे मोठे सांस्कृतिक, वाङ्मयीन धनच होय.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे महाराष्ट्राचे असे सांस्कृतिक धन नव्याने उपलब्ध करुन देण्याचे कार्य सातत्याने चालू आहे. त्यामध्ये जुन्या संत कवींची कविता, तसेच आगरकर, फुले, लोकहितवादी, पां. वा. काणे, महर्षी कर्वे आदींचे वैचारिक साहित्य आणि चरित्र अशांचा समावेश होतो. **केशवसुतांची कविता** या हस्तलिखिताच्या यथामूल आवृत्तीचे प्रकाशन हाही त्याच उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग होय.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला ही आवृत्ती पुनर्मुद्रित करता आली, याचा अभिमान वाटतो. मराठी साहित्यप्रेमी या आवृत्तीचे स्वागत करतील अशी उमेद आहे.

**मधु मंगेश कर्णिक,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# प्रास्ताविक

आधुनिक महाराष्ट्राचे युगप्रवर्तक कवी कृष्णाजी केशव दामले ऊर्फ 'केशवसुत' यांचा जन्म ७ ऑक्टोबर १८६६ रोजी रत्नागिरीजवळील मालगुंड या गावात झाला. त्यांच्या जन्मशताब्दीचा समारंभ साजरा करण्यासाठी शासनाने फेब्रुवारी १९६६ मध्ये एक समिती नियुक्त केली. या समितीने आखलेल्या कार्यक्रमात, केशवसुतांवरील अनुबोधपट, केशवसुत व्याख्यानमाला, विद्यापीठांतून काव्यदर्शन व काव्यपरीक्षण-स्पर्धा, महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शाळांतून काव्यवाचनस्पर्धा, केशवसुतांच्या छायाचित्राचे प्रकाशन, केशवसुतांच्या कवितांच्या ध्वनिमुद्रिका तयार करणे, असा विविध कार्यक्रम होता. दिनांक ७ ऑक्टोबर १९६६ रोजी मुंबईच्या नगरभवनात, मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहकार्याने मुख्य समारंभ साजरा करण्यात आला, त्यावेळी केशवसुतांवरील अनुबोधपटाचे प्रकाशन करण्यात आले. सुप्रसिद्ध चित्रकार श्री. आचरेकर यांजकडून केशवसुतांचे छायाचित्र तयार करवून घेऊन त्याच्या मुद्रित प्रती शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालये यांना देण्यात आल्या. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील प्रादेशिक साहित्य संस्थांनी ठिकठिकाणी शताब्दी समारंभ साजरे केले. मध्यवर्ती समितीने आखलेल्या कार्यक्रमानुसार केशवसुतांच्या कवितेवर व्याख्याने, चर्चा, परिसंवाद, त्याचप्रमाणे प्राथमिक आणि माध्यमिक शाळा व महाविद्यालये अशा सर्व स्तरांवर निबंध व काव्यगायनस्पर्धा घडवून आणल्या. केशवसुत व्याख्यानमाला सुरू करण्याची योजनाही कार्यान्वित झाली आहे. ही व्याख्याने दर वर्षी महाराष्ट्रातील एका विद्यापीठात होतील.

शताब्दी समारोहातील कार्यक्रमामध्ये केशवसुतांच्या कवितांच्या स्वहस्तलिखिताच्या यथामूल मुद्रणास अग्रहक्क दिला होता. त्यासाठी प्रा. अ. का. प्रियोळकर, श्री. के. नारायण काळे आणि श्री. बापूराव नाईक, निमंत्रक, अशी संपादन समिती नेमली होती. या समितीने आखलेल्या योजनेनुसार श्री. बापूराव नाईक यांनी या आवृत्तीचे संपादन, रचना आणि सजावट केली आहे. केशवसुतांच्या सर्व उपलब्ध हस्तलिखित कवितांचे यथामूल मुद्रण करण्याचा समितीचा निर्णय या प्रकाशनात अमलात आणलेला आहे. हस्तलिखिताचे वर्णन आणि मुद्रणयोजना यांविषयी त्यांनीच पुढे निवेदन केले आहे. त्याची मी पुनरुक्ती करीत नाही.

केशवसुत जन्मशताब्दी समारोहाचा प्रथम वर्षदिन आज साजरा होत आहे. त्या प्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. विष्णु सखाराम खांडेकर यांच्या शुभ हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे, ही मोठ्या भाग्याची गोष्ट समजली पाहिजे. आधुनिक लेखकाच्या स्वहस्तलिखिताचे यथामूल मुद्रण करण्याचा मराठीत तरी हा पहिलाच उपक्रम असावा. त्याचे साहित्यिक, समीक्षक आणि रसिक वाचक स्वागत करतील यात शंका नाही.

**मधुकरराव चौधरी**

अध्यक्ष, केशवसुत जन्मशताब्दी समारोह समिती
आणि मंत्री, शिक्षण व वन विभाग, महाराष्ट्र राज्य

मुंबई
७ ऑक्टोबर १९६७

# केशवसुतांच्या कवितांचे हस्तलिखित

## त्याचे स्वरूप आणि मुद्रण योजना

केशवसुतांच्या कवितांचे स्वहस्तलिखित उपलब्ध आहे, ही गोष्ट माहीत झाल्यामुळे केशवसुत जन्मशताब्दी समारोह समितीने त्याचे यथामूल मुद्रण करून एक सुबक ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला. मूळ हस्तलिखित मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या मराठी संशोधन मंडळात असून मंडळाचे माजी संचालक प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी ते तेथे सुरक्षित सांभाळून ठेविले. त्यांनीच ते समितीस उपलब्ध करून दिले. या हस्तलिखिताचे मूळ स्वरूप काय होते ते आता निश्चितपणे सांगणे कठीण आहे ; कारण ते अनेकांनी हाताळले आहे. त्याचे आजचे स्वरूप फक्त सुट्या पानांचेच आहे. हे हस्तलिखित त्याच्या पूर्वस्वरूपात ज्यांनी पाहिले होते ते केशवसुतांचे पुतणे श्री. द. मो. दामले या बाबतीत म्हणतात :

"मूळ हस्तलिखित फुलस्केप कागदाच्या ¼ ( मोठ्या कागदाच्या ; म्हणजे नेहमीच्या एक्झरसाइजचे कागद ) आकाराच्या वह्या होत्या. एकूण तीन वह्या होत्या व त्यांना ब्राउन पेपरचा पुठ्ठा ( कव्हर ) बाहेरून होता. त्यांची मधोमध घडी घालून त्या फितीने बांधलेल्या होत्या. ...१९३०-३२ पर्यंत फितीने बांधलेल्या तीन वह्या मी स्वत: पाहिलेल्या होत्या. ...वह्या जीर्ण झाल्या आहेत. कागद फाटून तुकडा पडेल असा झाला आहे, तेव्हा ते कागद ( वह्या सोडून ) सुटे करावेत आणि त्यांस दोन्ही बाजूंस पारदर्शक कागद चिकटवावा अशी योजना छापखानदार श्री. शंकरराव ( मामासाहेब ) दाते यांनी योजून त्याप्रमाणे काव्यांचे वह्यांवर हा नवा संस्कार झाला." *

आज उपलब्ध असलेली हस्तलिखिताची पाने लिहिण्याच्या कागदावर चिकटवून त्यांच्याच शिवून वह्या केल्या होत्या, असे स्पष्ट दिसते. ज्या एकदोन पानांवर मागे कविता लिहिल्या होत्या, त्यांनाच काय तो शिवण्यापूर्वी पारदर्शक कागद चिकटविलेला दिसतो. म्हणजे श्री. दामले सांगतात ती श्री. मामासाहेब दाते यांची योजना पूर्णपणे अमलात आलेली दिसत नाही.

हस्तलिखिताचे आजचे स्वरूप सुट्या पानांचे आहे, हे वर सांगितलेच आहे. त्यांच्या सूक्ष्म अवलोकनाने हस्तलिखिताच्या मूळ स्वरूपाचा आता अंदाज करता येतो. हस्तलिखिताच्या प्रस्तुत मुद्रणात पंडित-प्रतीत दिलेल्या अनुक्रमाने कविता लाविल्या आहेत. हस्तलिखिताच्या सुट्या पानावर शीर्षकाच्या सुरुवातीस लाल पेन्सिलीने जे आकडे घातले आहेत, ते प्रा. प्रियोळकरांनी हस्तलिखित मुद्रित प्रतींशी ताडून पाहत असताना लावलेल्या क्रमाचे आहेत. प्रस्तुत मुद्रणात हे केशवसुतांचे नसल्यामुळे गाळले आहेत. पण त्यामुळे क्रम फारसा बदललेला

---

* **मराठी संशोधन पत्रिका**, ऑक्टोबर १९६६ "केशवसुतांच्या कवितांचें हस्तलिखित," परिशिष्ट, पान ३७.

नाही. मुळात तीन वह्या होत्या त्या जेव्हा उसवून, कागद सुटे करून पुन्हा चिकटवल्या तेव्हा मूळ वह्यांतील कवितांचा क्रम तसाच ठेविला की बदलला, हे निश्चितपणे आता सांगता येणार नाही; परंतु कविता चिकटविल्यानंतरही त्यांचे पुन्हा तीन गट केले होते आणि त्यामुळे पहिल्या तीन वह्या नंतरही तशाच विलग राहिल्या असाव्या. पैकी एका वहीचा तर पुठ्ठाही आज उपलब्ध आहे. तीनपैकी दोन वह्यांत संग्रहित केलेल्या कविता मुळात कोणत्या क्रमाने चिकटविलेल्या होत्या, हे निश्चितपणे सांगता येते.

प्रस्तुत आवृत्तीतील कविता क्रमांक १ ते १३, १५ ते ३५, ४५, ५४, ६५, ६७ ते ७१, ७३, ८३, ८७, ८८ आणि ९५ या कवितांच्या पानांवर वहीच्या शिवणाच्या खुणा नाहीत. या बहुतेक क्रीमवोव्ह आणि क्रीमलेड, दुधाळ्या बंदाच्या अर्ध्या भागावर लिहिल्या आहेत. क्वचित् वृत्त-कागदही वापरला आहे. क्रमांक ११, "दुर्मुखलेला" ही कविता मुळात अझूरलेड कागदावर लिहिली आहे. क्रमांक १८ आणि ७३ या कविता उभ्या बंदांवर लिहिल्या आहेत. राहिलेल्या कवितांचे दोन गट पडतात. पहिल्या गटात १४, ३६ ते ४४, ४६ ते ५३, ५५ ते ६४, ६६, ७२ आणि ७४ ते ७६ या मराठी आणि सात इंग्रजी कविता येतात. या गटास दुसरी वही म्हणू. बाकीच्या तिसऱ्या गटातील कविता स्वतंत्र वहीत होत्या. ती तिसरी वही. तिचाच पुठ्ठा आता उपलब्ध आहे. येथे वर जे वहीतील कवितांचे क्रम सांगता येण्यासारखे म्हणून दोन गट सांगितले त्याचा क्रम अनुक्रमणिकेत त्या त्या कवितेच्या पुढे कंसांत दिला आहे. साध्या कंसांतील क्रम आता पुठ्ठा नसलेल्या वहीतील असून चौकटी कंसांतील क्रम आता पुठ्ठा उपलब्ध असलेल्या वहीतील आहे. मूळच्या ब्राउन कागदात बांधलेल्या तीन वह्या फाडून चिकटविताना मुळातले गट व कवितांचा क्रम पूर्वीप्रमाणेच ठेविला असावा असे मानले तर, कंसांतील क्रमांकांनी दाखविलेला या वह्यांतील क्रम केशवसुतांना अभिप्रेत होता असे म्हणता येते.

हस्तलिखितात एकंदर १०३ कविता आहेत. त्यांतच क्रमांक ९९ "चिरवियुक्ताचा उद्गार" (पाठांतर), या कवितेचा समावेश होतो. क्रमांक २, ३७ ("माझा मृत्यू"), ४५, ४८, ५२, ५९, ६२ ते ६५, ७२, ८६, ९१ ते ९४ आणि १०२ या कवितांच्या प्रत्येकी दोन दोन प्रती आहेत. यांपैकी "प्रीति" (२५), "भृंग" (४५) आणि "झपूर्झा" कवितेची दोन कडवी (६५), या कविता एका फुलस्केप कागदावर मागे व पुढे लिहिल्या आहेत. याच कागदांवर "प्रीति" कवितेच्या उजव्या समासात 'आपणांस' व 'झपूर्झा' असे दोन शब्द आडवे लिहिले आहेत. या प्रत्येकी दोन दोन प्रती असलेल्या कवितांपैकी "माझा मृत्यु" (३७), "भृंग" (४५), "माझे ठेवूनि चित्त घे" (५२), "तुतारी" (६३), "झपूर्झा" (६५), आणि "हरपलें श्रेय" (१०२) या कवितांच्या दोन्ही हस्तलिखित प्रती, त्यांच्यात थोडा फार फरक असल्यामुळे येथे मुद्रित केल्या आहेत. "दुर्मुखलेला" कवितेच्या डाव्या समासात "*Worth Ptg.*" असे लिहिले आहे. ही एकच कविता अझूरलेड कागदावर लिहिली आहे. त्यावरून अशाच आणखी कविता या प्रकारच्या कागदावर लिहिलेल्या असाव्या; त्यापैकी मुद्रणयोग्य कवितांच्या प्रती करताना याच कवितेची प्रत करावयाचे तेवढे राहून गेले असावे. तसेच मुद्रणयोग्य नाहीत असे

वाटणाऱ्याही काही कविता असाव्या. त्यांच्या प्रती अर्थातच केल्या नसणे स्वाभाविक आहे. त्यावरून प्रस्तुत हस्तलिखित म्हणजे मुद्रण-प्रत तयार करण्याचा प्रयत्न असावा, या समजुतीस बळकटी येते. "सतारीचे बोल" या कवितेच्या आठव्या कडव्याच्या शेवटी समासात "sudden transition or rise", असे लिहिले आहे.

या संग्रहात एकंदर सात इंग्रजी कविता आहेत. त्या सर्व मोठ्या म्हणजे दुसऱ्या वहीत चिकटविलेल्या होत्या; हे पानामागे दिलेल्या क्रमांकांवरून ध्यानात येते. त्यांपैकी २, ३ आणि ६ या कवितांचे मूळ कागद उभे फाडल्यामुळे अर्धेच उपलब्ध आहेत. याच वहीतील प्रथम क्रमांकाची "माझा मृत्यु" ही कविता लाल शाईत लिहिली आहे. तीत बराच बदल करून सुधारून लिहिलेली "माझा अन्त" ही कविता याच वहीत ५४ पानावर चिकटविलेली होती. त्याचप्रमाणे "तुतारी" च्या दोन्ही प्रतीही याच वहीत होत्या. पहिल्या गटातील (क्रमांक ८) "जरी तूं ह्या येथें" ह्या कवितेच्या कागदामागे "कृष्णाजी केशव दामले" अशी लपेटदार मोडी सही आहे. त्यावर कागद चिकटविल्यामुळे ती स्पष्ट दिसत नाही. प्रकाशात धरून ती वाचता येते. ती पारदर्शक कागदावर उतरून घेऊन केलेल्या ठशावरून चित्रकार आचरेकर यांनी काढलेल्या दर्शनी-चित्रावर छापिली आहे.

हे हस्तलिखित केशवसुतांच्या निधनानंतर व्याकरणकार मोरोपंत दामले यांजकडे प्रथम उज्जैनीला कधी गेले, ते माहीत नाही. मोरोपंत दामल्यांच्या निधनानंतर १९१३ च्या मे-जून मध्ये त्या वह्या सीतारामपंत दामल्यांकडे आल्या हे नक्की, अशी श्री. द. मो. दामल्यांची माहिती आहे. कै. दिवाकर यांना हे हस्तलिखित पाहावयास मिळाले होते. तसेच कै. हरि नारायण आपटे यांनी ह्या वह्यांचा आपल्या केशवसुतांच्या कवितेच्या आवृत्तीत उपयोग केला आहे, असे दिसते. हस्तलिखित १९३५ पर्यंत दामले कुटुंबियांकडेच होते. त्यांजकडून ते श्री. द. मो. दामले यांनीच कै. लागूंकडे जातीने नेऊन दिले. नंतर, म्हणजे १९५०–५२ च्या दरम्यान हस्तलिखित पुण्याच्या भारत इतिहास मंडळात किंवा पुणे विद्यापीठाकडे संरक्षणासाठी सुपूर्द करावे; असे श्री. दामले यांनी सुचविले. परंतु ते कै. लागूंना पसंत न पडून त्यांनी ते प्रा. प्रियोळकरांच्या हवाली केले. "समग्र केशवसुत" ग्रंथाचे संपादक प्रा. भ. श्री. पंडित यांनी हस्तलिखित पाहिले होते. अलिकडे प्रा. स. गं. मालशे यांनी हस्तलिखिताची पाहाणी करून एक निबंध लिहिला तो 'मराठी संशोधनपत्रिका, जुलै आणि ऑक्टोबर १९६६ या अंकांतून प्रसिद्ध झाला आहे.

हस्तलिखिताचे मुद्रण करावयाचे ठरविल्यानंतर, ते कोणत्या पद्धतीने करावे, असा विचार पडला. पाने दिसतात तशीच, त्याच आकारात मुद्रित करावयाची तर मोठ्या पानाचे काय करावे? शिवाय फोटो घेऊन 'हाफटोन' पद्धतीने ही पाने छापली असती, तर ती मुळाशी जुळती राहिली असती, पण कवितेच्या ओळी वाचणे सुलभ झाले नसते. म्हणून रेषा-मुद्रिका करण्याचे ठरविले. पुस्तकाच्या आकाराशी जुळाव्या म्हणून काही ओळी रुंदी कमी करून लहान केल्या. त्यामुळे काही ठिकाणी दोन पाने एका पानात बसविता आली. हस्तलिखिताचा कागद मुळात पांढरा 'क्रीमलेड' होता; पण आता तो काळवंडून जीर्णपर्णवत् झाला आहे. त्याचा आभास मात्र

व्हावा, म्हणून कवितांच्या खाली फिकट पार्श्वमुद्रण केले आहे. हस्तलिखितात पेन्सिलीने केलेल्या काही दुरुस्त्या रेषा-मुद्रिकांत वळल्या नाहीत, त्या मुद्राक्षरांत मुद्रित करून शिवाय पार्श्वमुद्रित पृष्ठांखाली त्यांचा खुलासा दिला आहे.

तीन वह्यांपैकी एकाच वहीचा पुठ्ठा उपलब्ध आहे. त्याचे रंगीत ठसे करून हस्तलिखित कवितांच्या मुद्रित भागापुढे व मागे पुनर्मुद्रित केले आहेत. या तिसऱ्या वहीत मोडीमध्ये प्रसूति-समयी लागणाऱ्या सामानाची यादी लिहून ठेविली असून पुढील पानावर काही शब्द लिहिले आहेत. त्यांच्याही रेषा-मुद्रिका शेवटी पान एकशेएकाहत्तर आणि पान एकशेबासष्ट वर छापल्या आहेत. ह्या ग्रंथासाठी खास आंतर-मलपृष्ठे चितारून मुद्रित केल्याचे दिसून येईल.

हस्तलिखित यथामूल मुद्रित करणे इतकाच हेतू असल्यामुळे केशवसुतांचे चरित्र, काव्य-विवेचन, पाठभेद, केशवसुतांवरील लिखाणांची यादी, इत्यादींचा समावेश या ग्रंथात करू नये असे समितीने ठरविले, त्याचे पालन केले आहे. संपादनसमितीचे सदस्य आणि माझे ज्येष्ठ स्नेही प्रा. अ. का. प्रियोळकर व श्री. के. नारायण काळे आणि मराठी संशोधन मंडळाचे सध्याचे संचालक प्रा. स. गं. मालशे यांच्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आंतर-मलपृष्ठ चितारण्यात त्याचप्रमाणे रेषा-मुद्रिकांसाठी मूळप्रती करण्याच्या कामात शासन मुद्रणविभागाच्या चित्रकला उपविभागाचे प्रमुख श्री. पद्माकर शिरगांवकर आणि त्यांचे चित्रकार मदतनीस यांचे साहाय्य झाले आहे. त्यांचे आभार मानले पाहिजेत. अशा प्रकारच्या ग्रंथमुद्रणातील किचकटपणा लक्षात घेता ग्रंथाचे तातडीने मुद्रण करून दिल्याबद्दल शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. स. आ. सप्रे, उपव्यवस्थापक श्री. आर्. बी. आल्वा आणि प्रत्यक्ष मुद्रणात भाग घेणारे कुशल कारागीर यांचेही आभार मानणे अवश्य आहे.

मुंबई, ७ जानेवारी १९६७

बापूराव नाईक

# अनुक्रमणिका

(हस्तलिखिताच्या मुद्रणातील कवितांचा क्रम प्रा. भ. श्री. पंडित यांच्या 'समग्र केशवसुत' या ग्रंथास अनुसरून ठेविला आहे. हस्तलिखितात नसलेले स्थळ व काळनिर्देश कंसांत दाखविले आहेत. * चिन्हाने दाखविलेले निर्देश पानांमागे चिकटविलेल्या भागांत आढळले. वृत्तनिर्देश व मूळ प्रसिद्धीचे स्थळ आणि काळ, पंडित प्रतीवरून दिले आहेत.)


| | कवितेचे नाव | लेखनकाल | वहीतील क्रमांक | वृत्त | प्रथम प्रसिद्धी | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खिडकीकडे मौज पहावयास | नोव्हेंबर १८८५ | ... | श्लोक | ... | एक |
| २ | उगवत असलेल्या सूर्यास | डिसेंबर १८८५ | ... | मालिनी | ... | तीन |
| ३ | मरणकाल | मार्च–एप्रिल १८८६ | ... | साकी | ... | चार |
| ४ | प्रियेचें ध्यान | मे १८८६ | ... | शिखरिणी | मासिक मनोरंजन, नोव्हें० १८९५ | पाच |
| ५ | कै० वा० जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर | जुलै १८८६ | ... | शा. विक्रीडित | ... | सहा |
| ६ | सृष्टि आणि कवि | (ऑक्टोबर)* १८८६ | ... | शिखरिणी | मासिक मनोरंजन, जून १९०३ | सात |
| ७ | कविता आणि कवि | ३० डिसेंबर १८८६ | ... | श्लोक | करमणूक, १० जाने० १८९१ | आठ |
| ८ | जरी तूं ह्या येथें | १८८६ | ... | शिखरिणी | ... | दहा |
| ९ | अढळ सौंदर्य | १८८६ | ... | दिंडी | ... | अकरा |
| १० | अपर कवितादैवत | १८८६ | ... | शिखरिणी | ... | बारा |
| ११ | 'दुर्मुखलेला' | १८८६ | ... | शा. विक्रीडित | करमणूक, ३ सप्टें० १८९१ | तेरा |
| १२ | एका भारतीयाचे उद्गार | (१८८६) | ... | मंदाक्रांता | चित्रमयजगत्, फेब्रु० १९२० | चौदा |
| १३ | 'नाहीं ज्यापरि डोंगळा०' | (९ एप्रिल १८८७)* | ... | शा. विक्रीडित | ... | पंधरा |
| १४ | 'बायांनीं धरुनी बळें' | पुणें, १८८७ | (३४) (३५) | ... | ... | सोळा |
| १५ | किरातार्जुनीय–सर्ग १ ला | जून १८८७ | ... | शा. विक्रीडित, वंशस्थ, मालिनी | ... | अठरा |
| १६ | गोष्टी घराकडिल मी वदतां गड्यारे | २२ जुलै १८८७ | ... | वसंततिलका | ... | तेवीस |
| १७ | मळामुठेच्या तीरावर | (जुलै १८८७) | ... | चाल: "हरिची भगिनी म्हणे. ." | मासिक मनोरंजन, सप्टें० १८९६ | सत्तावीस |
| १८ | आगबोटीच्या कांठाशीं० (तरंग पहिला) | डिसेंबर १८८७ | ... | शिखरिणी | कथारत्नावलि, जुलै १८९१ | एकोणतीस |
| १९ | जास्वंदीचीं फुलें आणि पारिजाताचीं फुलें | (६ ऑगस्ट १८८८) | ... | इंद्रवज्रा, उपजाति | काव्यरत्नावलि, ऑक्टो० १८८८ | तेहतीस |

| | कवितेचे नाव | लेखनकाल | वहीतील क्रमांक | वृत्त | प्रथम प्रसिद्धी | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न | (३ सप्टेंबर १८८८) | ... | भुजंगप्रयात | मनोरंजन व निबंधचंद्रिका, नोव्हें० १८८९ | चौतीस |
| २१ | कामान्धत्व | (नोव्हेंबर १८८८)* | ... | शा. विक्रीडित, इंद्रवज्रा | ... | पस्तीस |
| २२ | जायाचें जग का असेंच ? | (डिसेंबर १८८८) | ... | शा. विक्रीडित, उपजाति | करमणूक, २० डिसें० १८९० | छत्तीस |
| २३ | ईश्वराचा ग्रंथ | (१८८८) | ... | शा. विक्रीडित, अनुष्टुभ | ... | सदतीस |
| २४ | रा० बा० ब० पटवर्धन, मु० नागपूर, यांस | पुणे (१८८८) | ... | श्लोक | ... | अडतीस |
| २५ | प्रीति | (१८८८) | ... | ... | मनोरंजन व निबंधचंद्रिका, नोव्हें० १८८९ | चाळीस |
| २६ | जगामधीं या तुला कशाला परमेशें धाडिलें ? | ... | ... | चाल: "वीरा भ्रमरा" | ... | एकेचाळीस |
| २७ | समृद्धि आणि प्रीति | ... | ... | शा. विक्रीडित | मासिक मनोरंजन, ऑगस्ट १८९६ | बेचाळीस |
| २८ | तत्त्वतः बघतां नामावेगळा | ... | ... | ओवी | ... | त्रेचाळीस |
| २९ | मजुरावर उपासमारीची पाळी | (७ जानेवारी १८८९)* | ... | इंद्रवंशा | ... | चवेचाळीस |
| ३० | प्रयाणगीत | (११ जानेवारी १८८९)* | ... | चाल: "पंडुकुमारा" | मासिक मनोरंजन, ऑगस्ट १८९६ | शेहेचाळीस |
| ३१ | विकसन | २८जानेवारी १८८९ | ... | वसंततिलका | करमणूक, २२ नोव्हें० १८९० | सत्तेचाळीस |
| ३२ | मुलांस झोडपणाऱ्या एका पंतोजीस | (एप्रिल १८८९) | ... | शा. विक्रीडित | करमणूक, ३ जाने० १८९० | अठ्ठेचाळीस |
| ३३ | —प्रत | (३० मे १८८९) | ... | दिंडी | मनोरंजन व निबंधचंद्रिका, नोव्हें० १८८९ | एकुणपन्नास |
| ३४ | कोठें जातोस ? | (१२ जून १८८९) | ... | दिंडी | मनोरंजन व निबंधचंद्रिका, नोव्हें० १८८९ | पन्नास |
| ३५ | आई ! आई ! | (६ नोव्हेंबर १८८९) | ... | वसंततिलका | मनोरंजन व निबंधचंद्रिका, नोव्हें० १८८९ | एकावन |
| ३६ | रा० रा० बळवंत आपाजी दाते यांस | (पुणे, १८८९) | (५९) | शा. विक्रीडित | ... | बावन |
| ३७ | माझा मृत्यु | मुंबई, ४ जानेवारी १८९० | (१) | ... | ... | त्रेपन |
| — | माझा अन्त | ... | (५४) | वृत्तवैचित्र्य | मासिक मनोरंजन, जुलै १८८९ | चौपन |
| ३८ | कविता आणि प्रीति | मुंबई, ७ जानेवारी १८९० | (२) | भुजंगप्रयात | करमणूक, नोव्हें० १८९० | पंचावन |
| ३९ | स्वप्न | मुंबई, २५ जानेवारी १८९० | (३) | शा. विक्रीडित | मनोरंजन व निबंधचंद्रिका, ऑक्टो० १८९१ | छप्पन |
| ४० | सृष्टि, तत्त्व आणि दिव्यदृष्टि | खेड,२८ मार्च १८९० | (४) | शा. विक्रीडित | मनोरंजन व निबंधचंद्रिका, ऑक्टो० १८९१ | सत्तावन |
| ४१ | स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य | खेड, ११ एप्रिल १८९० | (५) | शा. विक्रीडित | मनोरंजन व निबंधचंद्रिका, ऑक्टो० १८९१ | अठ्ठावन |
| ४२ | सिंहावलोकन | वळणें, ३ मे १८९० | (६) | पृथ्वी | मासिक मनोरंजन, ऑक्टो० १८९६ | एकुणसाठ |

| क्रमांक | कवितेचे नाव | लेखनकाल | वहीतील क्रमांक | वृत्त | प्रथम प्रसिद्धी | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | फुकट दवडलेला तास | मुंबई, ९ ऑगस्ट १८९० | (७) | शा. विक्रीडित | करमणूक, ८ नोव्हें० १८९० | साठ |
| ४४ | दिव्य ठिणगी | दादर, २७ ऑगस्ट १८९० | (८) | शा. विक्रीडित | करमणूक, २२ नोव्हें० १८९० | एकसष्ट |
| ४५ | भृंग | (खेड, १९ नोव्हेंबर १८९०) | ... | मणिबंधवृत्ताच्या चालीवर | करमणूक, २९ नोव्हें० १८९० | बासष्ट |
| — | भृंग (दुसरी प्रत) | ... | ... | ... | ... | चौसष्ट |
| ४६ | रूढि-सृष्टि-कलि (?) | (दादर, ९ मार्च १८९१) | (९) | शा. विक्रीडित | करमणूक, ४ एप्रिल १८९१ | पासष्ट |
| ४७ | कवि | दादर, १४ मार्च १८९१ | (१०) | शा. विक्रीडित | ... | सहासष्ट |
| ४८ | फुलांची पखरण | कल्याण, २० एप्रिल १८९१ | (१२) | गाणे | करमणूक, ५ डिसें० १८९१ | सदुसष्ट |
| ४९ | पर्जन्याप्रत | जून १८९१ | (१८) | शा. विक्रीडित | करमणूक, १६ जून १८९४ | अडुसष्ट |
| ५० | स्फुट-श्लोक | (१८९१) | (१४/१७) | श्लोक | ... | एकुणसत्तर |
| ५१ | मरणानंतर | ... | (५८) | शा. विक्रीडित | करमणूक, जाने० १८९२ | त्र्याहत्तर |
| ५२ | "माझें ठेवुनि चित्त घे" | मुंबई, १ मार्च १८९२ | (१९) | शा. विक्रीडित | करमणूक, १२ मार्च १८९२ | चौऱ्याहत्तर |
| | "माझें ठेवुनि चित्त घे" (दुसरी प्रत) | ... | (२०) | ... | ... | पंचाहत्तर |
| ५३ | पुष्पाप्रत | १६ मार्च १८९२ | (२१/२२) | अंजनीगीत इंद्रवज्रा | करमणूक, २६ मार्च १८९२ | शाहत्तर |
| ५४ | फुलपांखरूं | (मुंबई, १७ ऑगस्ट १८९२) | ... | ... | करमणूक, २० ऑगस्ट १८९२ | अठ्ठयाहत्तर |
| ५५ | शब्दांनो ! मागुते या ! | १५ सप्टेंबर १८९२ | (२३) | स्रग्धरा | करमणूक, ८ ऑक्टो० १८९२ | ऐंशी |
| ५६ | दिवा आणि तारा | (मुंबई),२६ सप्टेंबर १८९२ | (२८) | शा. विक्रीडित | करमणूक, १ ऑक्टो० १८९२ | एक्याऐंशी |
| ५७ | 'पण लक्ष्यांत कोण घेतो?' च्या कर्त्यास | मुंबई, १९ ऑक्टोबर १८९२ | (२९) | शा. विक्रीडित | मासिक मनोरंजन, जून १८९८ | ब्याऐंशी |
| ५८ | मयूरासन आणि ताजमहाल | १३ नोव्हेंबर १८९२ | (३०) | शा. विक्रीडित | करमणूक, १३ मे १८९३ | त्र्याऐंशी |
| ५९ | चिरवियुक्ताचा उद्‌गार | (मुंबई), १५ नोव्हेंबर १८९२ | (३१) | शा. विक्रीडित | करमणूक, १३ मे १८९३ | चौऱ्याऐंशी |
| ६० | स्वप्नामध्यें स्वप्न ! | १५ डिसेंबर १८९२ | (३२) | ... | मासिक मनोरंजन, फेब्रु० १८९८ | पंचाऐंशी |
| ६१ | संध्याकाळ | सावंतवाडी, जानेवारी १८९३ | (३३) | शा. विक्रीडित | करमणूक, २३ जून १८९४ | शहाऐंशी |
| ६२ | क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास | मुंबई, २४ मार्च १८९३ | (३६) | शा. विक्रीडित | करमणूक, १२ एप्रिल १८९३ | सत्याऐंशी |
| ६३ | तुतारी | मुंबई, २८ मार्च १८९३ | (३७-४०) | ... | मासिक मनोरंजन, जाने० १९०१ | अठ्ठयाऐंशी |
| — | तुतारी (दुसरी प्रत) | ... | (४८-५१) | ... | ... | ब्याणव |

| | कवितेचे नाव | लेखनकाल | वहीतील क्रमांक | वृत्त | प्रथम प्रसिद्धी | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ६४ | फुलांतले गुण | मुंबई, ३१ मार्च १८९३ | (४१/४२) | ... | करमणूक, १५ एप्रिल १८९३ | शहाण्णव |
| ६५ | झपूर्झा | (मुंबई, २ जुलै १८९३) | ... | ... | करमणूक, २९ जुलै १८९३ | अठ्ठयाण्णव |
| — | झपूर्झा ! (दुसरी प्रत) | ... | ... | ... | ... | शंभर |
| ६६ | थकलेल्या भटकणाराचें गाणें | मुंबई, २८ सप्टेंबर १८९३ | (४३) | चाल : फटक्याची | करमणूक, ११ नोव्हें० १८९३ | एकशेएक |
| ६७ | प्रीति आणि तूं | (मुंबई, २७ नोव्हेंबर १८९३) | ... | शा. विक्रीडित | करमणूक, ६ जाने० १८९४ | एकशेदोन |
| ६८ | धूमकेतु आणि महाकवि | ... | ... | चाल : "माझ्या मनिचें" | मासिक मनोरंजन, मार्च-एप्रिल १८९५ | एकशेतीन |
| ६९ | विद्यार्थ्यांप्रत | ... | ... | ... | मासिक मनोरंजन, ऑगस्ट १८९६ | एकशेचार |
| ७० | उत्तेजनाचे दोन शब्द | ... | ... | दोहा | मासिक मनोरंजन, नोव्हें०-डिसें० १८९६ | एकशेपाच |
| ७१ | घडयाळ | मुंबई, ३ डिसेंबर १८९५ | ... | ... | मासिक मनोरंजन, फेब्रु० १९१८ | एकशेसहा |
| ७२ | स्फूर्ति | ... | ... | ... | ... | एकशेसात |
| — | स्फूर्ति (दुसरी प्रत) | मुंबई, २३ मे १८९६ | (४५) | चाल : "किती रहावे तुजविण आतां" | करमणूक, २७ जून १८९६ | एकशेनऊ |
| ७३ | रांगोळी घालतांना पाहून | (१८ डिसें० १८९६) | ... | शा. विक्रीडित | करमणूक, २६ डिसें० १८९६ | एकशेदहा |
| ७४ | "तिनें जातां चुम्बिलें असे यातें !" | २५ डिसेंबर १८९६ | (४६) | दिंडी | करमणूक, ११ फेब्रु० १८९९ | एकशेबारा |
| ७५ | स्फुट विचार | .. | (४७) | ... | मासिक मनोरंजन, सप्टें० १८९७ | एकशेतेरा |
| ७६ | मूर्तिभंजन | ... | (५५) | अभंग | ... | एकशेचौदा |
| ७७ | रुष्ट सुंदरीस | जुलै १८९७ | [ १० ] | चाल : "वीरा भ्रमरा" | मासिक मनोरंजन, ऑगस्ट १८९७ | एकशेपंधरा |
| ७८ | काव्य कोणाचें ? | भडगांव, ७ ऑगस्ट १८९७ | [ १ ] | दिंडी | काव्यरत्नावलि, फेब्रु० १८९९ | एकशेसतरा |
| ७९ | सुंदरीदर्शन | ... | [ २ ] | शा. विक्रीडित | काव्यरत्नावलि, ऑगस्ट १९०४ | एकशेएकोणीस |
| ८० | फार दिवसांनीं भेट | २६ जानेवारी १८९८ | [ ४ ] | चाल : "इस तन-धनकी कोन बढाई" | काव्यरत्नावलि, सप्टेंबर १८९८ | एकशेवीस |
| ८१ | कविच्या हृदयीं जसे गुंगती | ... | [ ५ ] | साकी | ... | एकशेबावीस |
| ८२ | नवा शिपाई | ८ मार्च १८९८ | [ ६/७ ] | ... | करमणूक, ७ मे १८९८ | एकशेतेवीस |
| ८३ | वियोगामुळें | ... | ... | शा. विक्रीडित | करमणूक, १२ नोव्हेंबर १८९८ | एकशेपंचवीस |
| ८४ | पद्यपंक्ति | १८९८ | [ ८ ] | ... | ... | एकशेसव्वीस |
| ८५ | तहान आणि भूक आरंभीं नव्हती | ... | ,, | अभंग | ... | एकशेसत्तावीस |

| | कवितेचे नाव | लेखनकाल | वहीतील क्रमांक | वृत्त | प्रथम प्रसिद्धी | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ८६ | विद्याप्रशस्ति | (१८९८) | [ ९ ] | कामदा-वृत्ताच्या चालीवर | काव्यरत्नावलि, एप्रिल १९०० | एकशेअठ्ठाव्वीस |
| ८७ | निशाणाची प्रशंसा | ... | ... | दोहा | करमणूक, २२ जाने० १८९९ | एकशेएकोणतीस |
| ८८ | कवितेचें प्रयोजन | ... | ... | शा. विक्रीडित | सुविचारसमागम, मे १८९९ | एकशेएकतीस |
| ८९ | सतारीचे बोल | २० मार्च† १९०० | [११-१३] | वृत्त : पादाकुलक | मासिक मनोरंजन, फेब्रु० १९०० | एकशेतेहतीस |
| ९० | "कोणीकडून? कोणीकडे?" | भडगांव, १७ ऑक्टो० १९०० | [ १५ ] | ... | मासिक मनोरंजन, जाने० १९०२ | एकशेसदतीस |
| ९१ | म्हातारी | २५ जानेवारी १९०१ | [१६-१८] | ... | मासिक मनोरंजन, जून १९०२ | एकशेअडतीस |
| ९२ | आम्ही कोण ? | फैजपूर, १९ नोव्हेंबर १९०१ | [ १९ ] | शा. विक्रीडित | मासिक मनोरंजन, मे १९०२ | एकशेएकेचाळीस |
| ९३ | घुबड | फैजपूर, १२ डिसेंबर १९०१ | [२०-२२] | ... | मासिक मनोरंजन, एप्रिल १९०२ | एकशेबेचाळीस |
| ९४ | वियुक्ताचा उद्‌गार | १५ डिसेंबर १९०१ | [२४] | शा. विक्रीडित | मासिक मनोरंजन, ऑगस्ट १९०३ | एकशेपंचेचाळीस |
| ९५ | वियुक्ताचा उद्‌गार (पाठान्तर) | १६ डिसेंबर १९०१ | ... | शा. विक्रीडित | ... | एकशेशेहेचाळीस |
| ९६ | स्मरण आणि उत्कण्ठा | २९ डिसेंबर १९०१ | [ २३ ] | शा. विक्रीडित | मासिक मनोरंजन, फेब्रु० १९०२ | एकशेसत्तेचाळीस |
| ९७ | आईकरितां शोक | (१९०२) | [ २६ ] | ... | ... | एकशेअठ्ठेचाळीस |
| ९८ | 'दूर कोठें एकला जाउनीयां' | २७ ऑगस्ट १९०३ | [२७-२८] | दिंडी | ... | एकशेपन्नास |
| ९९ | राजा शंतनु | ... | [२९-३०] | आर्या | ... | एकशेबावन |
| १०० | कांहीं स्वकृत वचनें | ... | [३१/३२] | ... | ... | एकशेत्रेपन |
| १०१ | प्रतिभा | धारवाड, २८ जुलै १९०४ | [ ३३ ] | शा. विक्रीडित | मासिक मनोरंजन, जाने०-फेब्रु० १९०५ | एकशेपंचावन |
| १०२ | हरपलें श्रेय | चिपळूण, २५ मे १९०५ | [३४-३६] | चाल : "पाहूं चला हरि कोणीकडे" | काव्यरत्नावलि, जून १९०५ | एकशेछप्पन |
| — | हरपलें श्रेय (दुसरी प्रत) | ... | ... | ... | ... | एकशेएकुणसाठ |
| १०३ | तुझे नाम मुखीं | ... | ... | अभंग | ... | एकशेएकसष्ट |
| — | सूर सूर तुलसी | ... | ... | ... | ... | " |
| — | काही शब्दांची नोंद | ... | ... | ... | ... | एकशेबासष्ट |


† २० मार्च ही तारीख चुकीची दिसते ; ही कविता फेब्रुवारी महिन्यातच प्रसिद्ध झाली आहे.

## इंग्रजी कविता


| | कवितेचे नाव | लेखनकाल | वहीतील क्रमांक | पृष्ठांक |
|---|---|---|---|---|
| 1 | The Star of Constant Love. | ... | (५२) | एकशेत्रेसष्ट |
| 2 | An Ap.. .. | Bombay, December 7, 1889 | (११) | एकशेचौसष्ट |
| 3 | On getting my.. .. | Kalyan, April 21, 1891 | (१३) | ,, |
| 4 | To a Poet .. | Kalyan, April 21, 1891 | (२७) | एकशेपासष्ट |
| 5 | Flowers from a Grave | Bombay, 23,—1892 | (२४-२६) | एकशेसहासष्ट |
| 6 | (They dance..) | December 21, 1893 | (४४) | एकशेएकुणसत्तर |
| 7 | The Waves .. | December 21, 1893 | (५३) | एकशेसत्तर |

—शेवटी मोडीत लिहिलेली यादी. एकशेएकाहत्तर

खिडकी मौज पहावयास

मज्जा पहायास विलोल बाला
सौधांवरी काञ्चनयुक्त जाला
तयीं त्वरेनें लगटून येती
राहोनि अन्य व्यवहार जाती ॥१

कोणी गवाक्षी सहसा निघाली
कचांतलीं बन्धनमुक्त झालीं
पुष्पें, न बांधूं सुचलें तियेस
सेधी करें [illegible] परि केशपाश ॥२

कोणी, सखी रंगवितां पदाला
ओढून, ये तूर्ण पहावयाला
लीलागती विस्मरली सदाची
अलक्तचिन्हें उठलीं पदाचीं ॥३

विलोचनीं दक्षिण अञ्जनाला
घालूनि वञ्ची दुसरा तयाला
तशीच ये धावुनियां ग[illegible] ← गवाक्षी
[illegible]डी करीं राहुनि कुडुमलाक्षी ॥४ ← क्षी

पाचव्या ओळीवर "जाळीकडे एक जवे निघाली" असे पेन्सिलने लिहिले आहे. डाव्या समासात काही ओळी पेन्सिलने लिहिल्या आहेत. त्या अस्पष्ट असल्यामुळे वाचता येत नाहीत.

* कोणी गवाक्षीं → जाळीकडे अन्य कटाक्ष फेकी
नीवी त्वरेनें फिटली तिचे कीं
हस्तें निऱ्या आकळुनीच ठाके
नाभींत तत्कङ्कणकान्ति फाके ॥५
अन्या त्वरेनें उठली पहाया ← पहावया
लागे पदांच्या स्खलनीं गळाया ← गळावया
काञ्ची तिची पूर्ण न गुम्फली ही ← ती ओविली जी पुरती न मेखला
अङ्गुष्ठमूलीं युगमात्र राही ← राहिला ॥६
विलोलनेत्रभ्रमराकुलांनीं
त्यांच्या अहो आसववासितांनीं
वातायनें व्यापियलीं मुखांनीं
—शृंगारिलीं काय सरोरुहांनीं ॥७

रघुवंशे श्रीकालिदासः ।

श्री १८८

† लोलांक्ष हे भ्रमर ज्या वरि शोभतात
आहेहि आसवसुवास भरून ज्यांत
त्या त्यांचिया सुवदनीं खिडकी भरूनी
गेल्या जणूं सजविल्याच सरोरुहांनीं !

* पेन्सिलच्या सुधारणा. † सातव्या कडव्याऐवजी.

उगव.  ऊगवत्या सूर्य्यास.

उदयगिरिशिरीं या त्वत्तुरंगीं खुरांहीं
तुडवुनि उडवीली धूलि ही जैशि कांहीं
द्युति बघुनि अशी ती चित्त माझें रमून,
दिनकर, मज बोधी तूज गाया नमून ॥१
नवसुरुचिरवल्ली या हिमस्नात यांनीं
नवरुचिरलतांनीं या हिमालंकृतांनीं
स्मितसमसुमनांनीं पूजितां तूज आतां
फिरुनि फिरुनि भास्वन् वन्दितों तूज गातां ॥२
कवळुनि करजालें भूमिकण्ठास, लाल
विलसितरुचिभासें फेंकितां तूं गुलाल
विकसिततरुमालाकेशपंक्तींत तीचे,
स्तवुनि फिरुनि तूतें वन्दितों मी मरीचे ॥ ३
अनुकरण करीं मी गाउनी या खगांचें
तद्दिव सुमनतांचें वन्दुनी या लतांचें
अनुसरत असें मी हासुनी पद्मिनीस
शरण तुजसि आलों मी असा नम्र दास ॥४
१८८

दुसऱ्या मागाहून उतरलेल्या नकलेत ९ व्या ओळीतील 'भूमिकण्ठास' हा शब्द खोडून उजव्या समासात 'भूमिलागूनि' शब्द लिहिला आहे. एरवी बदल नाही.

मरणकालीं

(याचें मूळ The Death Bed हें काव्य T. Hood
यानें आपल्या एका बहिणीच्या मरणसमयीं लिहिलें.)

१ आम्हीं तीचें श्वसन रात्रभर सचिंत हो निरखियलें
श्वसन तिचें मृदु मन्द मन्द जें अमुच्या कानीं पडलें :
२ अम्हा त्यामुळें, तीचे वक्षीं आयुष्याची लाट
हेलकावते खालवर, असें समजायाला वाट.
३ तेव्हां आम्ही कितीतरी पण हलक्यानें बोलावें
सावकाश ही तसें भोंवतीं फिरतांना चालावें,
४ जाणों तीचें लांबवायया आयुष्य अम्ही अपुल्या
अर्ध्या किम्बहुना सगळ्यां ही शक्ति तिला अर्पियल्या.
५ अमुच्या ~~भीतीं~~ आशांनीं ~~आशेला~~ भीतीला खोटेसाळ हो म्हटलें
तसें आमच्या ~~आशांनीं~~ भीतींनीं ही ~~भीतीला~~ आशेला ठरवियलें —
६ आम्हाला ती भासे मेली जेव्हां ती निजलेली
आणि अहह! निजलेली जेव्हां हाय! हाय! ती मेली.
७ कारण, नंतर पहाट आली अंधुक उदास तैशी
आणि हिमाच्या वर्षावानें काकडलेली ऐशी,
८ शिव! शिव! तेव्हां स्तब्धें पक्ष्में तिचीं सर्वथा मिटलीं
—तिची आमुचीहुनी निराळिच पहाट तेव्हां झाली

———— [illegible]

## प्रियेचें ध्यान

— — मे १८८८

‘उद्यां प्रातःकालीं रथुनि मजला जाण निघणें
‘पुण्याला जाण्याला, स्वजन सगळा सोडुनि गडे;
‘उद्यां एव्हां माझ्याविण वद कसें होइल तुला?—
‘दुणे तूझेवीणे श्रम सखि! पथीं होतिल मला!’

असें मोठ्या कष्टें तुजजवळि मी पाहि वदतां,
गळां, तूझे माझे, मम तव, सखे हस्त असतां,
विशालाक्षीं तूझे जल भरुनियां मी न दिसुनी,
वियोगाला भावी, समजलिस तूं भूत, चुकुनी!

निशीथीं या आतां असशिल मला ध्याउनि असें
महाभासा स्वांगीं विरहविकलीं वेष्टित, तसें
मला शोकानें तूं समजुनि महाभास दिधलें,
स्मरूनी तें आलिंगन, हृदय हें फारचि उले!

गमे तूतें ध्याया मज न सरी आकृति बरी,
रतीचे वेळींच्या शिरति हृदयीं अन्यहि जरी;
म्हणूनी यां वाटे मज अनुभवें याच समये,—
सुखाहूनी दुःखा स्मरति बहुधा बद्ध हृदयें!

अहा! अंकीं माझे तुज बघतसें मी बसलिस,
शिरा स्कन्धीं माझे लववुनि गडे तूं पडलिस,
वियोगाचे तर्कें रडत असतां, अश्रु सुटती
तुझे, माझ्या वक्षीं टपटप बघें मी उतरती!

टिपाया मी त्यांतें, पदर सरसावीं, परि गडे,
भिजोनी तो तूझे नयन सुकणें, हें न च घडे;—
असें कां व्हावें हें न कळुनि रडें मी खळखळां,
पुसाया तें लागे अहह! नयनां तोच मजला!

दोन कागदांवर प्रत्येकी तीन तीन कडवी लिहिली आहेत.

## कै॰वा॰ जयाजीराव शैंदे व तुकोजीराव होळकर
(जुलै १८८६)

ज्यानी बाहुबळें रणांत सगळे जिंकूनियां हे अरी
कीर्तीचे ध्वज आपुले उभविले या आर्यभूमीवरी
त्यांचे पुत्र अम्हांस आज सहसा सोडूनियां चालतां
खेदानें न रडे खरा कवण तो सांगा मराठा अतां ?

राणोजी—परिसूनि नांवच अहो ज्याचें मराठा स्फुरे
मल्हारी—परिसूनि नांवच अहो ज्याचें मराठा स्फुरे
हा! हा! तत्कुलदीप हे विझुनियां गेले भले आजना!
हा! हा! तत्कुलवृक्षगुच्छ बरवे कोमेजले आजना।

## सृष्टि आणि कवि

सृष्ट अ गे कावे.

वयस्या
~~[illegible]~~, गाते ही मृदुघनरवें सृष्टि मधुर
कसा गाऊं तीच्या पुढति वद मी पामर नर ?
तशी ती गातांना श्रुतिसुभग तीं पक्षिकवनें
कशासाठीं गावीं अरस कवनें मी स्ववदनें ?

मिषानें वृष्टीच्या खळखळ अशी सृष्टि रडतां
कुणाची ढाळाया धजल तसले अश्रु कविता ?
निशिथीं ती तैशी हळु मृदुमरुच्छ्वास करितां
कवीची गा कोण्या त्यजिल तसले श्वास दुहिता ?

---

१८८५

७

## कविता अ  गे कवि

30/12/

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
अहांत मोठे ?– पुसतों तुम्हाला. १
युवा जसा तो युवतीस मोहें
तसा कवी हा कवितेस पाहे,
तिला जसा तो करितो विनंती
तसा हिला हा करितो सुवृत्तीं. २
लाडीगुडी चालव लाडकीशीं
अशा तऱ्हेनें, जरि हें युन्याशीं
कोणी नसे सांगत, थोरगोरवें
कांतें तुम्ही सांगतसां कवीसवें ? ३
करूनियां काव्य जनांत आणणें,
न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणें;
करूनि तें दंग मनांत गुंगणें,
तदीय हा सुन्दर हेतु मी म्हणें ४

सभारुची पाहुनि, रम्य फार
रंगीं नटी नाचवि सूत्रधार ;
त्याचें तयाला सुख काय होय ?
तें लोक निन्दाभय ही शिवाय !— ५
नटीपरी त्या कविता तयाची
जनस्तुती जो हृदयांत यांची :
पढीक तीचे परिसूनि बोल
तुम्ही कितीसे भुलुनी डुलाल ? ६
स्वभावभूयिष्ठ जिच्यांत माधुरी,
अशी तुम्हाला कविता रुचे जरी,
कवीस सोडा कवितेबरोबरी,—
न जाच वाटेस तयाचिया तरी. ७
तयाचिया हो खिडकीचिया, उगे,
खालीं, तुम्ही जाउनि हो रहा उभे ;—
तिच्या तयाच्या मग गोड लीला
ऐकूनि, पावाल तुम्ही मुदाला ! ८

## जरी तूं ह्या येथें

जरी तूं ह्या येथें असतिस सखे सौख्यद मळा
तुझ्या तेथें वा मी जरिहि असतों लोलुप तुळा,
तरी खासें झालें कितिक मजळा सांग अंसते ?—
दुरावूं, अन्योन्यां कवळुनि, दिलें आम्हि नसतें. १

त्वरेनें त्या क्रीडा मग उजळिल्या या रजनितें,
—सरेना जी खेपा करित असतां मी इथतिथें,
—तुला वा मच्चित्रें स्पर्श दिसवुनी लाजवुनियां,
पुन्हा तीं झोंकोनी, छळ तव करीं जी समायिया. २

'प्रिये' 'कान्ते' हीं मी मधुर अभिधानें मग किती
श्रुतिद्वारें चित्तीं तव द्रवडिलीं जाण असतीं!
न वा ऐसें:— तीं मी लिहुनि निजदन्तीं त्वद्धरीं,
तुवां तीं वाचाया मुकुर धरितों मी तव करीं! ३

'प्रिये' 'कान्ते' ऐशा मधुर अभिधानांस अधुना
लिहावें मी पत्रावर लकडिनें या अहह! ना?
परी तीं ही आतां अतितर सुटोनी थरथर
पुरीं हाताच्यानें नच करवती गे हरहर! ४

पुरीं हाताच्यानें नच करवती तीं प्रिय जरी,
न वा डोळ्यांच्यानीं क्षण बघवती तींवि अपुरीं;
पुसाया तीं इच्छीं परि कर धजेना म्हणुनियां
कराया सांगें तें स्वनयनजलांला रडुनियां! ५

———

१८८९

पहिली तीन कडवी एका पानावर व दुसरी दोन दुसऱ्या पानावर. दुसऱ्या पानाच्या मागच्या बाजूस मोडी सही आहे.

१

## अढळ सौंदर्य

अ७७ .

१ तोच उदयाला येत असे रे. अहो क्षितिजावर त्याच नवेलाय!
तेचि त्याचे कर न का कुंकुमानें वदन पूर्वेचें भरति संभ्रमानें ?
२ तेच तरु हे तैशाच पुष्पभारें लवुनि गेले दिसतात पहा सारे !
त्याच वल्ली तैसेंच पुष्पहास्य हंसुनि आजहि वेधिती या मनास !
३ कालचे जे कीं तेच आज पक्षी कालच्या हो ज्या त्याच आज वृक्षीं
बसुनि गाती कालचीं तींच गानें;—गमे प्रातःप्रार्थना करिति तेणें !
४ काल जो का आनन्द मला झाला तोच आजहि होतसे मन्मनाला !
कालचा जो मी तोच हा असें का?—अशी सहजच उद्भवे मनीं शंका !
५ अशी सहजच उद्भवे मनीं शंका काय समजुनि समजलें तुम्हाला का?—
असे अनुभव कीं—दिसावि एकदा जें पुन्हा बहुधा नच दिसों त्याच चीजें .
६ पुन्हा बहुधा नच दिसों त्याच चीजें, कसें मग हें वेधिलें चित्त माझें
आज फिरुनी या सूर्यतरुखगांनीं आपुलीया नवकान्तिपुष्पगानीं ?
७ म्हणुनि कथितों निःशंक मी तुम्हातें,—असे सुन्दरता अढळ जरी कोठें
तर करी ती सृष्टींत मात्र वास — पहा, मोहिल सर्वदा ती तुम्हास .

१८८५

१०

## अपरकवितादैवत.

प्रिये, माझ्या उच्छृंखल करुनियां वृत्ति सगळ्या,
तुझ्या गे भासानें कवनरचनेला वळविल्या;
अशी जी तूं देशी प्रबलकवनस्फूर्ति मजशी,
न होशी ती माझें अपरकवितादैवत कशी ?

बरें का हें वाटे तुज ?—तुजवरी काव्य लिहुनी
रहस्यें फोडावीं सकल अपुलीं मी मग जनीं ?
त्यजूनी ही इच्छा, मज सुखविण्या ये तर खरी,—
स्तनीं तूझें व्हावीं तर रचित काव्यें स्वनखरीं !

रचाया पूर्वीं तीं, रसनिधि असे जो मम उरीं—
जयाच्या काव्यें या खचित असती फक्त लहरी,
तुला तो द्याया मी निश्चिच किति हा उत्सुक असें !—
करांनीं गे आकर्षुनि निधि सत्या घे तर कसें !

२

असा मी द्याया हें हृदय जला पाळि सजलों,
पुन्हा कां तूं मातें तरि न दिसशी ?—वा, समजलों !—
पुण्यामध्यें ना मी, अहह ! बहरीं सोडुनि तुला,
शिकायाला आलों ?— तरमग तुझा दोष कसला ?

कुठे तूं ?—मी कोठें ?—जवळ असशी तूं कुठुनियां !—
निवेदूं हें कैसें हृदय तुजला मी इथुनियां ?
तुझेवीणे तुझेवर मजसि काव्यें च लिहिणें !—
उपायानें ऐशा मन विरहतापीं रमविणें.

विदेशीं गे भृंगा प्रियकर कळीला स्मरुनि तो
स्वगुंजालापांला फिरुनि फिरुनी घेत असतो,
वियोगाचीं तेंवी करुनि कवनें हीं तुज वरी
तयांच्या आलापां, स्मरुनि तुज, मी सम्प्रति करीं.

---

१८८

दोन पानांवर प्रत्येकी तीन तीन कडवी आहेत.

**'दुर्मुखलेला'**

वर्गांत एका शिक्षकानें मला 'दुर्मुखलेला' म्हटलें
त्यावरून माझ्या मनांत आलें

माझें शुष्क खरेंच हें मुख गुरो! आहे, तया पाहुनी
जाती प्रेक्षक सर्व ही विरस ते चित्तामधीं होउनी;—
हें सर्वां उघडें असूनि, वदुनी कां तें तुम्ही दाविलें?
तेणें भूषण कोणतें मग तुम्हा संप्राप्त तें जाहलें? १

"याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं,
तेणें सर्व हि डोलतील जन हे हर्षें कदाचित् भुवि"—
विद्यासंस्कृत त्या तुझ्या, क्षणभरी, मास्तिष्कतन्तूंवरी
येता नम्र विचार हा, तुज भला होता किती तो तरी! २


जे मुंग्या म्हणुनी मनीं समजशी या मंडळी भीतरीं,
ते पक्षी उडतील होउनि गुरो! व्योमीं न जाणो वरी;
राखेचीं ढिपळें म्हणोनि दिसती जीं, तीं उद्यां या जगा
भस्मीसात् करणार नाहिंत, अशी तुम्ही हमी द्याल का? ३

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या, चालावयाचा पुढें
आहे सुन्दर तो सदा सरसवाग्निष्यन्द चोहींकडे!—
तुम्ही नाहिं तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी!
कोणी ही पुसणार नाहिं—'कवि तो होता कसा आननीं?'!

१८८५

Worth prin

नावातील 'माझ्या मनात आले' हे शब्द आणि डाव्या समासातील 'worth printing' हे शब्द निळ्या पेन्सिलने मागाहून लिहिले आहेत.



—एका भारतीयाचे उद्गार—

१ संध्याकाळीं बघुनि सगळी कान्ति ती पश्चिमेला
वाटे सद्यःस्थितिच अपुली मूर्त ती मन्मनाला :
'हा! हा! श्रीचा दिवस अपुल्या मानलोनी प्रतीचे
गेला! गेला!' सहज पडती शब्द हे मन्मुखाचे.

२ तेणें माथें फिरुनि सगळें जें म्हणोनी दिसावें,
त्या त्या मध्यें स्वजनकुदशा वाचुनी मी रडावें ;—
'जेंजें चित्तीं बहुत करुनी तें सुषुप्तींत भासे'
वृद्धांचें हें अननितथ हो वाक्य होईल कैसें ?

३ प्रातःकाळीं रवि वरिवरी पाहुनी चालतांना,
होई मोदातिशय बहुधा सर्वदा या जनांना ;
पूर्वीची तो स्थिति परि करी व्यक्त ती वाचुनीयां,
एकाएकीं हृदय मम हें जातसे भंगुनीयां !—

४ 'हा जैसा का रवि चढतसे त्याप्रमाणेंच मागें
स्वोत्कर्षाचा रविहि चढता वाटता काय?' सांगें ;
जानोनी तो परि रथुनियां पश्चिमेशीं रमाव्या,
हासाचीही निबिड रजनी पातली ना छळाया!'

५ वल्लींनो! हीं सुबक सुमनें काय आम्हास होत?
युष्मद्गानें मधुर, खग हो! या जनां काय होत?—
आम्हा डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो!
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो!

६ आहे आम्हावर जंव निशा पारतंत्र्यान्धकारें,
वाहे जोंका उलट कुदशेचें तसें फार वारें,
सौख्याचें तोंवरि फुकट तें नांव घ्यावें कशाला?—
दुःखाच्या तोंवरि खचित तो भोग आहे आम्हाला!

७ आनन्दाचे समयिं मजला पारतंत्र्य स्मरून
वाटे जैसें असुख, तितुकें अन्य वेळीं गमे न!—
पाहोनीयां विषजरि गमे उग्र तें आपणातें,
अन्नामध्यें शतपट गमे उग्रसें पाहुनी तें !

८ देवा! केव्हां परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ?—
केव्हां आम्ही सुटति सहसा पंजरांतूनि, देवा,
राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हां ?

दोन पानांवर चार चार कडवी.

## नाहीं ज्यापरि डोंगळा

नाहीं ज्यापरि डोंगळा कधिंहि तो गेला ~~कडे~~ प्रणीं साखरे
नाहीं ज्यापरि चालला कधिंहि तो मार्जार साईकडे
नाहीं कृष्ण कधींहि ज्यापरि सरळ गेला दह्यांडीप्रत
तैसा येइन मी समुत्सुक गडे तुझ्याकडे चालत ॥१

भिक्षूनें निज दक्षिणा नच कधीं स्वीकारिली जैंविं कीं
तृषानें नच ज्यापरी धरियली गंगाजळी हस्तकीं
हंसानें बिसिनी जशी न धरिली चंचूपुटीं आदरें
तैशी घेइन मी तुला निजकरीं तारे! त्वरेनें बरें ॥२

जैशी ती मलयानिलें न वनिका केव्हांहि आलिंगिली
नाहीं ज्यापरि पर्वती कधिंहि ती धाराधरें वेष्टिली
जैशी इन्द्रधनुष्करें उडुपथें मेघालि नाश्लेषिली
आलिंगीन तशी तुला दृढ उरीं गे मंजुले! चांगुली ॥३

मद्यासक्त नरें जशी नच कधीं कान्ते! कुपी झोंकिली
भृंगानें अथवा जशी कमलिनी नाहीं कधीं चोखिली
राहूनें हि न सेविली सखि! सुधाधारा जशी सत्वर
तैशी सेविन गोड ओष्ठवटिका तूझी गडे! सुन्दर ॥४

## 'बायांनीं धरुनी बळे'

बायांनीं धरुनी बळें प्रथम जी खोलीमधें घातली,
लज्जाव्याकुल होउनी रडत जी कोनीं उभी राहिली,
तीचे अश्रु अळेंबळें पुसुनियां, कोणी प्रयत्नें तिला
घेऊनी कडिये असेल शयनीं नेण्यास तो लागला ! १
'ये आतां जवळी!' म्हणोनि चुटकी देतो बरें हा कधीं,
ऐशी उत्सुक होउनी, पदर तो घेऊनि ओठांमधीं,
शय्येसन्निध नाथ पाहत उगी लाजेमुळें बैसली,
कोणाचीं असतील लोलनयनें तीचेवरी लोभलीं ! २
पानांच्या तबकांतुनी जवळच्या, ताम्बूल जो दीधला
कान्तेनें स्वकरें मुखांत दुरुनी, चावूनि तो चांगला,
त्याचा भाग तिच्या मुखांत अपुल्या जिव्हेमुळें द्यावया,
कोणी घेत असेल पुष्टजघनी अंकावरी ती प्रिया ! ३
लज्जा सोडुनि जी परन्तु विनयें अंकावरी बैसली,
हातांची रचिली जिनें पतिचिया कण्ठास हारावली,
तीचे उच्च कुचद्वया अपुलिया वक्षावरी दाबुनी,
कोणी पीत असेल ऐहिक सुधा वेगें तिला चुम्बुनी ! ४
केव्हां दन्त मुखावरी, स्तनतटीं केव्हां नखें रोवुनी,
गाढालिंगन देउनी, निजकरें श्रोणी जरा तिम्बुनी,

केव्हां अंगुलि त्या हळू फिरवुनी अंकीं स्वकान्तेचिया,
कोणी यत्न असेल तो करित ती कामोद्धता व्हावया ! ५
सान्निध्यांत पडो जराहि नच तें कान्तेचिया अन्तर,
यासाठीं कचपाश सुन्दर तिचा सोडूनियां सत्वर,
झाले केश सुरेख दीर्घ मग जे काळे तिचे मोकळे,
त्यांहीं घेत असेल कामुक कुणी बांधूनि दोन्ही गळे ! ६
कामानें जळतों परन्तु विरहें होऊनि मी विव्हळ;
आहे ना तुजला असाच सखये ! जाळीत हा गे खळ ?
कैशी होशिल शक्त या रजनिला कंठावया सम्प्रति !
माझीही छळणूक ती करितसे कंटाळवाणी अति ! ७

---

पुढें ९८७.

१५

## किरातार्जुनीय— सर्ग १ला

श्रीमत्कौरवराजराज्यशकटश्रीची प्रजापालनी
कैशी वृत्ति असे?-भली उलट वा?-वार्ता अशी काढुनी
आणाया, द्विजवेष देउनि असा, होता दुरी धाडिला,
द्वैतारव्यीं विपिनीं किरात फिरुनी धर्मासि तो भेटला॥

२ त्यानें नम्रपणें प्रणाम करुनी राजेश सन्मानिला,
शत्रूनें मग जिंकिलें धरणिला तें वृत्त तो ठाकला
सांगायास, तयीं व्यथा नच मनीं त्याच्या उभी राहिली
कांकीं उक्ति हितेच्छु ते न वदती खोटी जरी चांगली

३ दुष्टांच्या करण्या विघात हृदयीं जो धर्म इच्छा धरीं
एकान्तीं मग घेतली वनचरें त्याची अनुज्ञा शिरीं;
जीच्या अर्थ उदार निश्चित तसा, वर्णी जिच्या माधुरी,
बोलाया सरसावला मग असा त्याचेसवें वैखरी

४ "ओळे हेराचे होत हे नृपतिचे, यालागुनी राजया,
त्यांहीं त्यास बरें नसे ठकविणें, हें बोलणें कासया?
तेव्हां साधु असाधु वा ममवचा सोसावया अर्हशी,
वाणी कारण दुर्लभा हितकरा चेतोहरा ही तशी॥

५ "स्वामीला नच जो हितासि कथितो, तो हो सखा कायसा?
मित्राचा हितवाद ऐकुनि न घे, स्वामी म्हणों तो कसा?-
अन्योन्यां अनुकूल होउनि सदा जे या जगीं नांदती
राजे आणि अमात्य, त्यांना करी ती राज्यलक्ष्मी रति॥

एकंदर ६ पाने. दुसऱ्या पानामागे "नरपति..." श्लोक (पृष्ठ बावीस पाहा). २३ ते २६ ही कडवी आणि सन पाचव्या कागदामागे.

६ तीं दुर्बोध निसर्गसिद्ध, चरितें कोठें नृपांचीं बरें!
राजन्! मत्सम अप्रबुद्धमतिची कोठें बरें पामरें!
ऐसें हें असुनीहि गुप्त अरिची मी काढिली बातमी,
हा तों स्पष्ट तवप्रभावचि असे, ही बोलतों बात मी ॥

७ "तुम्हापासुनि तो पराभव मनीं शंकी, जरी काननीं
तुम्ही राहतसा, सुयोधन जरी बैसे स्वराज्यासनीं;
या लागूनि, दुरोदरीं मिळविली पृथ्वी, अतां इच्छितो
न्यायानें वश ती समग्र करण्या, गांधारिचा सूनु तो ॥

८ "जिंकायास तुम्हास तो खल सदा इच्छा धरूनी, जनीं
कीर्तीला पसरीतसे, निजगुणां कार्यीं भल्या लावुनी;
मोठ्याशीं बरवें रिपु खल हि खलस्नेहावुनी फारसें,
ज्या अर्थी अति उन्नतीस सहसा लोकांस तें नेतसे ॥

९ "कामाद्यारि सहा हटें हरवुनी, वैवस्वतें घातली,
ती दुष्प्राप्यहि राज्यरीतिपदवी पावावयाची भली
इच्छा तो धरुनी मनीं, अलसही टाकूनि, रात्रंदिन
नेमें वाढवितो पराक्रम, नयें नागोति दुर्योधन ॥

१० "भृत्यांला अपुल्या निबद्धहृदय स्नेह्यांपरी लेखितो,
स्नेह्यांलाहि समान मान अपुल्या बंधूंसवें दाखितो,
कौशल्यें निजबांधवां, दउनुनी सारी अहंभावना,
राजाहूनि अम्ही कमी न च, अशी लावी करूं कल्पना ॥

११ "आसक्ती कवणावरीहि न कधीं तो ठेवितां फार ती,
चित्तीं किन्तु समानभक्ति धरुनी, धर्मार्थकामांप्रती
आराधी उचित क्रिया करुनियां, सारे गुणासक्त ते
होती मित्र तिचे, परस्पर कसे व्हावेत ते बाधते? ॥

१२ "दानावांचुनि साम तें नच कधीं सम्पूर्ण त्याचे असे
सत्कारावीण दान तो नच कधीं लोकांमधीं देतसे
स्फूर्तीला न कधीं तशी चढतसे तत्सत्क्रिया शालिनी,
पात्रांच्याचि जनांचिया गुणगणें संबोधिल्यावांचुनी

१३ "द्रव्याते अभिलाषुनी न, अथवा त्या क्रोधामुळें वाज, तो
राज्ञांचा परि धर्मच स्मरुनियां, दुष्टां वशी दण्डितो ;
धर्मातिक्रम केलियास, रिपुच्या पुत्राचियाही परी,
न्यायाधीश जनीं असे कथियली तो तीज शिक्षा करी

१४ "आत्मीयास सभोवतींनि रचितो चाणाक्ष संरक्षणी,
निःशंकाकृतिला धरो वरिवरी, शंकी जरी तो मनीं ;
कोणी कार्य समाप्तिला मिळवितां, तो पारिसंतोषकें
अर्पी, तत्कृतकृतज्ञता पसरिती लोकात तीं गायकें

१५ "योग्यायोग्य ~~पात्रापात्र~~ विचार पाहुनी, सदा पात्रीं अशा तो तरीं
सत्कारा सुचवावयास अपुल्या, नाना उपायां करी ;
अन्योन्यांत, उपाय ते, करुनियां स्पर्शाजणू, सम्पदा
देती आणुनियां चिरस्थिर अशा, दुर्योधनाला सदा

१६ "भूपांचे रथ आणि अश्व भिडती ज्यामाजि रात्रंदिन,
तें दुर्योधनमन्दिराजवळचें ओलें असे अंगण,
गन्धें सातवणाचिया सदृश त्या दानोदकें, राजया,
भेटी दाखल धाडिले नरवरीं नागेन्द्र जे त्यांचिया

किंवा—

"भेटी दाखल धाडिले नरवरीं नागेन्द्र जे त्यांचिया,
गन्धें सातवणाचिया सदृश त्या, दानोदकें, राजया
तें दुर्योधनमन्दिराजवळचें ओलें असे अंगण,
भूपांचे रथ आणि अश्व भिडती ज्यामाजि रात्रंदिन

१७ "भूयःकर्षण केलियाविण जिथे संपादिती कर्षक
सौकर्यें सगळीं पिकें विपुल, तो राजा! नदीमातृक
मोठा कौरवदेश. आक्रमितसे उत्कर्षसोपान रे,
ज्याची क्षेमकरें धुरा धरियली दुर्योधनाचे करें

१८ "त्राणोपाय करूनि, तो ~~[illegible]~~ठेवुनी बाधा दयावान् दुरी,
देशोत्कर्ष करी, म्हणूनि धवला कीर्ति स्वयें त्या वरी;
त्याचे सद्गुण पाहुनी द्रवुनियां चित्तामधे मेदिनी,
पान्हा या वसुमूर्तिला वसुमिषें ती सोडिते नन्दिनी

१९ "ज्यांचें तेज विशेष, मान धन ज्यां, प्रख्यात ही
जे युधीं,
ज्यांची वृत्ति चळे न, सोडुनि न जे जाती सनाथा कधी,
धन्वी यापरिचे सुयोधन धनें पूजीतसे तो बळी,
तेही तत्प्रिय साधण्या नरहरे! देती जिवाचा बळी ॥

२० "कर्तव्यें अपुलीं करूनि सगळीं, हेरां भल्या योजुनी,
राजांच्या सगळ्या नृपा! मसलती तो घेतसे जाणुनी;
उत्कर्षा करुनी हितास करिती ऐशीं फळें पाहुनी;
धान्याच्या परि गूढ त्या खटपटी याच्या, कळे हें जनीं।

२१ "त्याला सज्य करावयास न कधीं कोदंड तो लागला
त्याचा सुन्दर चेहराहि न कधीं कोपामुळें भंगला;
जैशीं तीं सुमभूषणें नरमणे! त्याचीं तशीं शासनें
पृथ्वीचे पति सर्वही निजशिरीं घेती गुणांकारणें।

२२ "ज्याचें अप्रतिकार्य शासन, असा तो यौवराज्यावरी
स्वामी त्या नवयौवनोद्धत अशा दुःशासनाला करी
भूपा! आणिक तो सदा, अनुमतें विद्वान् पुरोधांचिया
यज्ञीं तृप्त करावया हुतवहा अर्पी हविःसंचया

"जीज्यातील समस्त भूपजनमुनी याला सद्दावागती, २३
ती अप्वारिधि भूमि हा नियमितो आहे जरी सम्प्रति,
धाकानें तुजसिवा तरी झुरतसे हा राजयात्!अन्तरीं !–
लोकांची रिपुता निरन्तर अहो दुष्टावसाना खरी !

"कोणी भाषणसंगतींत वदतां नत्मासती तुजसिवा, २४
चित्तीं आठवुनी विलक्षण अशा शौर्यासि पार्थाचिया,
जैसा दुःसह मन्त्रशब्द अहितो ऐकूनि, हा ही तसा
खालीं घालुनि आनना मथित कीं होतो मनीं फारसा !

किंवा,
"कथाप्रसंगें तवनाम बोलतां
कुणीहि, आखण्डलसूनुशूरता
स्मरोनि, नम्रानन तो जळे मनीं,
सुदुःसहें मंत्रपदें जणों (जसा) फणी .

"यासाठींच तुला अमात्य करण्या आहे टपूनी बरें !– २५
जें कांहीं करणें असेल तुजला तें तूं पहा सत्वरें !–
लोकांचीं वचनें जमा करित जे माझ्यापरी हिंडती,
वार्तायुक्ताचि कुन्तिकात्मजवरा! त्यांच्या गिरा राहती ! "

वदूनि हें, घेउनि पारितोषिक, २६
निघूनि गेला वनवासिनायकः
रिघूनि कृष्णासदनीं; युधिष्ठिर
स्वबान्धवां तें वदला सविस्तर

[illegible] १८८७

नरपतिहितकर्ताद्वेष्यतांयातिलोके ३० श्लोकाचें भाषांतर.--

नरपतिहितकर्ता होतसे द्वेष्य लोकीं ॥
जनपदहितकर्त्या लागुनी भूप टाकी ॥
प्रकृति उलट ऐशी या द्वयाची म्हणून ॥
नृपजनपद यांचा कार्यकर्ता मिळे न ॥ ३०

गोष्टी घराकडिल मी वदतां गड्यारे

गोष्टी घराकडिल मी वदतां गड्यारे
झालें पहा कितिक हें विपरीत सारें!–
आहें घरासचि असें गमतें मनास
ह्या येथल्या सकल वस्तु उगीच भास! १

ही देख म्हैस पडव्वींमधिं बांधलेली
रोमंथभाग हळु चावित बैसलेली.
मित्रा! गजांमधुनि या पडवीचिया रे
मोजा पहा क्षणभरी रजनीचिया रे!– २

डोळ्यांत बोट जरि घालुनि पाहशील
अंधार तो अधिकची तुजला दिसेल!–
अंधार—जो फलक होत असे अम्हास
चेतोनिबद्धजनचित्र लिहावयास! ३

आवाज 'किर्' रजनी वदतेच आहे
'घों घों' असा पवन नादहि बोलताहे
ऐकें पलीकडुनि बेडुक शेतमाजीं
पर्जन्यसूक्त सगळे मनसोक्त गाती। ४

हीं चारपांच चढुनी हळु पायऱ्यांनें
या ओसरीवर अतां जपुनीच येणें!
हें ऐक रे 'टकटका' करितें घड्याळ
या शान्ततेंत गमतें कुटितेंच टाळ! ५

श्री उावीस हा बघ निरेखुनि एक माचा
निद्रिस्थ त्यावरि पिता अतिपूज्य माझा
त्याचा खरोखर न मी क्षण पुत्र शोभें
तो सर्वदा जरि म्हणे मज पुत्र लोभें ! ६
तातास या बघुनि या हृद्यांत खातें
होऊन हें हृदय विव्हल सर्व जातें !
त्याच्या तरी पद्युगा वरि या पडूनी
~~[illegible]~~
न्हाणूं तयास मग का न द् आंसवांनी ? ७
ता ताचिया बघ गड्या उजवेकडेला
बापू असे तिथ बरें अमुचा निजेला
अज्ञान तो चपलधी परि बाल आहे
त्याचेविशीं मममनीं अतिलोभ राहे ! ८
बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?
तूं देशकारण करूं झटशील काय ?
बापू ! जनांत दिवटी धरशील काय ?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ? ९
मित्रा ! धरीं सुदृढ हस्त मदीय फार
द्वारास आउसर घट्ट असेल थोर
द्वाराचिया लर फटींतुन आंत जाऊं
सानंद सुस्थित घरांतिल सर्व गाऊं ! १०

मित्रा! इथे कितितरी मज हर्ष होई
येथें हवा मधुर, निश्वसनांत येई
नाहीं कधीं हि बुधवारवनांत जैशी
वाटेवरी चतरशिंगिचिया न तैशी ! ११
मित्रा! असा एकुच ये उजवेकडेस
खोली पहा पद्यक ही किति ऐसपैस;
निद्रावश स्वजन येथ, बघून यांस
चिया न उकल्या फुटती कुणास ? १२—
ती एक खाट अवलोक समोर आतां
आहे सुषुप्तिवश तेथ मदीय माता,
तीचे कुशींत निजली दिसते मदीय
भीमा स्वसा, बघुनि ती मज हर्ष होय . १३
मत्कारणें स्तवुनि देव, निजाबयातें
आलीस तूं खचित गे असशील माते!—
मोठे त्वदीय उपकार, जरातरी ते
जातील का फिटुनि या तनुसहस्त्रें ? १४
खालीं मदीय भगिनी दिसती निजेल्या
गोष्टी जयांस कथितां न पुऱ्याच झाल्या !
दूर ती कोण दिसते ?—निजली असूनी
जी श्वास टाकित असे मधुसूनी मधूनी !— १५

कान्ताच ही मम! — अहा! सखये! मदीय
स्वप्नें, अतां तुज ~~पुढें~~ गडे दिसतात काय? —
आतां असो! पण पुढें तुजला दिसेन
स्वप्नें तुझीं मग समग्र तुला पुसेन!
मागील दारिं सखया! तुळशीस आतां
वन्दू, जिला मम जनीं नमिला स्व माथा! —
सोडूनि गांव वळणें अमुच्या घराचें,
येऊं घरा परत खासगीवालियाचे!

---

१ला २२ ऑ १९८०

१७

चाल– 'हरिची भगिनी म्हणे सुभद्रा' किंवा 'पंचतुंडनररुंड–'

मुळा मुठेच्या तीरावर

तो :—

" मुळामुठेच्या हिरव्या सुन्दर या तीरांवर, खिन्न अशी,
इकडे तिकडे स्फुंदत सुन्दरि! वद मजला तूं कां फिरशी? ॥
क्षण पाण्यावर काय पाहसी!– काय असी मूर्च्छित पडसी!–
~~वस्त्र फाडिसी~~
पुनरपि उठुनी वक्षस्थल गे काय असें बडवुनि घेसी! ॥
उठसी!–बससी!–पडसी! क्षणभर वस्तीवर दृष्टी देसी!–
वस्त्र फाडिसी! दुःखावेगें केशहि तोडुनि यां घेसी! ॥
हिंडत हिंडत, तुटल्या केशीं फुलें गुम्फिसी वनांतली
तीरीं जाउनि त्यांचा अंजलि सोडुनि देसी रडत जळीं!
काय असा तर घाला तुजवर पडला, मजला वद बाले!–
जेणें करुनि स्थल हें तुजला रम्य असुनि शून्यचि झालें!" ॥

ती :—

" रम्य तुसें हें तीर आणि हें पात्रहि होतें मुळामुठे!
रमणीयपणा पण तो आतां गेला सरितें! सांग कुठें?" ॥

तो :—

"मुळामुठा ही आतां सुद्धां रम्य असे गे पहा पहा!
सुन्दरिच्या पण नेत्रजलांनो! क्षणभर तुम्ही रहा रहा!"

ती :—

"नाहीं! माझ्या नेत्रजलांनो! अखण्ड येथें वहा वहा!
रमणीयपणा परलोकीं मग मन्नेत्रांनो! पहा पहा!"

तो :—

"रमणीयपणा मनोहारिणी! या लोकांतचि अजुनि असे!
तुझ्या बरोबर तो जाइल कीं काय, असें भय वाटतसे!" ॥

ती :

" रमणीयपणा स्वयें मूर्तिमान् प्रियकर होता होता!–
नेला! नेला! तो या नदिनें! हाय हाय! आतां आतां! ॥
तीरांवरि या तुझ्या एकदां दिसला जो, गे मुळामुठे!
रमणीयपणा हाय हाय! तो न दिसे. आतां मुळीं कुठें!" ॥

तो :

"ओळे पुसुनी चलगे सुन्दरि! पैल पारीच्या गांवाला!–
संमति अपुली दे मजला तूं राणी माझी व्हायाला ! ।।
घरचा मोठा लष्करांत ही अधिकारी गे मी मोठा !–
दासी आणि दासींचा सजणे! तुजला नाहींगे तोटा!।।
सवाशेर सोन्यानें रमणी! तुजला मढवुनि काढिन मी!–
पाणिदार. या सवाशेर गे मोत्यांनी तुज शृंगारिन मी!" ।।

ती :

"सानेंमोतीं प्रिय-मज होतीं, किंवा होतीं वन्य फुलें,
तें मन्नाथा! लग्ना आधीं तुला समजलें कशामुळें?
उद्यां आमुचें लग्न जाहलें असतें!– मग आम्ही दोघें
या तीरांवर फिरलों असतों वन्यसुमें शोधित संगें! ।।
तुम्ही लवविल्या फांद्यांची मी फुलें गडे असतीं खुडिलीं!–
त्यांची जाळी माझ्या अलकीं असती तुम्ही गुम्फियली! ।।
न कळे कैसें तुम्हांस कळलें आवडती मज वन्य फुलें!–
म्हणुनी येथें आलां त्यांना जमवाया मत्प्रीति मुळें! ।।
येथें आलां तर आलां! पण ह्या दरडीवर ~~[illegible]~~?
माझ्या करितां पुष्पें खुडितां अहह! घसरुनी मज मुकाल! ।।
आलें! आलें! मी हि जिवलगा! त्याच तरी या मार्गानें!"
असें वदुनि ती चढूनि गेली ह्या दरडीवर वेगानें! ।।

तिनें जवळची फुलं तेथलीं बरींच भरभर हो खुडिलीं!–
आणि सख्याच्या          ओंजळीं खाली सोडुनियां दिधलीं! ।।

दिव्य अप्सरा भ          विसरल भानाला!
~~[illegible]~~ पुढें ती "पु॰" वांकली, धावुनि जवळी तो गेला!
~~[illegible]~~ पण——! मित्रांनो! पुढें कवीला कांहींच सुचे सांगाय!
तुम्हिच विचारा मुळामुठेला, जाल हवा जेव्हां खाया! *

* ह्या ओळी पानाच्या मागच्या बाजूस खाली लिहिल्या आहेत.

-च्या शोभे-

आगबोटीच्या कांठाशीं समुद्राकडे पहात उभ्या राहिलेल्या एका तरुणीस

अंक १ला. तरंग १ला

अहा! गे स्वयंभू सृष्टीच्या वरतुनु सुते! निश्चयपणें
पहा अब्धीच्या या तरल लहरींचें उसळणें!—
मनोराज्यीं जैशा विविध हृदयीं क्लृप्ति उठती
तशा ना अब्धीच्या तरल लहरी या विलसती? 1
'मनोराज्याला या बघ जलधिच्या, फार विरळे!'
कशाला हें तूतें फुकट म्हटलें मी?—नच कळे!
स्वयें अब्धीला तूं बघत असतां पाहुनि, मुळीं,
'सुता तूं सृष्टीची' मम हृदयीं ही मूर्ति ठसली. २
स्वयंभू सृष्टीचे, तरमग, सुते! कैंवि दिसती?
कशा या सिंधूच्या चपल लहरी गे उगवती?—
जशा कांहीं नाड्या अनवरत देहांत उडती
तशा ना सिंधूच्या चपल लहरी या उचलती? ३
कसा गे अस्ताला द्युतिपति अहा! हा उतरतो?
कसा या दिग्भागीं सदरुणपणा हा पसरतो?—
जणो, सोडोनीयां धरणिवनिता ही, दिनमणि
विदेशाला जातो, प्रकट करितो राग म्हणुनी! ४
पहा! आकाशीं गे सुभग तरुणी! या दिनकर-
प्रभेच्या लालीनें खुलत असती हे जलधर!—
जसे क्रीडाशैल त्रिदशललनांचे तळपती!
जशीं केलिद्वीपें अमरमिथुनांचीं चमकती! ५

निसर्गोद्यानींचे अमृततारके

सदर कविता तीन फूलस्केप बंदांवर लिहिली आहे.

जिथे सौन्दर्याची तरुणि! परमा कोटि विलसे,
जिथे आनन्दाची अनपकृत ती पूर्ति हि वसे,
अशा या आकाशोदधिमधिल या द्वीपनिचयीं
रहायाचें तूझ्या अभिमत असे काय हृदयीं ? ६

मलाही या पृथ्वीवरिल गमतें गे जड जिणें !–
इथे या दुःखांचें सतत अपणांला हडवणें ! मनुजांला दडपणें
इथे न्यायस्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो !
नरालागीं येथें नरच चरणांनीं तुडवितो ! ७

म्हणोनी, आकाशोदधिमधिल त्या द्वीपनिचया
निघाया, टाकूं या कुपुति अनलज्ञौके वरुनि या !–
शरीरें–जीं दुःखप्रभव– मग तीं जातिल जळीं !
सखे ! स्वात्मे द्वीपें चढतिल पहाया वर भलीं ! ८

जरी दुःखाचें हें निवळ अवघें सर्व जगणें,
तरी या देहाचा सुखदचि असे त्याग करणें !–
सुखासाठीं एका सतत झटतों आपण जरी,
तरी देहत्यागें सुख अनुभवूं आपण वरी ! ९

अशुद्ध स्वार्थें जीं नयनसलिलें मानुष सदा,
शिवायाचीं देहां मग अपुलिया नाहिंत कदा !–
जलस्था त्या देवी, फणिपतिसुता सुन्दरमुखी,
स्वबाष्पें या देहांवरि हळुहळू ढाळतिल कीं ! १०

प्रवालांच्या शय्ये निजवितिल त्या देवि अपणा,
प्रवालांला ज्या हा त्वदधर गडे ! जिंकिल पण ;–
तशी मोत्यांची त्या पसरितिल गे चादर वरी,
सरी ज्या मोत्यांना न तवरदनांची अणुभरी ! ११

शिराखालीं तूझ्या भुज मम गडे! स्थापितिल हा,
कण्ठीं तसा माझ्या ~~कटीं~~ कर तव सखे! सुन्दर, अहा! +
जलस्था त्या दैवी चरण अपुले गुंतवितिल,
मुखें लाडानें त्या निकट अमुचीं स्पर्शवितिल! १२
अशा थाटानें त्या निजवितिल गे सागरतलीं,
नसे याचेमध्यें नवल विमले! जाण मुदलीं, +
+अशा रीतीचें ~~[illegible]~~
नरांच्या जिव्हा तें म्हणोतिल जरी पाप अहह! १३
पयःस्था त्या दैवी, फणिपतिसुता पंकजपदी,
स्वयंभू सृष्टीचे नियमचि सदा मानिजति सुधी. – +
स्वयंभू सृष्टीचे नियम सुधरूं पाहत असे
नराच्या ऐसा या कवण दुसरा मूर्ख गवसे? १४
पयोदेवी तूझा बघुनि कबरीपाश निखिल
स्ववेणीसंहारा धरतिवरतीं त्या करितिल;–
तुझी नेसायाची बघुनि सगळी मोहक कला
स्ववस्त्रप्रावारीं उचलतिल गे ती अविकला. १५
कदाचित्, या दैवी, आणि, फणिमणींच्या पण मुली,
सजीव प्रेतें तीं करितिल गडे! दैन्य अपुलीं!–
पयोदेवी तेव्हां विचरशिल तूं सागरतलीं;
तुझेसंगें मीही विचरिन पयोदेव कुशली! १६
प्रवाळांची तेथें विलसत असे भूमि सुपिक,
पिकें त्या मोत्यांचीं विपुल निघती तेथ सुबक,
सुवर्णाचीं झाडें, वर लटकती सुन्दर फळें
फुलें ही रत्नांचीं; बघुनि करमूं काळ कमळे! १७

समुद्राच्या पृष्ठीं सखि! बघत बालार्कसुषमा
उभी बैसूं, त्याच्या अनुभवित मंदोष्ण तिरमा!—
धरूं दोघें वस्त्रा, जवपवन कोंडूं अडवुनी,
शिडाच्या योगें त्या फडकत सरूं सिंधुवरुनी! १८
कधीं लीलेनें तूं बसशिल चलद्दैवझषकीं:
फवारे तो जेव्हां उडविल जलाचे मग, सखी,
तधीं दावायाला तुजसि मघवा प्रेम अपुलें,
स्वचापाचें तूझेवरि धरिल गे तोरण भलें! १९
कधीं कोणी राष्ट्र प्रबल, दुसऱ्याला बुडविण्या,
जहाजें मोठालीं करिल जरि गे सज्ज लढण्या,
तरी, सांगोनीयां प्रवर वरुणाला, खवळवूं
समुद्रा, तेणें त्या सकल खलनौका चुथडवूं! २०
गुलामां आणाया निघतिल कुणी दुष्टनर ते,
तरी त्यांचीं फोडूं अचुक खडकीं तीं गलबतें!—
नरांलागीं त्या गे त्वरित अधमां ओढुनि करीं
समुद्राच्या खालीं दडपुनि भरूं नक्रविवरीं! २१
प्रकारें ऐशा या जरि वरुण-राज्यांत कुशलें
वसूं आनन्दानें समयगणती जेथ न चले,
तरी त्या आकाशोदधिमधिल त्या द्वीपनिचयीं

१८

शिरीं त्या मेरूच्या विलसत असे नन्दनवन;
अधस्तात् शोभे ती अमरनदि तद्बिम्ब धरुन
~~तिथे देवांसंगें सुधा~~
वनीं त्या, देवांच्यासह अमृत तें प्राशन करूं;
तशीं रम्भांसंगें चल! सुरनदीमाजि विहरूं! २७

डिसेम्बर १८८७.

---

~~अंक १~~. तरङ्ग २रा.—

## जास्वंदीचीं फुलें आणि पारिजांताचीं फुलें.

पहिलीं :—

“मातींत खालीं पडणें तुम्हांला
कैसें रुचे, हें न कळे अम्हांला.
ही रक्तिमा स्वीय अम्ही, पहा रे,
शाखांवरी नाचवितों अहा रे!” १

दुसरीं :—

“ती रक्तिमा घेउनियां खुशाल
शाखांवरी सन्तत का रहाल?
मरून मातींतचि या पडाल,
अज्ञात ऐशा थडग्यांत जाल! २

“आलीं न तें यो अमुच्या म्हणून
तो डौल शाखांवरला गणून
खोटा, लिहाया थडग्यावरी तें
स्वनाम गन्धें यरतोंचि येथें! ३

## अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न.

मुळें अंत्यजांचीं बिचारीं मजेनें
पथाच्या अहो खेळताती कडेनें;
दुरूनी तिथें विप्र डौलांत आला,
वदे काय तो मुग्ध त्या बालकांला. १

"सरा रे दुरी पोर हो म्हारड्यांचे!
चला! खेळ हे मांडले डोंबलाचे!
निघा! वाट द्या लौकरी ब्राह्मणातें!"
पळालीं मुलें;— कोण राहील तेथें! २

परी एक त्यांतील तैसाचि ठेला;
उगारी तधीं दुष्ट तो यष्टिकेला,—
म्हणे—"गाढवा! सांवली ना पडेल!
दुरी हो!— पहा हाच खाऊ मिळेल!" ३

तधीं बाळ तोही घराला निघाला,
मनीं आपुल्या या करी चिन्तनांला:
"जरी त्यावरी सांवली माझि गेली,
तरी काय बाधा असे ठेविलेली?" ४

घरीं जाउनी तेंचि माते विचारी;
वदे तेधवां त्यासि माता बिचारी:—
"अम्ही नीच बा, आणि ते लोक थोर;
तयां पाहतां होइजे नित्य दूर." ५

सुधें बोलली!—हें परी काय तीतें
कळे कीं जगीं नाडुनीयां परांतें,
म्हणूनी करूनी अधी चोर पाप,
जनीं गाजवीं मानवी स्वप्रताप!

## कामान्धत्व.

"O me! what eyes hath love put in
my head"
Shakespeare.

१ कामानें मजला अहो! कुठुनि हे डोळे दिले कायसे!—
वस्तूंची स्थिति ती खरी न मजला योगें तयांच्या दिसे:
किंवा ते बघती खरें जर म्हणूं, कोठें पळाली मती?—
जी हे दोष मदीय नेत्रविषया, जाणूं कशी सत्य ती?
२ खोटे नेत्र मदीय जें बघाते तें आहे जरी सुन्दर,
तैसें तें न असे, म्हणोनि जग हें बोले बरें कां तर?
तें नाहीं रमणीय हें जर खरें, आहे खरें हें तरी—
लोकांचीं नयनें तशीं न असती कामी जनाचीं खरीं:
३ त्रस्तें जीं अवलोकनें, धरुनि जीं बाष्पांमुळें राहिलीं,
तद्‌थ्यालोकनदृक्ष कामिनयनें होवींत तीं कोठली?
माझ्या या नयनां दिसेंन, म्हणुनी आश्चर्य नाहीं मुळीं,
अभ्राच्छादित तैं बघूं न शकतो आदित्यही तो बळी.
४ व्यंगें प्रियेचीं बघतील, मोकळे
कामी जनाचे जर नेत्र राहिले,
म्हणूनि का आणुनि त्यांत आंसवें,
हे धूर्त कामा! करितोस अंधळे?

चवरक्याच्या मागे डकविलेल्या भागात –११–८८ अशी तारीख आहे.

## जायाचें जग का असेंच?

*Doth then the world go thus, doth all that move?*"

*W. Drummond.*

१ जायाचें जग का असेंच! सगळें ऐसेंच का चालणें?
हेसा न्यायच का जगामधिं अम्हालागीं सदा लाभणें?
सर्वाला नियमी तसे दृढ असें तें हेंच का शासन?
देवांनों असलेंच काय तुमचें सामर्थ्य द्या सांगुन.
२ जे आत्मे अपनीतिच्या निबिडशा धुंदीमुळें अंधळे
त्यांशीं अन्ध विधी सदैव करितो सख्यत्व कीं आपुलें;
ते कीं, आणिक, हे सुनीति! धरिती भक्ती तुझीयावरी,
जाती लोटत वादळामधिं अहा! ते जीर्ण पर्णांपरी!
३ सर्वांचा अवघ्या नियामक असे का हो कुठे ईश्वर?—
तो आहे, मग सज्जनें हळहळती दुःखामधें कां तर?
नम्रत्वावरि हाय! उद्धटपणा क्रोधें सुख कां तें करी?
कां हो हाल तुटूनि हंत! पडती निर्दोषितेच्यावरी?
४ बा धाव देवा! तर ये त्वरेनें!
ही दुर्दशा थांबिव रे दयेनें;
बा, साधु आणीक असाधु यांचें
समप्रकर्षी युग आण साचें!

## ईश्वराचा ग्रन्थ.

"Of this fair volume which we World do name"

W. Drummond.

१ हें हो पुस्तक रम्य ज्यास 'जग' ही संज्ञा अम्ही दीधली,
अस्थ पूर्वक पत्रकें जर अम्ही त्याचीं भलीं चाळिलीं,
केलें पुस्तक हें जयें, जपुनि जो शुद्धी हि याची करी,
बुद्धी थोर, अपूर्व ही कुशलता वाचूं लयाची तरी :
२ त्याची शक्ति, अतीव अद्भुत अशा शक्ती हि जी दाविते,
त्याची पत्लक दृष्टि अप्रतिहता सर्वत्र जी पोंचते,
त्याचा न्याय न जो क्षमा करितसे गर्विष्ठ दुष्टां कधीं; —
वाचूं हीं सगळीं अखण्डित अशीं प्रत्येक पत्रामधीं.
३ हा! हा! आम्हि परन्तु मूर्ख सगळे, त्या अज्ञ बाळांपरी
पुढे रंगित, पत्रकें कनाकितें, आनन्दतों यांवरी;
गौणाला पुरवूं स्वलक्ष्य, अवघें उत्कृष्ट टाकूनियां;
त्या मोठ्या कविचा अम्हीं न झटतों इष्टार्थ जाणावया.
४ किंवा, दैववशात् कांहीं
पाहिलें पुस्तकांत या,
तर तें बहुधा चित्र
कडेला पृष्ठकाचिया !

रा० वा. ब. पटवर्धन, मु० नागपुर, यांस.

प्रगल्भा त्या नारी मधुर जगतीं साच असती,
परी व्रीडायुक्ता मधुरतर मुग्धाचि गमती;
बिजेची ती ये ना कधिंहि पुनवेलाअणु सरी,
बरी ही याठायीं सरस उपमा लौकिक खरी. १

किंवा, त्या युवती जधीं पतिचिया नामास घेती मुखें,
तेव्हां तें परिसूनियां जन जरी हे डोलती हो सुखें,
तें घ्याया तरि त्या मुखा फुलविती तेव्हां वरौष्ठांतुनी
अव्यक्त ध्वनि जो निघे, प्रिय खरा तो फार होतो जनीं. २

तैशी तूझी मधुर कविता गाइल त्वद्यशाला,
लोकां मध्यें प्रिय करिल ती आपुल्या गायनाला;
आरम्भींचे परि परिसुनी बोल हे मुग्ध तीचे,
भूरि प्रेमें हृदय भरुनी डोलतें फार यांचें. ३

आहे तुला सर्वहि सृष्टि मोकळी,
व्योमांतली सर्वहि तेंवि पोकळी;
संचार कीजे तरि तूं स्वमानसें,
कोठें जराहीं प्रतिबन्ध तो नसे. ४

या अन्तरालांतिल तारकांत
आत्मे कवीलागुनि दीसतात;
कांचे मधूनी दिसतें जनांला,
धोंड्यामधूनीहि दिसे कवीला! ५

निर्जीव वस्तु तर लाव वदावयाला,
जन्तूंस लावहि विचार करावयाला,
आम्हां शिकीव सुवचीं सुर व्हावयाला,
पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला ! ६

किंवा, हें तुजला कशास म्हणुनी सांगावया पाहिजे ?
हा माझा घडला प्रमाद चि, वरी मी बोलिलों तूज जें ;
डोळ्यांला बघण्या तसें शिकविणें कानांस ऐकावया,
हें हास्याई जसें, तसें पढविणें शाहीर आहे तया . ७

ऐकती न बघती न जें जन,
गम्य होयचि कवींस तें पण ;
हे म्हणूनि नरजातिचे खरे
नेत्रकर्णचि नव्हेत का बरें ? ८

जगावें तूं वर्षें प्रिय मम कवे ! शंभर पुरीं,
समृद्धी सौख्याची चिर तव वसावी घरभरी,
जन स्वास्थ्यीं तूझीं सुरस कवनें सुन्दर धरो,
भविष्यीं कालीं तें शुचि यश तुझें निश्चल ठरो ! ९

कविता करितां मला न येई,
रचिले हे गण हो परन्तु कांहीं ;
म्हणुनी करुनी क्षमाचि मातें,
करणें स्वीकृत मन्नमस्कृतीतें ! १०

---

पुलं

२५

## प्रीति.

(गाणें)

प्रीति मिळेल का हो बाजारीं?
प्रीति मिळेल का हो शेजारीं?
प्रीति मिळेल का हो बागांत?
प्रीति मिळेल का हो शेतांत?—
प्रीतिची नसे अशि ग मात;
पहा शोधुनी हृदयांत! १

नन्दना वनामधीं आला
कल्पलतेला बहर भला;
तिचीं हृदयिं बीजें पडलीं,
प्रीति त्यांतुनी अवतरली!
प्रीतिची असे अशि ग मात;
पहा आपुल्या हृदयांत! २

प्रेमळ कृत्यांची माळ
प्रियजनकण्ठीं तूं घाल;
द्विगुणित मग तो प्रीति तुला
देइल, न धरीं शंकेला.
प्रीतिचा असा असे ग सौदा:—
प्रीतिनें प्रीती सम्पादा! ३

हृदयीं आलिंगन पहिलें,
चुम्बन मुखकमलीं वहिलें,
आणिक रुचतिल ते चार
प्रीतिला होती उपचार!
प्रीति वाढली, गडे ग, सतत
पहा तूं प्रियजनहृदयांत!
प्रीति असेल का ग बाजारीं!
वेडे! प्रीति मिळेल का ग शेजारीं? ४

नकलेमध्ये तिसऱ्या कडव्यात शेवटून दुसऱ्या ओळीतील 'ग' खोडला आहे; शेवटच्या ओळीत 'संपादा!' पूर्वी 'ग' ठेवला आहे; शेवटच्या कडव्यातील शेवटच्या ओळीतील 'वेडे!' शब्द स्वतंत्र ओळीत घेतला आहे.

## जगामधीं गा तुला कशाला परमेशें धाडिलें ?

जगामधीं गा तुला कशाला परमेशें धाडिलें ?—
कराया श्रम तुजला योजिलें. ॥ध्रु०॥
मधुर माधवीकुञ्ज आपुले विस्तृत करणें कधीं
देऊं नको सोडुनि गा तूं मधीं;
॥चाल॥ घाम दिवसभर फार येइल बा तुला, उन्हाच्या
पण धीर धरीं, जों अस्तसमय पातला,
जों काळा ज्या मञ्जुल घण्टाटंकारें सुचिवलें—
चला रे काम अतां संपलें. ॥१॥
देवें उटणीं तुला चर्चिलीं काय म्हणुनि सांग कीं ?—
झगडण्या नच पडण्या संचकीं;
॥चाल॥ स्फटिकमणी धवल जेंवि शोभले, ते
अश्रु जे तेंवि, तुवां ढाळिले,
तुझ्या धाकट्या उद्यमबन्धूं करितां, देवें भले
भुजालंकरणीं ते गोविले. ॥२॥
धैर्य आणि ती कार्यनिरतता दावुनि तूं आपुली,
बांधवीं स्फूर्ति पसर चांगली,
तुझें बघुनि ते हृदयिं धीरता घेतिल मग लागली,
करीं ही धरितिल कृत्यें भलीं,
॥चाल॥ मग—काय सांगणें !—द्वारें तुझिया तयां
देईल सुफलें ईश्वर हरिखूनियां
अल्प पुष्प ही बिन्दु हिमाचे अपुल्या पेल्यांतले
वांटितें भावंडीं आपुले. ॥३॥

## समृद्धि आणि प्रीति.

### एक दुसऱ्यास म्हणतो :—

आहे द्वीप सुरेख एक सखया त्या दक्षिणेच्या दिशे,
लंकेचें अजुनी भलें शकल तें राहूनि तेथें असे;
तें शोभे तें दिपसा सरित्पतिवरी, तेव्हां गमे इंदिरा
वैकुण्ठाहुनि पातली अपुलिया ताताचिया ही घरा! १
तेथें कांचनमन्दिरें तळपती सम्पत्तिनें कोंदलीं,
उद्यानें जणुं काय नन्दनवनें स्वर्गाहुनी आणिलीं,
सारे भोग सदैव सिद्ध असती संगीत वाद्यादि ते;
तेथें जाइल आयु साच मजला स्वप्नापरी वाटतें! २
येतें का तुझिया मनांत वसुनी भोगां तिथें भोगणें?
आधीं हे चुकलों परन्तु तुजला सांगावया सांगणें—
कीं येथें न शके कुणी पुरुष तो स्त्री आणण्याला कदा,
सीताशाप असे अलंघ्य असला द्वीपावरी त्या सदा! ३

### दुसरा पहिल्यास :—

सीताशाप जरी मुळींच नसता त्या द्वीपखण्डावरी,
न्यायाला मजला जरी गवसती तेथें सखी अंतुरी,
येतों मी न तरीहि तेथिल सुखें तीं भोगण्या आयतीं,
जीं प्रीतीस मला गमे ढकलिती शाब्दावशें ना प्रती. ४
सीताशाप परन्तु त्यावरि असे दुर्लंघ्य आतां तर;
तेव्हां पौरुषपूर्ण कोण असला राहील तेथें नर?
आम्हांला रुचती न तीं श्रमफळें कान्ते दिल्यावांचुनी,
तेथें सेविल कोण अश्रमफळें तीं एकला राहुनी? ५
तूं माझ्याकरितां तरी हुडकुनी तें द्वीप रे काढणें,
जेथें रान भयाण फार असती कांटे कडे वांकणें,
जेथें वन्य पशू सदा डिरकती हिंसा जयांना प्रिया;
तेथें घेउनियां प्रिया मग मला आज्ञा करीं जावया. ६
कांटे झाडिन मी, पशू वधिन मी, किल्ला तिला बांधिन,
मी तीतें सुख द्यावयास आपुले हे प्राणही टाकिन;
बांधूं आम्हि परस्परांप्रत लताजालीं सुखानें गळीं;
स्वर्गाला निरयामधूनि पहिल्या काढूं आम्ही त्या स्थळीं! ७

"दुसरा पहिल्यास :—" पासूनचा भाग दुसऱ्या कागदावर; त्याच्या मागे "तत्वतः बघतां" या ओव्या आहेत.

## तत्वतः बघतां नामावेगळा

तत्वतः बघतां नामावेगळा। कोण नाहीं सांगा मजला।
भिन्नव्यक्तित्व नामाला। नामकरण होतसे॥
नाम म्हणजे अभिधान अभिधान म्हणजे जें वरून।
धारण केलें, ज्यामधुन अन्तःसाक्ष पटतसे॥

भाव शब्दस्पर्शहीन। तैसे रूपरसगंधावांचुन।
अतएव ते विषयज्ञाण। इन्द्रियांचे नव्हेत॥
ही तों वाणी मिथ्या वाटे। कारण पंचविषयांचे थाटें
भाव नटती, खरें खोटें। विचारुनी पाहिजे॥

## मजुरावर उपासमारीची पाळी.

धारेवरी जावुनि देव पोंचला,
हा रंग ही मावळतेस साजला,
सर्वत्र ही मौज पहा! दिसे; परी
माझ्याच कां दुःख भरे बरें उरीं? १
साऱ्या दिनीं आजचिया नसे मुळीं
हातास माझ्या कवडीहि लाभली,
पोटा, करोनी मजुरीस, मी भरीं;
कोणी दिलें आज न काम हो परी! २
हीं मन्दिरें हो खुलतात चांगलीं;
माझ्या वडीलींच न काय बांधिलीं?
मी मात्र हो आज मरें भुकेमुळें;
श्रीमंत हे नाचति मन्दिरीं भले! ३

देवा तयांच्या मजला मुळीं नसे,
जाजी मला भाकर ती पुरे असे;
कष्टांत देवा! मरण्यास तत्पर,
कां मारिसी ~~आज~~ हाय! भुकेमुळें तर? ४

सर्वांस देवा! बघतोसि सारखा,
होतोस कां रे गरिबांस पारखा?
कांहींस सुग्रास सदन्न तूं दिलें,
साधी अम्हां भाकरही न कां मिळे? ५
घेवोनि चारा अपुल्या पिलांप्रती
जाती अहा! पक्षि सुखी घरीं किती:
बाळांस हें दावुनि कारभारिण
कैसें तयां देंत असेल सांगुन?— ६
"पक्षी जसे हे घरट्यास चालती
घेवोनि चारा अपुल्या पिलांप्रती,
घेवोनि अन्ना, तुमचा तसा पिता
येईल तो लौकरि हो, रडूं नका!" ७
हे लाडके! आणिक लाडक्यांनो!
दावूं तुम्हा तोंड कसें फिरोन?
जन्मास मी काय म्हणोनि आलों?
येतांच वा कां न मरोनि गेलों? ८

मागल्या बाजूस ७-१-८९ अशी तारीख आहे.

## प्रयाणगीत:

चाल - ' पंडुकुमारा पार्थनरवरा. '

तुजविण मजला कांहिं असेना प्रिय या गे जगतीं ।
तूं मम जीवित, तूं मम आत्मा, तूं माझी शक्ती ॥
तुजला सोडुनि जाणें येई सखे! जिवावरती ।
परी ओढुनी दूर नेति या निर्दय दैवगती! ॥
प्रीति जगाचें वसन विणितसे: वामांगीं ढकली ।
धागा, परि तो परतुनि उजविस भेटतसे कुशली ॥
मेघ विजेला नभीं सोडुनी खालीं ये, परि तो ।
रविदीप्तीच्या दिव्यरथीं तिज भेटाया वळतो ॥
रवि, पूर्वेला रडत सोडुनी, कष्टें मार्ग धरी ।
प्रहरामागें प्रहर लोटतां तिजला घे स्वकरीं ॥
धरेस सोडुनि गिरि जरि वरि ते उंच नभीं चढले ।
तरी खालते काळगतीनें येती प्रेमकळे! ॥
प्रीतीचा पथ वर्तुळ आहे: नर त्यानें जातां ।
मागें असल्या प्रियेचिया तो सहजचि ये हाता ॥
धीर धरोनी आरप, म्हणुनी, बाष्पें मजसाठीं ।
ठसा प्रीतिचा ठेवुं शेवटीं येग गडे! स्वोष्ठीं! ॥

मागल्या बाजूस ११-१-८९ अशी तारीख आहे.

## विकसन

कंपायमान कलिका सुकुमार झाली,
स्वेदें तदीय तनु चिंब भिजोनि गेली,
श्रेणें तिनें मुरकुनी शिर नम्र केलें,
बाष्पीय बिंदुहि अहा! सहसा गळाले!

२ "हा वेडे! फुलण्यास लाज इतुकी कां अंतरीं पावसी?
हास्या दाबुनि, सिद्ध ही रसिक तो जिंकावया हो कशी!"
एक ऐसें पालक देवदूत तिजला आश्वासुनी बोलला;
तेव्हां ती फुलली: रसज्ञ जनही सौख्यांत हा पोहला!

---

m २८/१/८८

## मुलांस झोडपणाऱ्या एका पंतोजीस.

कोणें मूर्खपणें गुरूपण तुला क्रूरा! असे रे दिलें!
कां खाटीक न जाहलास?–तुजला तें शोभतें चांगलें!
या बाळांप्रत फार निर्दयपणें कां तूं असा मारिसी?
केला रे अपराध काय असला यांनीं?–वदें रे मशीं. १
पाहोनी प्रतिकार-अक्षम अशीं हीं बालकें, यांवर
घ्यावें हातसुखा!–तुझ्या गुरुपणा हा डाग मोठा तर!
हातांला तुझिया जरी खुमखुमी होती, तरी ते मुके
धोंडे आणिक वृक्ष काय नव्हते?–ताडीं तयांला सुखें!
यांचें न्यून असेल (हें मज कळे) कांहीं स्वपाठान्तरीं,
काढायास परन्तु तें भरुनियां, ही रीति नोहे बरी.
केव्हां धाकहि, पारितोषिक कधीं, गोडीगुलाबी कधीं,
शिक्षा योग्य कधीं करूनि गुरु ते नांवास येती सुधी. ३
कोंबायास घशांत मूठभर रे बाळांचिया मृत्तिका,
त्यांचा स्वर्ग समग्र ही झडपितां चोपूनि त्यांला फुका!
–हें केव्हां शिवतें तरी तुमचिया का रूक्ष रे अन्तरीं?
कांपा! मुग्ध मुलें समोर बघुनी, जेव्हां छडी घ्या करीं! ४

३३

——प्रत.

सिद्ध झालों मी दूर जावयाला,
कण्ठ तेव्हां तव फार भरुनि आला;
मला म्हटलें तूं गद्गद स्वरानें
"खुशालीचें तें वृत्त लिहित जाणें!" १

"लिहिन" म्हटलें मीं तुला आश्वसाया,
पुढिल केला मीं मुळीं नच विचार;
करीं घेतां परि पत्र हें लिहाया,
खुशालीचें क्षीणत्व दिसे फार! २

लोचनांला या होस तूं प्रकाश,
मदीयात्म्याचा तूंच गे विकास;
नाडि माझी तव करीं वाहताहे,
हृदय माझें तव उरीं हालताहे! ३

करा अपुल्या तूं पहा चांचपून,
उरा आपुलिया पहा तपासून;
प्रकृति माझीही तिथें तुज कळेल,
विकृति माझी तुज तिथें आढळेल! ४

## कोठें जातोस?

"कुठें जाशी?"—"शर्करा द्यावयाला;
अमुक पंताला पुत्र असे झाला,
म्हणुनि आतां इष्टांस वांटण्यास
हवी आहे शर्करा बहू खास." १

"कुठें जाशी तूं?"— "फुलें आणण्यांतें;
तमुक रावाच्या असे लग्न येथें,
वधुवरांला त्या गळां घालण्याला
करायाच्या आहेत तेथ माळा." २

"आणि कोठें तूं?"—"नविन पसारा तो
संसृतीचा मांडीत आज आहें;
म्हणुनि बाजारा करायास जातों;—
घरीं जिवलग ती वाट बघत आहे!" ३

"आणि तूं रे?"—"जातसें आणण्यासी
वैद्यबोवाला, अमुक वृद्ध यासी
वायु झालाहे!"— "जा! परेतवस्त्रें
विकत घेउनि शोध तूं गोवऱ्या रे!" ४

पुढुनि दिसतें मग मढें एक येतां.
"कुठें बाबा जातोस सांग आतां?"—
हवेंतुनि हे पडतात शब्द पाहीं
"कुठें जातों हें मला कळत नाहीं।" ५

आई ! आई !

आज येथें नवा आलेला एक मुलगा झोंपेंत 'आई, आई!' म्हणून हांक मारूं लागला, तें ऐकिल्यावरून :—

विद्यार्जनार्थ अपुल्या प्रिय जन्मदेला
आलास सोडुनि घरास जिवा! पुण्याला;
'आई!' म्हणून तिज साम्प्रत बाहतोसी,
ती उत्तरास तुज देइल येंथ कैशी! १

ही हांक ती परिसती जननी जरी का,
धावून येउनि तुला धरिती उरीं गा;
'बा वाहिलें मज कशास निजेंत बाळा? ·
आलासि रे!' म्हणुनि घेतिच चुम्बनाला! २

'माझा पुता करित काय असेल आतां!
कोठें असेल ~~[illegible]~~ निजला!— हरि तूं पहाता!
तो काय हाय! इतुक्यांतचि दूर जावा!
नाहीं तयास अजुनी परवास ठावा!' ३

माते! असें म्हणत तूं असशील, धावा
पुत्रार्थ गे करित तूं असशील देवा!
नेत्रास अश्रुसर तो सुटला असेल!
पान्हा स्तनीं खचित गे फुटला असेल! · ४

आहे तुझा पहुडला सुत येथ माते,
निद्रा परी स्थिर न येत असे तयातें;
स्वप्नांत मारित असे तुज हांक 'आई!'
कोणी परी अहह! उत्तर देत नाहीं! ५

खोलींत या सकल त्यास नवे पदार्थ
त्याचेविशीं अलग हे दिसतात मठ्ठ;
बाहेर चन्द्र दुसराच निशेंत आहे,
हा आंत दीपहि उदासिन पेंगताहे! ६

सहावे कडवे मागाहून लिहिले असावे ; ते दुसऱ्या कागदावर लिहून खाली चिकटविले आहे.

रा. रा. बळवंत आपाजी दाते यांस

(खालील. श्लोक सदरहू दाते यांचें एका साप्ताहिक सभेंतील भाषण ऐकिल्यावरून १८८९ इ. सालीं पुण्यास लिहिले. पुढें ते फर्ग्युसन् कॉलेजांतील विद्यार्थी असतां महाउरस तळ्यांत बुडून वारल्याचें ऐकिलें. ही दुःखाची गोष्ट बहुधा १८९१-९२ साली घडली अ

दाते! धन्य तुझी तुला प्रसवुनी माता असे जाहली,
ज्या अर्थी हृदयीं तुझ्या जळतसे भूमातृभक्ती भली;
त्वन्नेत्रीं चमके तडित्, अभिनयीं वारें अहा! खेळतें,
उद्गारांतुनि गर्जना निघुनियां ती या जना स्तम्भिते! १


जोराची तव शब्दवृष्टि पडतां आत्म्यावरी माझिया,
चिन्ताग्रीष्म समग्रही धुपुनियां तो जाय तेथूनियां;
'देशालागुनि आपुल्या सुदिन ते येतील केव्हांतरी,'
आशांचे असल्या सदंकुर पहा! येती मदात्म्यावरी! २

होती श्रेष्ठ पदास आर्यजननी जी एकदा पावली,
दुर्दैवें परि जी विपद्गणशतीं सध्या असे गांजिली,
तीचें दुःख जरा तरी शमविण्या, आम्हांस या भूवरी
ढाळायास सखेद लोचनजलें तूं धीर आता करीं! ३

टाकीं हाणुनि आमुची शिथिलता वक्तृत्ववज्रें तव,
स्फूर्तीनें निज त्या स्वबान्धवजना सामर्थ्य दे तूं नव;
"ऐसे बान्धव काय हो बघतसां! आतां उठा लौकरी!"—
कर्तव्यास जनांस जागृत करीं शब्दीं अशा निर्भरीं! ४

"हे आम्ही उठलों! चला तर पुढें! देशार्थकार्यीं मरूं!"
या त्वत्प्रेरित रे समुत्सुक रवीं व्योमावकाशा भरूं!
"जैजैकार असो तुझा भरतभू!" हा घोष जेव्हां करूं,
जैजैकारहि नामही प्रिय तुझें दाते! तधीं आदरूं! ५

"त्वन्नेत्रीं चमके तडित्" आणि "टाकीं हाणुनि आमुची शिथिलता" हे शब्द पेन्सिलीने लिहिले असून त्याप्रमाणे मूळ लिखाणात अक्षरे खोडून सुधारणा केल्या आहेत.



ह टयु

मी पाहिली एक सुरम्य बाला :
वर्णूं कसा त्या स्मरसम्पदेला ?
वृक्षावरी [illegible] जधीं पडावी,
त्याच्या स्थितींतचि तिची महती पहावी ;
चंडोल कैसा अदशास नेतो
गुणौघ, [illegible] वदू शके ता ?
वस्ताद [illegible] जगीं असावी
तीचे स्वरूप सगळें → तीचा प्रता[illegible]ा, परिणाम दावी 2
सौ[illegible] म्हणोत कोणी ;
सौं [illegible], वदोत कोणी ;
सौन्द[illegible] सुधेसमान ;
तें जाहलें [illegible] विष प्रधान ! 2
नेत्रें क्षणीं तारवटूनि गेलीं,
अंगें ज्वरीं त्या परतन्त्र झालीं,
झालों अमिष्टहु तिही अमिष्ट,
शुद्धी सवेंचि मग गेय अहा ! विनष्ट.
माझा असा अन्त अहो जहाला :
"कोठूनियां हा मग येथ आला ?"
ऐसा तुम्हा संशय येतसे का ?—
मी भूत हें मम [illegible]से, नच यांत शंका !

मुंबई. ४।१।१८

वर मोडी लिपीत 'पुष्कळ बदलले आहे' इत्यादी मजकूर आहे.

# माझा अन्त.

मीं पाहिली एक सुरम्य बाला;
वर्णू कसा त्या स्मरसम्पदेला?
वृक्षावरी वीज जधीं पडावी,
त्याच्या स्थितींतचि तिची महती पहावी. १

माझी अवस्था बघुनीच तीचें
सौन्दर्य सोपें अजमावयाचें;
वस्ताद जी चीज जगीं असावी,
तीचें स्वरूप सगळें परिणाम दावी २

सौन्दर्य पुष्पासम वर्णितात,
झालें मला कंटकसें प्रतीत;
सौन्दर्य मानोत सुधानिधान,
तें वाटलें मज परन्तु विषासमान! ३

नेत्रें क्षणीं तारवटून गेलीं,
अंगें ज्वरीं त्या परतंत्र झाली,
झालों तिला मी बघतां भ्रमिष्ट,
शुद्धी सवेंचि मग होय अहा विनष्ट! ४

माझा असा अन्त अहो जहाला!
'कोठूनियां हा मग येथ आला?'—
ऐसा तुम्हा संशय येतसे का?
मी भूत हें मम असें, नच यांत शंका! ५

# कविता आणि प्रीति

फिरायास मी मित्र घेवोनि गेलों,
बघोनी सुरम्य स्थळा एक ठेलों;
किती हारिनें वृक्ष ते दाट होते,
जलाचे तळीं पाट होते वहाते; १
तृणाच्या मधीं राखिल्या गारजागा;
कडेनें तयांच्या, लतांच्याहि रांगा
फुलांच्या बहारांत त्या शोभलाती;
अलींचे थवे त्यांवरी धाव घेती; २
मधून्नी किती पक्षि ते गोड गाती;
मृगें ही मधें स्वैर तीं क्रीडताती;
मयूरें अहा! दाखवीती पिसारे;
बघूनी मना लोभ होई अहा रे! ३
मधें अंगना, स्पृष्ट ज्या यौवनानें,
निर्व्याज रूपास साध्या मदानें
इथूनी तिथे चंचला नाचवीती,
पदालंकृती झंकृती तीं करीती; ४
मुलें खेळती नाचती ही मजेनें,
तयांचा अहो कोण उल्हास वानें?
फुलें, तारका, ते दंवाचे तुषार,
तशीं मुग्ध हीं बालकें दिव्य फार! ५
अशी तेथली पाहुनी रम्य लीला,
मुखीं घालुनी ठाकलों अंगुलीला;
वदे मित्र मातें—"पुढें चालणें ना?"
परी पाय तेथूनियां काढवेना! ६
बोले सखा "गढुनि कां इतुका मनीं तूं?"—
मी बोललों "बघ मनांत विचारुनी तूं."—
तेव्हां पुसे "अडवि ते कविता?"—"नव्हे रे,
प्रीती मला भुलवि ते—न च हालवे रे!" ७

मुंबई. ७।१।९०

# स्वप्न

प्रीतीला विरही दशा कठिण ही मी फार गाऱ्हाणिली,
हंसाचे मग पक्ष ती द्रवुनियां देती मला जाहली;
आनन्दें प्रणती तिला करुनि मी स्कन्धांस ते लाविले,
वेगानें मग अन्तराळभवनीं उड्डाण मी मारिलें ! १
आशेच्या चमके जसा किरण तो चित्तांमधीं आगळा,
तैसा तारक मेघवेष्टित तरीं तेजाळ मीं पाहिला;
त्या ताऱ्यावरि जाउनी उतरलों, चिन्तीत हें मानसीं—
भेटूं केंवि निजप्रियेस! रमवूं शब्दीं तियेला कशी? २
ऐशामाजि सखी, परीपरि तिथे उड्डाण घेऊनियां,
आली; कोण असे समर्थ मग त्या सौख्यास वर्णावया!—
वक्षें दोनहि चार ओष्ठहि तधीं एकत्र झाले जवें!
पायांखालुनि जाय हाय! तुटुनी तारा परी तो सवें! 3
हा! हा! मी पडलों तसा घसरुनी या क्लिष्ट पृथ्वीवरी,
त्या धक्क्यासरशी मदीय सगळी गुंगी पळे हो दुरी!—
माझ्या या हृदयावरी मम चिन्हे वेंगूनि होते कर,
हंसाचीं नव्हतीं पिसें चढविलीं या दोन बाहूंवर! ४

---

मुंबई. ता. २५।१।१०.

# सृष्टि तत्व, आणि दिव्यदृष्टि

~~तारा~~ निष्प्र

१ तारा निष्प्रभ जाहल्या निजपथीं, प्राची दिशा रंगली,
गायाला खग लागले, मधुर निश्वासं फुलें लागलीं;
प्रावारून उषा तुषारपटला सूर्यप्रतीक्षा करी;—
होतों पाहत डोंगरीवरि उभा मोहूनि मी अन्तरीं.

२ 'पश्यात्रास्मि' म्हणोनि एक घुमला गम्भीर तेथें ध्वनी
'भो: कुत्रासि?' विचारिलें निजमुखें तेव्हां तयालागुनी
असें 'कुत्राप्यस्मि च सर्ववस्तुषु' ~~हें~~ ये तेधवां उत्तर;
तें ऐकूनि जराकरीत मनना मी ठाकलों नन्तर.

३ धोंडा एक समीप हो पडुनिया होता तिथे, त्यावरी
गेली दृष्टि मदीय, कौतुक तधीं झालें मनाभीतरीं,
+ ~~कांकी, त्यांत सुरेख कांहिं दिसतें ऐसें मला भासलें~~,
काढूं बाहिर तें झटूनि, मग हें चित्तांत मी घेतलें.

४ टांकीचे, म्हणुनी, तयावरि मियां आघात जों वोपिले,
तों—सांगूं म्हणुनी किती मज तधीं आश्चर्य जें जाहलें!—
मूर्ती दिव्य अशी अहा! उतरली धोंड्यामधूनी भली!
माझी दृष्टि असे अलौकिक, मला जाणीव ही जाहली

खेड. २८ मार्च—९०.

+ कांकीं ह्या ध्वनिचें खरेपण मला धोंड्यांत त्या भासलें;

चौथ्या कडव्याच्या पहिल्या ओळीत 'मियां' खोडून 'जधीं'; 'जों' खोडून 'मीं' व दुसऱ्या ओळीत 'तधीं' खोडून 'मनीं' लिहिले आहे.

# स्वर्ग, पृथ्वी, आणि मनुष्य

आरम्भीं, म्हणजे मनुष्य नव्हता तेव्हां, क्षितीपासुनी १
होता स्वर्ग न फार दूर. अपुल्या कान्तिप्रसन्नेक्षणी
तो पृथ्वीप्रत सौख्य नित्य वितरी. तेव्हां पुढें त्यावरी
गेली प्रीति जडूनि गन्धवतिचे चित्तांत भारी खरी.
निर्मीला नर नन्तर स्वतनुच्या तीनें मळीपासुनी, २
इच्छा आपुलिया धरूनि हृदयीं ही:—गायनें गाउनी
स्वर्गा आळवुनी नरें सुकुशलें मोहूनियां टाकिजे,
स्वर्गें येउनि खालतीं मग तिशीं प्रेमें सदा राहिजे.
या दुष्टें, पण, मानवें स्वजननी पृथ्वीस ताडूनियां ३
लाथेनें, अपुल्या मनीं अवधिलें स्वर्गाविरी जावया,
ती पाहूनि कृतघ्नता निजमनीं तो स्वर्ग जो कोपला
आवेशांत उडूनि दूरवर तो जाता तधीं जाहला.
तेव्हांपासुनि ही धरा झुरतसे! माते! चुकी जाहली!— ४
स्वर्गा! तूंहि अम्हां क्षमस्व सदया!— ये खालता भूतलीं—
ये बा! आणिक या धरेस अगदीं देऊं नको अन्तर!—
आहे तूजवरी तसेंच बसलें स्वर्गा! तिचें अन्तर.

---

खेड. ता ११-४-९०.

# सिंहावलोकन.

सुखा फिरवुनी, जरा वळुनि पहतां मागुती,
[illegible]
कितीक हृदयें [illegible]
कितीक हृदयें [illegible]?
'नको वळुनि पाहणें!' म्हणुनि दृग् जरी आंवरूं,
धुकें पुढिल जाणुनी मन न घे तस्येंही करूं! १
किति मोगले रुचिर ते बरें टाकिले
[illegible];
कितीक तटिनीतटें, श्रम जिथें अम्ही वारिले;
किती स्मृतिस धन्यतास्पद वनस्थली राहिल्या,
जिथें धवलिता निशा प्रियजनांसवें भोगिल्या! २
सुखें न मिळतील तीं फिरुनि!– तीं जरी लाविती
मनास चरका, तरी नयन त्यांवरी लोभती:
परन्तु, हृदयास [illegible] झोंबती,
दिसतां प्रमाद बघतां असे, नयन हे मिटूं पाहती!– ३
किती घसरलों!– किती चुकुनि शब्द ते बोललों!–
[illegible]!–
स्वयें बहकुनी [illegible] टोंचिलीं!–
वृथा स्वजनलोचनीं अहह! आंसवें आणिलीं! ४
चुकोनि घडलें चुको: परि, 'असें नव्हे हें बरें'
वदूनिहि कितीकदा निजकरेंचि केलें बरें!–
म्हणूनिच अम्हां पुढें घन तमिस्र सारें दिसे,
पुढें उचलण्या पदा धृति मुळींहि आम्हा नसे! ५
'चुकी भरुनि काढणें फिरुनि, हें घडेना कधीं'
विनिष्ठुर असें भरे प्रगट तव चित्तामधीं!–
म्हणूनि अनिवार हें नयनवारि जें वाहतें,
असे अहह! शक्त का कवणही टिपायास तें? ६

---

वळणें. ता. ३ मे-९०.

# फुकट दवडलेला तास.

यंत्रीं कालनिदर्शनीं खणखणां ठोके पडूं लागले,
तों माझ्याजवळूनि कोणि उठलें ऐसें मला वाटलें;
मी तें कोण म्हणूनि जों निरखण्या वेगें उभा राहतों,
द्वारांतूनि पदें सरोष निघुनी जातां तधीं ऐकतों : १
त्याहाळूनि विलोकितां मज पुढें आकार आभासला,
पाठीला फिरवूनि तो मजकडे होता झणीं चालिला;
मी, पाठीवर त्याचिया 'फुकट जों घालीवला तास तो!'
ज्वालांहीं लिहिलें असें, निरखितां, तो गुप्तता पावतो! २
'धिङ् माम्!' बोलत, अश्रु ढाळित, पदें मागें जरा गाळित,
पश्चात्ताप अधोमुखें मजमधें तोजाय संचारत;
तों कोणी मधुर स्वरें मज हळू सम्बोधिलें ऐकतां,
किंचिन् नेत्र धरूनियां उचलुनी मी जाहलों पाहता : ३
आशा आणि तिची बहीण कविता ह्या येउनी पातला
तो मी 'तास नवा' बघूनि जवळी मोदें नमस्कारिला;
'आतां व्यर्थ रडूनि काय फळ रे?' आशा असें बोलली,
'बा, कांहींतरि गा नवीन' कविता आज्ञापिती जाहली! ४

---

मुंबई. ता. ९ आगस्ट-९०.

## दिव्य ठिणगी.

या लोकीं बघुनी कभिन्न सगळा अंधार कोंदाटला,
सारावा दुरि तो जरा तरि, असा हेतू मनें घेतला;
स्फूर्तीचें अवलम्बुनी म्हणुनियां मी यान तें उद्धर,
तेजाच्या उगमाकडेस सहसा तैं चाललों सत्वर. १
एका सुन्दर वेदिकेजवळि मी जाऊनियां पोंचलों,
ज्वाला दिव्य चिरन्तनी बघुनि त्या वेदीवरी, थांबलों;
ती ज्वाला नव्हती निजद्युतिमधीं छाया मुळीं पाडित,
त्या ज्वालेपुढती तपश्चरण तें मी वांकलों साधित. २
ज्वालेनें रमणीय एक ठिणगी माझ्याकडे धाडिली
ती मी आपुलिया उदात्त हृदयीं सानन्द हो स्थापिली
पृथ्वीनें मज आणण्यास, वरतीं होतें जिला धाडिलें,
प्रीतीनें मग त्या फिरूनि मज या लोकामधीं आणिलें. ३
येथें येउनि पोंचतां, बलि दिला ज्वालेस त्या मी किती,
तें मातें कळलें पुरें;–परि तुम्हा त्याची कशाला मिती?–
ज्याला मी मुकलों विषाद मजला त्याचा मुळींही नसे,
जें पृथ्वीवर आणिलें जन तया धिक्कारिती हा! कसे!! ४

---

दादर.ता. २५/८/९०

# भृंग.

भृंगा! दंग अहा होसी,
गुंगत धाव वनीं येसी;
तुजमागुनि वारे यावें,
गोड फुले चुम्बित गावें! १

रवि येत असे उदयातें,
अरुणतेज विलसित दिसतें,
तरी तिमिर हें विरल असे,
धुकें भरुनि न स्पष्ट दिसे: २

कविच्या हृदयीं उज्ज्वलता
आणिक मिळती अंधुकता,
तीच स्थिति ही भासतसे,
सृष्टी कवयित्रीच दिसे! ३

तिच्या कल्पना या गमती
कलिका येथें ज्या फुलती,
सुगन्ध यांतुनि जो झुकतो
रस त्यांतिल तो पाझरतो! ४

भृंगा! आणि तुझें गान
सृष्टीचें गमतें कवन,
गा! तूं गा! नादी भ्रमरा!
मी गणमात्रा जुळणारा! ५

शुक पंजरबन्धीं घालूं,
त्या पढवूं नरवाग् बोलूं
श्रुतिवैचित्र्या श्रुतिविचित्रता बघणारे
आम्ही मात्रा जुळणारे! ६

'कवि' आम्हालागुनि म्हणणें
'कवि'च्या अर्था लोळवणें;
अमुचें गान — नव्हे 'गान'—
'गानाला' चिंध्यादान! ७

भृंगा! आणि तुझें गान?—
परमानन्दें परिपूर्ण!
बेफिकीर जगताविषयीं उदासीन या जगाविशीं
तल्लीनता सृष्टिशीं ही! तन्मयता ही सृष्टीशीं
जग हें दुःखानें भरलें,
अमुच्या हृदयीं हें ठसलें; मनीं अमुच्या हे ठसलें
म्हणुनी सुन्दरतेलाही
कुसें अम्हा दिसली पाहीं! ९
परि तव गानांतून, अले,
थबथबला हा भाव गळे :—
"गुड्‌ गुड्‌ गुड्‌! —भान नसे!—
सृष्टि अहा गुड्‌! मधुर असे! १०
"दुःख — वदा तें केंवि असे?
अश्रू — तें हो काय? कसें?
फुलें फुलति, परिमल सुटती,
रस गळती — गुड्‌! सौख्य किती!" ११
जाई जुई मोगरी भली
कमलिनीहि सुन्दर फुलली;
मधु यांचा सेवुनि गोड
पुरवीं तूं अपुलें कोड! १२
प्रीति चारुता आनन्द
यांचे गा मधुरच्छन्द;—
प्रीति चारुता आनन्द
सिंचिति सृष्टीचा कन्द! १३
वरुनि नभांतुनि चंडोल
ओतीतसे हेचि बोल!
खालीं तव गुंजारव हा
प्रतिपादितसे तेंचि अहा! १४
होईल का रसिकता तव लब्ध मातें?
गुंगी तुझी मज मिळेल कधीं तरी ते?
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें,
वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें! १५

४५

## भृंग

भृंगा ! दंग अहा! होसी,
गुंगत धांव वनीं घेसी;
तुजमागुति वाटे यावें,
गोड फुलें चुम्बित गावें! १

रवि येत असे उदयातें,
अरुणतेज विलसित दिसतें;
तरी तिमिर हा विरल असे,
धुकें भरुनि न स्पष्ट दिसे. २

कविच्या हृदयीं उज्ज्वलता
आणिक मिळतो अंधुकता;
तीच स्थिति ही भासतसे—
सृष्टी कवयित्रीच दिसे ! ३

तिच्या कल्पना या गमती
कलिका येथें ज्या फुलती;
सुगन्ध यांतुनि जो झुकतो
रस त्यांतिल तो पाझरतो ! ४

भृंगा! आणि तुझें गान
सृष्टीचें गमतें कवन !
गा, तूं गा ! नादी भ्रमरा!
मी गणमात्रा जुळणारा ! ५

शुक पंजरबन्धीं घालूं,
त्या पढवूं नरवाग् बोलूं,
श्रुतिवैचित्र्या बघणारे
आम्ही मात्रा जुळणारे ! ६

कवि आम्हांलागुनि म्हणणें
कविशब्दार्थी ओळविणें।
अस्मद्गान नव्हे गान,
तें गाना चिंध्यादान! ७

परन्तु भृंगा! तव गान
परमानन्दें परिपूर्ण!
उदासीन ही जगाविशीं
तव तन्मयता सृष्टीशीं! ८

अस्मदीय हृदयीं ठरलें
कीं जग हें दुःखें भरलें!
म्हणुनी सुन्दरतेलाही
कुसें अम्हां दिसती पाहीं! ९

परि तव गानांतून, अले,
थबथबला हा भाव गळे :—
"गुड् गुड् गुड् गुड्!—भान नसे—
सृष्टि अहा गुड्! मधुर असे! १०

"दुःख—वदा तें केंवि असे?
अश्रू—तें हो काय? कसें?
फुलें फुलति—परिमल सुटती—
रस गळती—गुड्! ~~ख~~ सौख्य किती!" ११

जाइ, जुई, मोगरी भली
कमलिनीहि सुन्दर फुलली;
मधु यांचा सेवुनि गोड
पुरवीं तूं अपुलें कोड १२

प्रीति, चारुता, आनन्द,
यांचे गा मधुरच्छन्द;
प्रीति, चारुता, आनन्द
सिंचिति सृष्टीचा कन्द! १३

वरुनि नभांतुनि चंडोल
ओतीतसे हेचि बोल;
खालीं तव गुंजारव हा
प्रतिपादितसे तेंचि अहा! १४

होईल का रसिकता तव लब्ध मातें?
गुंगी मिळेल मजला तव केधवां ते?
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें,
वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें! १५

प्रीति, झपूर्झा या कवितांसह एका फूलस्केप कागदावर केलेली प्रत; कडवे ७ मधील पहिल्या दोन ओळी व १५ मधील दुसरी ओळ यांत पहिल्या प्रतीहून थोडा बदल आहे.

## रूढि-सृष्टि-कलि(!).

अज्ञानें फुगली, कुरूप अगदीं झाली, दुरी चालली
सृष्टी पासुनि रूढि ; ती मग असा त्सिंहासनीं बैसली :
सारे लोक पहा! परन्तु तिचिया पायीं कसे लागती,
ही कन्या दितिची असूनि इजला देवीच कीं मानिती। १
देते शाप जनांस घोर, जुलमी ही दुष्ट राणी जरी,
तीं आशीर्वचनें शुभेंच गमती या मूर्ख लोकांतरी।
सृष्टीचे अमृतध्वनी दुरुनि जे कानांवरी त्यांचिया
येती ते परिसूनि मूर्ख सगळे घेतात चित्तीं भया! २
सृष्टीनें निज भृत्य एक बलवान् रूढीवरी प्रेषिला,
त्याला लौकिक मूर्ख हा 'कलि' अशा नांवें म्हणूं लागला!
त्यानें कागद घेउनी सहज जे रूढीकडे फेंकिले,
त्यांहीं आसन तें तिचें डळमळूं आहे पहा! लागलें!
येवो तूर्ण कले! तुझ्या विजय तो अस्त्रांस त्या कागदी ३
गाडूं ही मग रूढि विस्मृतिचिया त्या खोल खाड्यामधीं!
साधो! नांव तुझें खचीत बदलूं, बोलूं न तूतें 'कली'
जै जैकारुनि सृष्टिला, ध्वनि तिचा तो एक मानूं बली! ४

# कवि,

मज्जेचीं निज जो फुलें पसरितो आयुष्यमार्गावरी,
आहे अद्भुत रम्य का अधिक तें त्याहूनि कांहींतरी?
चाले तो धरणीवरी, तर पहा! जेथूनि तो चालिला,
धूली तेथिल होतसे कनकिता!-घेऊं नका भ्रान्तिला. १
तो गम्भीर वदे रवा, तर, मुक्या पृथ्वीस या वाटतें
कीं "मातें श्रुति लक्षसंख्य फुटल्या", आणीक ती ऐकते!
दृष्टी तो फिरवी वरी, तर लवे आकाश तें खालतीं,
तारांचे गण गावयास वरुनी स्तोत्रें अहा! लागती! २
लीलेनें स्वकरांत तो धरितसे कांडी वरूची जधीं
साऱ्या सुन्दर वस्तु त्या झडकरी येती ~~[illegible]~~ समाधीमधीं
त्याच्या; येउनि त्या तयास वदती "आम्हास दे भूषणें
दिव्यें, आणि शिकीव लौकरि अम्हा तीं अप्सरोगायनें!" ३
श्वासोच्छ्वास करी, परी नवल हें:- जीविलसंहारक
वायू घेउनि आंत, तो त्यजितसे वायूस त्या पोषक!
राही तो, तर देव भूमिवरतीं येतात हिंडावया,
जातां, स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागिं धुंडावया! ४

दादर. १४-३-९१.

~~तीं समाधीमधीं~~

गाणे — फुलांची परवरण.

टिप् फुलें टिप्! माझे गडे ग! टिप् फुलें टिप्!
पहा फुलांचि परवरण झिप्प्! ॥ ध्रु० ॥
किति सुखाची सकाळ,
किति मौजेची ही वेळ,
दिशा या फांकती,
फुलें हीं फुलती,
पक्षी हे बोलती;
सगळ्या ही सृष्टिनें पहा! निद्रा ती टाकली;
प्रीती ती आशेसंगें खेळाया लागली;
तर, आनन्दें या झाडांखालीं टिप् फुलें टिप्! ॥१॥

किति सकाळ ही सुन्दर,
जसें मुलींचें माहेर, —
जगाचे ते व्याप
दुरि तैसे संताप,
मनिं न शिरे मुळि पाप;
पुण्याची ही वेळ पहा गे! सूर्यानें उजळीली;
~~आशेच्या वेलीवरी मागणीं मी फुलवीन~~ आशेचिया ग वेलीवरतीं गाणीं तीं फुलती;
तर, मौजेनें या वेलींखालीं टिप् फुलें टिप्! ॥ २ ॥

सकाळ जाइल संपून,
मग तापेल तें ऊन;
मग धन्दे कराल,
पण फुलें हीं विसराल;
सुख कैसें पावाल? —
फिरुनी ऐशी वेळ गडे ग! कधिंतरि ती येइल का?
गडे! आनन्दामधिं असा आपुला काळ कधीं जाइल का?
म्हणुनि, असे जों बहर तोंवरी
टिप् फुलें टिप्!

पहा फुलांचि परवरण झिप्प्! माझे गडे ग! टिप् फुलें टिप्! ॥३॥

कल्याण. ता. २०-४-०१

एक नक्कल आहे ती वरील सुधारणा करून लिहिली आहे.

## पर्जन्याप्रत.

ग्रीष्मानें तपली धरा करपली ही काय कीं वाटते;
चारा व्यर्थ गुरें पहा हुडकती; नेत्रीं धुळी दाटते;
छायेला जल तें असे जर कुठे, फेंसास त्या गाळित
त्या ठायीं जमती गुरें, पथिक ही धापांस ते टाकित. १
ऐशी होउनियां दशा दिवस ते झाले बहू पावसा,
ये आतां तर तूं त्वरा करुनियां लंकेवरूनी असा.
तूझ्या आगमनार्थ दर्दुरपती वापीतळापासुनी
रात्रीचे निजकंठशोष करिती हांका तुला मारुनी. २
काकांही अपुलीं पहा घरकुलीं झाडांवरी डाळिलीं,
दाण्यानें घरटीं भरूनि चिमण्या यांही तशी टाकिलीं;
तूं येणार म्हणूनियां वळचणीं खालीं गड्या! सम्प्रती
पाकोळ्याहि 'फडक् फडक्' करित या वस्तीस धुंडाळिती. ३
रात्रीच्या दिवट्याच ज्या तव अशा खद्योतिका या पुढें
झाल्या दाखल; पावसा! विरमसी तूं सांग कोणीकडे?
रात्रीं त्या झुडुपांमधीं फिरकती जेव्हां तयांच्या तती,
उत्कण्ठा तुझियाविशीं अमुचिया चित्तामधें प्रेरिती. ४
भेटायास तुला समुत्सुक अशा मुंग्या उडूं लागती;
पर्जन्या! तर ये! कृषीवल तुझ्या मार्गाप्रती ईक्षती;
झंझावातहयावरी बसुनियां, या पश्चिमाब्धीवरी
लाटा सोडित, गर्जना करित ये, बा मेघराजा, तरी! ५

जून १८९९.

शिर्षकावर 'काव्यखंड' असे लिहून खोडले आहे.

## स्फुट श्लोक.

हें हो चम्पकपुष्प रम्यहि तसें वर्णें सुगन्धें भलें,
ऐसें ऐसुनि कां बरें अलिवरें धिक्कारुनी त्यागिलें?—
ही तों सत्य रसज्ञवृत्तिच असे बाह्यांग त्यां नावडे,
कौरूप्यीं हि जरी वसे मधुरता तच्चित्त तेथें जडे!

करी द्विरेफ पद्मिनीवरी विहार हो जरी,
वरीहि पुष्पवाटिका तशा रसालमंजरी,
करीरपुष्प शुष्कही रसार्थ चाखितो तरी,
खरी रसज्ञलोकवृत्ति सूचवी जनान्तरीं.

या पुष्पावरुनी तयावरि असा अस्वस्थ गुंजस्वर,
आलापीत फिरे, परी न रुचुनी ये तोंचि पद्मांवर,
त्यांतें स्वाधिन जाणुनी करिशिरीं दानोदका पातला,
तो भृंगा विषयिस्थितीस करितो कीं व्यक्त वाटे मला.

जैसा जैसा नव युवति हृन्मन्दिरीं कामदेव
वागूं लागे, हळुहळु तसा हृद्द काठिन्यभाव
दूरी सारी तिथुनि, मग ते राहण्याला स्तनांत
येती, अर्थात् कुच तरिच हे पीन काठिन्ययुक्त!

पहिले दोन श्लोक काट मारून खोडले आहेत.

"आहे येत शरांस फेकित इथे धन्वी कुणी सत्वरी!
मित्रांनो! जपुनी असा! - स्वहृदयें भेदूनि घ्या ना तरी!"
झाले स्तब्ध असें जधीं परिसुनी ते सर्व थांबावुनी,
येतांना दिसली विलोलनयना त्यांना तधीं सुस्तनी!

---

ऐन्यामध्यें महालीं निरखित असतां रूपशृंगार बाला,
आला मागूनि भर्ता, पुढति बघुनियां बिम्बयोगें तयाला,
बिम्बाच्या बिम्बभावा विसरूनि सरली लाजुनी त्यास मागें,
कान्तें तों आयती ती कवळुनि हृदयीं चुम्बिली गाढ वेगें!

---

घराला मी आलों अटन करुनी फार दिवशीं,
करांहीं कान्तेला हृदयिं धरिली मी दृढ अशी;
तरी आश्लेषेच्छा पुरि न मम होवोनि म्हटलें—
'विधीनें कां नाहीं मज कर बरें शंभर दिले?'

---

अन्योन्यांप्रत चुम्बुनी कितिकदा जायापती रंगलीं,
मर्यादा मग चुम्बनास करणें ही गोष्ट त्यां मानली,
तैं दन्तक्षतसक्त तीनच पणीं लावोनिया चुम्बनें,
सारीपाट तयीं भला पसरिला क्रीडावया कारणें

---

तिसरा व चौथा हे श्लोक खोडले आहेत.

कमालिनीची ब्रह्मदेवास प्रार्थना—

रसज्ञांचा राजा मधुप अलितो कृष्णहि जरी,
मला आहे भारी प्रिय; धवल तो हंस न तरी,
बिसें भक्षी, पद्में अरसिक सर्वें तो कुसमुडी,
विधे! तद्धस्तीं मलमल कधिंही बा न दवडीं.

---

लाह्यांवर कूट—

तप्त पात्रिं कालिकाचया गडे
टाकितां, सुमनियुक्त तें घडे;
तीं फुलें *फणिवरास अर्पिलीं,
शेष तीं त्वरित मींच भक्षिलीं!

---

हंसान्योक्ति—

अगा हंसा, चंचूमधिं विकसलें पद्म धरुनी,
प्रमोदें डौलानें उडसिहि तसा नाचसि वनीं,
परी हास्यें कैसे विकल जन केले, बघ सख्या,
अली चैनीनें उद्धृत कमल सेवी म्हणुनियां!

---

'हें गे सुन्दरि पलि! काय पदरीं तूं आणिलें झांकुनी?'
'कोठें काय?' म्हणुनि ती वदतसे वक्षाकडे लक्षुनी;
'हीं हीं दोन फळें!' म्हणूनि पदरा पाडूनि आलिंगुनी
वक्षोजां कवळोनि तो पुसतसे 'आलें गडे! का मनीं?'

---

पहिला, तिसरा आणि चौथा हे श्लोक खोडले आहेत.

पहिल्या ओळीतील 'अलितो कृष्णहि' खोडून 'दिसतो शामल' असे पेन्सिलीने लिहिले आहे.

भृंगान्योक्ति —

हिमाद्रीचे मागें उदधिसम तें मानस दुरी,
तयामध्यें भृंगा! विधिरथगण क्रीडन करी;
कुठे त्या ठायींचा तुज कमलिनीभोग मिळणें?—
सरीं मार्गींच्या, त्या त्यजुनि अभिलाषा, विहरणें!

---

दृष्टीला दुरुनी गुलाब अमुच्या आकर्षितो लौकरी,
ज़ातां सन्निध त्याचिया रुतति ते कांटेहि अस्मत्करीं;
लोकीं रम्य तशीं सुखें झडकरी आम्हास आकर्षिती,
भोगायास तयांस हो बिलगतां दुःखें अम्हा झोंबती.

---

रात्रीं ते सुरतप्रबन्ध सुचुनी अभ्यासकाळीं बरे,
लागा पुस्तक हो तुम्ही वरिवरी चाळावयाला करें,
तों होवोनि जिन्यांत छुमछुम असा आवाज त्याच्या भयें
हस्तांतूनि सवेंचि पुस्तक गळो मेजावरी तें स्वयें!

---

पांथोक्तिप्रत्युक्ति —

"कोणाची गे वनश्री नयनसुखद ही?" "मत्पतीची असे हे."
"कां ऐशी शुष्क शोभाविरहित?" "अपरासक्त तो फार आहे."
"त्यत्का तापें जरी ही कृश परि रिझवी चित्त माझें स्वभावें."
"ऐसें हो का जरी, त्वां तरि रसिकवरा! स्वस्थचित्तें रमावें!"

पहिला, तिसरा व चौथा हे श्लोक खोडले आहेत.

## मरणानन्तर.

"If thou survive my well-contented day"
— Shakespeare.

माते निर्दय अन्तकें लवकरी नेऊन लोकान्तरीं,
मागें सुन्दरि! राहलीस जर का तूं एकली भूवरी,
या तूं आपुलिया गतप्रियकर-श्लोकांस साध्या तरी
वाचायास मला स्मरून फिरुनी घेशील ना गे करीं? १
त्यांतें घेउनियां सरवोसरस त्या भावी कृतींशीं तुळीं,
ते त्या आणि जरी तुळेंत ठरले नादान ऐसे मुळीं,
मत्प्रीतीकरितां तयां जप, न त्या तत्सौष्ठवाकारणें,
जें तत्सौष्ठव पाडितील पुढले मोठे कवी ते उणें. २
प्रेमें आण मनांत हें — "जर सखा माझा पुढें वांचता,
काव्यस्फूर्ति तदीय उन्नत अशी होती न का तत्वतां?
या पद्यांहुनि फार सुन्दर अशीं पद्यें अहा! तो गुणी
प्रीतिप्रेरित होउनी विरचिता; वाटे असें मन्मनीं. ३
"हा! हा! तो मजपासुनी परि यमें नेला असे कीं वरी!
आतांचे कवि हे वरिष्ठ गमती त्याच्याहुनी अन्तरीं;
यांच्या पद्धतिला म्हणून भुलुनी यांच्या कृती वाचितें,
त्याची वाचितसें परी स्मरुनि मी त्याचे अहा "प्रीतितें!" ४

" माझें ठेउवुनि चित्त घे."

(करमणुकींतली हितचिंतकाची "माझें धाडुनि चित्त दे" हा चुटका वाचल्यावरून:)

"माझें धाडुनि चित्त दे" तुज असें मीं कां लिहावें बरें?—
हें आतां न कळे मला; तुज गडे! हें सांगतों मी खरें.
तूं कांहीं मजपासुनी हृदय हें मागूनि नेलें नसे;
गेलें तें तुजमागुनी, तर तुझा अन्याय का हा असे? १
गेलें तें तुजमागुनी, सहृदये! येऊं दिलें तूं तया,
हा तूझा उपकार मीं विसरुनी जावें न मानावया;
तें राहूनि दुरी, वृथा प्रथयिता झालों अवज्ञा तुला;
हा माझा अपराध तूं विसरुनी कीजे क्षमा गे मला. २
चित्ताचा तव लाभ यास घडुनी येणार नाहीं जरी,
पायांपासुनि तूझिया चळुनियां जाणार नाहीं तरी
माझें चित्त दुरी;—असूनि पुरतें हें ठाउकें गे मला,
"माझें धाडुनि चित्त दे" म्हणुनि मीं कैसें म्हणावें तुला? ३
मच्चित्तावरतीं यथेष्ट कर गे स्वामित्व तूं सुन्दरी,
जोडो दासपणें तुझें मज सदा सान्निध्य तेणें तरी!
अव्हेरूनि मदीय चित्त परतें देऊं नको लावुन,
माझें ठेवुनि चित्त घे!— मग जगीं धन्यत्व मी मानिन! ४

ता. १ मार्च-९२.

सर्व कविता उभ्या आणि तिरक्या रेघांनी खोडल्या आहेत. दुसरी प्रत पुढील पानावर मुद्रित केली आहे ती अर्थातच मागाहून लिहिलेली आहे.

५२

# "माझें ठेवुनि चित्त घे."

"माझें धाडुनि चित्त दे" लिहुनि हें मीं धाडिलें कां तुला?—
पश्चात्ताप असा बळावुनि अतां जाचीतसे गे मला!
तूं कांहीं मजपासुनी हृदय हें मागूनि नेलें नसे;
गेलें तें तुजमागुनी, तर तुझा अन्याय का हा असे? १
गेलें तें तुजमागुनी, सहृदये! येऊं दिलें तूं तया,
हा तूझा उपकार मी विसरुनी जावें न मानावया;
तें राहूनि दुरी, स्वकीय मजला देसी न तूं चित्त तें,
हा मानूनि विषाद, मी चुकुनियां गेलों भ्रमाच्या पथें!
चित्ताचा तव लाभ यास घडुनी येणार नाहीं जरी,
पायांपासुनि तूझिया चळुनियां जाणार नाहीं तरी
माझें चित्त दुरी,—असूनि पुरतें हें ठाउकें गे मला,
"माझें धाडुनि चित्त दे" म्हणुनि मी कैसें लिहावें तुला? ३
झाली चूक खरी, परन्तु सदये! कीजे क्षमा सुन्दरी!
तूझें दास्य मला महीश्वरपणापेक्षां रुचे अन्तरीं!
अव्हेरूनि मदीय चित्त परतें देऊं नको ठावुन,
माझें ठेवुनि चित्त घे!—मग जगीं धन्यत्व मीं मानिन! ४

---

झाली चूक खरी, परन्तु सदये! मातें क्षमा तूं करीं,
मच्चित्तावरतीं यथेष्ट कर गे स्वामित्व तूं सुन्दरी!

'झाली चूक...' आणि 'तूझें दास्य...' या चौथ्या कडव्यातील पहिल्या दोन ओळी खोडल्या असून सुधारलेल्या ओळी खाली लिहिल्या आहेत.

# पुष्पाप्रत.

पुष्पा! सुन्दर किति तूं दिससी!
सौकुमार्य माधुर्यहि धरिसी!
तुजला बघतां मन माझें तूं
वेडें रे करिसी! १

तूं आणिक मी पूर्वी होतों
खेळगडी रे! स्मरुनि अहा! तो
काळ सुखाचा, आतां चित्ता
खेद फार होतो! २

मुग्ध मधुरता चित्तीं घेतां,
पूर्वी अपुली होती समता;
गेला! गेला काळ अहह तो!
फेर किती आतां! ३

सौकुमार्य तव अजुनी आहे,
हंसतचि आहे हास्य तुझें हें;
परि, मम भाळीं ढग अश्रूंचा
हाय! डवरलाहे! ४

तुजला पाहुनि मी नाचावें,
दुडदुडु धावत तुजशीं यावें,
प्रेमें तुजला स्वकरीं घेउनि
सखया! चुम्बावें! ५

आतांहि गमे घ्यावें तुजला,
परी सुटतसे कंप कराला!—
दिव्यत्वाला स्पर्श कराया
भय वाटे मजला! ६

रम्य धुक्याची अद्भुत सृष्टि,
तींत उघडिसी अपुली दृष्टि,
मग तो भास्वान् तुजवरि करितो
तेजाची वृष्टि! ७

मरुद्गण तुझ्या पाळणियाला
तत्पर आंदोलन द्यायाला;
पक्षिमुखांहीं स्वर्ग तुझ्यावरि
गाई गीतांला! ८

रम्य तुझें बा जिणें किति तरी!
परिमलयश तव जाय भूवरी!
कालहि तुझिया दिव्यत्वाला
वाटे नमन करी! ९

चिरतरुणा रे! चिररुचिरा रे!
तुजसन्निध तो वास बरा रे!
तुजमज मध्यें परी केवढी
आहे रुन्द दरा रे! १०

काळोखाच्या जगामधें या,
मृत आशांच्या चितांवरुनियां,
पिशाच माझें भटकत आहे—
शान्ति नसेचि तया! ११

मच्चित्ताच्या क्षितिजावरतीं
नृत्याला जीं स्वप्नें करिती,
निदान, त्यांच्यामध्यें मजला
भासो तव मूर्ति! १२

सौभाग्य पुष्पा! तव गावयाला
मी पात्र नाहीं, गमतें मनाला;
भृंगे तुझें स्तोत्र सुरेख गाती,
ऐकूनि तें सर्व पळोत खंती! १३

ता० १६।३।९२.

दुसरी प्रत दोन बंदांवर लिहिली आहे; त्यात फरक नाही.

# फुलपांखरूं.

बाळ्या :—
"ताई! मला तें धरून दे ग फुलपांखरूं!
गडे! खेळायला,
बागडायला,
हवें मला;
तर धरून मला दे लौकर तें फुलपांखरूं,
दे ग दे ग तें पांखरूं!" १

ताई :—
"बाळ्या! जाउं दे तें नको अह्मा फुलपांखरूं!
उडूं दे रे,
नाचूं दे रे,
फुलांवरी रे,
तें इकडे तिकडे गरिब बिचारें पांखरूं;
पण नको अह्मा तें पांखरूं!" २

बाळ्या :—
"असें कां बरें ह्मणतेस ग माझे ताई?
तें सुरेख किती,
तें खुले किती,
त्याची मजा किती;
तर गोजिरवाणें धरून दे ग, कर घाई!
मला 'नाहीं' ह्मणुं नको कांहीं!" ३

ताई :—
"तें सुरेख आहे, ह्मणून बाळ्या! सांगतें—
तें धरूं नये,
त्याला अडवूं नये,
त्याला दुखवूं नये;
तर सांगुं नको तें धरायला, हेंच मागतें;
पहा! फुलांवरी बागडतें!" ४

बाळ्या :—

"तें सुरेख आहे, म्हणुनच तर मी मागतों;
त्याला कांहीं,
माझे ताई!
दुखवित नाहीं;
मला खेळायला तें धरून दे, हें सांगतों;
गडे! तुझी विनवणी करितों!" ५

ताई :—

"गडे! असा नको तूं धरूं हट्ट रे बाळा!
तें लहान आहे,
फार नाजुक आहे,
कोमळ आहे;
त्याला खपणार नाहीं आपल्या खेळाचा चाळा!
त्याचा होइल चोळामोळा! ६

"माझा शहाणा ना तूं! कडेवर तुला घेतें,
माझ्या बगळ्या रे!
माझ्या छकुल्या रे!
मजा पाहुला रे
त्या पांखरामागुन वेलींमधुन तुला नेतें!
—मग झालें ना?—
सोन्या! पहा कसें तें फुलांवरी बागडतें!
आणिं हवेमधींही तरतें!" ७

---

## शब्दांनो! मागुते या!

तेजाचे पंख वाऱ्या वरि हलवित ती चालली शब्दपंक्ति,
देव्हारा शारदेचा उचलुनि गगनांतूनि ती नेत होती;
शब्दांही चित्तभूमी विकसित हिरवी तों मदीया बघूनी,
देव्हारा माझिया तो उतरुनि हृदयीं स्थापिला गौरवूनी. १
शब्दांसंगें तदा मीं निजहृदयवनामाजि संचार केला,
तेथें मीं कल्पपुष्पें खुडुनि नमुनि तीं वाहिलीं शारदेला,
शब्दांच्या कूजितानें सहजचि मम हृत्प्रान्त गुंगूनि गेला,
मीं त्या स्वप्नांत गद्यग्रथित जग मुळीं लोटिलें तुच्छतेला! २
रागानें या जगानें अहह! म्हणुनियां शापिलें या जनाला,
तेणें चिन्ताग्नि माझी हृदयहरितता नाशिता फार झाला,
गाणारे शब्द सारे झडकरि उडुनी दूरदेशास गेले,
वाग्देवीपीठ येथें परि मम हृदयीं दिव्य तें राहियेलें. ३
वाग्देवी शारदे गे! फिरवुनि अपुले शब्द पाचार येथें!
साहाय्यावीण त्यांच्या भजन तव कसें सांग साधेल मातें?
आशामेघालि चिन्तानल अजि विझवूं जाहलीसे तयार,
शब्दांनो! मागुते या! बहर मम मनीं नूल येईल फार! ४

---

ता० १८-९-१२.

## दिवा आणि तारा.

ताऱ्याला जमिनीवरूनि वदला गर्वें दिवा हें असें :–
"अस्पष्ट द्युति ही किती तव! तुझा रात्रौ कितीसा असे
लोकांला उपयोग? मी बघ कसा तेजा निजा पाडितों,
अंधारीं व्यवहार सर्वहि जगीं माझ्यामुळें चालतो!" १
तारा तों वरुनी दिव्यास वदला गम्भीर शान्त स्वरें :–
"दीपा! तूं म्हणतोस तें कवण तो लेखील खोटें बरें?
जी वस्तुस्थिति ती परन्तु बघतां आहे जरा वेगळी,
अंधारावर तूझिया मम नसे बा! योजना जाहली : २
"भांडीं, तीं मडकीं, डबे,–ढकलिसी अंधार यांपासुनी;
ब्रह्मांडांस परन्तु मी उजाळितों, गेलीं युगें होउनी;
तेजानें वरुनी दिव्या! खुलविसी तूं मानवी-चेहरे,
आत्मे उज्ज्वल आंतले पण गड्या! होतात माझे करें! ३
"ज्ञाते, आणि भविष्यवादि हि कवी, ते चित्रकर्ते तसे,
मत्तेजें फिरतात, अन्य जन हे तूझ्याप्रकाशें जसे;
तूझ्यासन्निध जो कवी लिहितसे त्यालाच तूं पूस रे–
'दीपाच्या लिहितोस तूं द्युतिबलें कीं तारकाच्या बरें?'" ४

---

ता० २६-९-९२.

## 'पण लक्ष्यांत कोण घेतो?' ह्या कर्त्यास.

यूरोपीय कथापुराणकविताग्रन्थांतुनी-चांगले
ते आहेत कितीक थोर उमदे राऊत वाखाणिले ;
ज्यांचें ब्रीद-पवित्र राहुनि, जगीं दुष्टांस दण्डूनियां
कीजे सन्तत मुक्त दुर्बलजनां, मांगल्य वा द्यावया : १
या त्यांच्या बिरुदामुळेंच बहुधा, सन्मान ते जाहले
देते या महिलाजनास पहिला ; स्त्रीवर्गकार्यीं भले
ते भावें रतले, क्षणक्षण मुखें स्त्रीनाम उच्चारुनी ;
भूपृष्ठास्थित आद्य दैवत जणूं त्यां वाटली भामिनी ! २
'आहे रे पण कल्पनारचित हें सारेंहि वाग्डम्बर'
हें कोणी व्यवहारमात्रचतुर प्राणी वदे सत्वर !
'नाहीं !- वाचुनि हें पहा !' म्हणुनि मी तूझी कथा दावितों :
गेले राउत ते न सर्व अजुनी !- हा गर्व मी वाहतों ! ३
~~मित्रा!~~ धीरा! उन्नतिचे पथांत उमदा राऊत तूं चालसी !
नाहीं काय ?- करूनि चीत अगदीं ही रूढिकाराक्षसी
टांकानें अपुल्या दुराग्रह जुना मर्मीं तसा विंधुनी,
स्त्रीजातीस असाच काढ वरतीं !- घे कीर्ति संपादुनी ! ४

---

ता० २९-१०-९२.

## मयूरासन आणि ताजमहाल.

कामें दोन सुरेख त्या नृपवरें केलीं :— मयूरासनीं
      ज्या तो बैसुनि शोभला, प्रथम तें, सा कोटि ज्या लागले,
      राजे ज्यापुढते झुकूनि अपुल्या हस्तद्वया वांकले
झाले कंपित, तत्करीं शिर असे, येऊनियां हें मनीं;
केलें जें दुसरें तये, निज सखीसाठीं, तया लावुनी
+     कोटी तीनच, तो महाल यमुनातीरावरी : चांगलें
      चोरें आसन तें दुरी पळविलें! स्मर्तव्य कीं जाहलें!
आहे अद्भुत तो महाल अजुनी तेथें उभा राहुनी!

विल्हेवाट अशीच रे तव कृती त्या सर्वदा पावती :
      मत्त भ्रान्त नरा! सदैव कितिही तूं धूप रे जाळिला
स्वार्थाच्या प्रकृतीपुढें— निज मनीं ही याद तूं जागती
      राहूं दे— तरि धूर होइल जगीं केव्हांच तो लोपला!
काडी एकच गन्धयुक्त नमुनी तूं लाव प्रीतीप्रती, *
      तीचा वास सदा जगीं पसरुनी देईल तो तुष्टिला!
                  * प्रीतीस, तू लाव ती,

ता० १३-११-१२.

\+ प्रेमे मन्दिरही तसें निजसखीसाठीं तयें लावुनी
      कोटी तीनच, त्या गभीर यमुनातीरावरी बांधिलें!

काकपद आणि * अशी खूण करून खाली लिहिलेल्या ओळी पेन्सिलीने लिहिल्या आहेत.

# चिरवियुक्ताचे उद्गार.

वृष्टीं-
~~वर्षे~~मागुनि चन्द्रकान्तिधवला ती ये शरत् साजिरी;
तैसा रम्य वसन्त तीव्र शिशिरामागूनि तो येतसे;
सूतिक्लेश सरे, अनन्तर सुखा तें तान्हुलें देतसे;
पाणी ओसरतां समग्र भरती येते पुनः सागरीं;
धुत्याविष्कृति मोक्षकाल करितो खग्रास झाल्यावरी;
कृष्णानन्तर शुक्लपक्ष-चढती तो कौमुदी घेतसे;
प्रातःकाल सुरेख गाढ रजनीमागूनि तो होतसे;
होतां दारुण कल्प-अन्त फिरुनी सृष्टि स्मिता आदरी!

या गोष्टी गणणें असे सुलभ गे त्यांला, ज्यांच्या मनीं
आशातन्तु नसे अजूनि तुटला, - ते भाग्यशाली खरे!
कान्ते! मत्सम गे परन्तु असती जे या अभागी जनीं,
त्यांची वाट विपत्समाकुल जगीं होणार कैशी बरें!
उत्कण्ठाज्वलनें तुझा विरह हा टाकी मला पोळुनी,
या गोष्टी गणतां निराश हृदयीं माझ्या भरे कांपरें!.

---

ता० १८-११-९२-

पहिल्या ओळीतील पहिला शब्द दुसऱ्या प्रतीतही बदलला आहे.

# स्वप्नामध्यें स्वप्न.

"All that we see or seem
Is but a dream within a dream"
— Edgar A. Poe.

हें चुम्बन निज मुखावरी माझें घे;
[redacted] जातां जातां हें मज बोलूं दे गे :—
वाटे तुज कीं, माझे दिवस पळाले
स्वप्नापरि, तें खोटें नच गे बाले;
तथापि जर ती गेली आशा निघुनी.
एका रात्रींतुनि वा दिवसामधुनी,
स्वप्नामधुनी किंवा न-कशांतुनिही,
तर ती गेली कमती का गे कांहीं?
सर्व आम्ही जें बघतों करितों वा जें
स्वप्नांतिल तें स्वप्नच, सखये माझे!

कल्लोळांच्या क्षोभें गर्जत आहे
त्या सागरतीरीं उभा गडे! मी आहें,
धरिले असती मी या स्वकरामाजी
स्वर्णवालुकाकण, जे नसती राजी :
किती थोडके! परी कसे ते गळति—पहा ते पळती
माझ्या बोटांमधुनि, सागरा जाती;
माझ्या नेत्रांमधुनि आंसवें चलति—आंसवें गळती!
अहा ईश्वरा! घट्ट मूठ ही वळुनी
पकडाया ते शक्त मी न कां म्हणुनी?
अहह ईश्वरा! शक्ति न कां राखाया
एकहि कण निर्घृण लाटेपासुन या?
बघतों आम्ही करितों वा जें सारें
स्वप्नांतिल तें स्वप्नच व्हावें का रे?

ता० १९-१२-२२.

## संध्याकाळ :

संध्याकाळ असे : रवी उतरतो आहे समुद्रावरी,
त्याचें बिम्ब सुरेख चुम्बिल पहा लाटांस या लौकरी;
मातीला मिळुनी गळूनि पडलें तें पुष्प जाई जसें,
लोपाला ~~संवबिम्ब नॉरले अतां लाटांमधीं~~ हें तसें ! १
आकाशीं ढग हे पहा विखुरले, त्यांच्यावरी सुन्दर
रंगाच्या खुलती छटा, बघुनि त्या येतें स्वचित्तावर :–
हा मृत्युंगत होतसे दिवस, तन्मस्तिष्कपिंडांवरी
येती अक्षयमोक्षसिन्धुलहरी तेजोयुता यापरी ! २
पक्षी हे घरट्यांकडे परतुनी जातात कीं आपुले,
त्यांलागीं किलबील शब्द करुनी आनन्द देती पिलें;
गाई या कुरणांतुनी परततां हम्बारवा फोडिती,
त्यांचे उत्सुक वत्स त्यांस अपुल्या दीनस्वरें बाहती. ३
आनन्दी दिसती युवे, फिरकती जे या किनाऱ्यावरी,
(सुन्दरीस) ध्याती ते निज ~~मधुकांस~~, गमतें, उल्हासुनी अन्तरीं;
जी ही मन्दिरराजि पैल दिसते, तीच्या गवाक्षांतुनी
झाल्या त्या असतील युवती चित्तीं असें आणुनी :– ४
"अस्ताला गुलनि जातसे दिनमणी; रात्री अहा येतसे !
रात्री! जादु किती (विलक्षण हवी) नामामधें या असे !
प्रेमाचें हृदयीं उषीं कुमुद जें संकोच गे पावलें
देसी त्यास विकास तूं ! – (विश्व फुलती तुझ्याकडे लागलें !) ५
संध्येला प्रणयी तुम्ही जन सुखें द्या हो दुवा; मी करीं
हेवा तो न मुळीं; नसे प्रणय तो माझ्याहि का अन्तरीं?
आहें मी घर सोडुनी पण दुरी; चित्तीं म्हणूनी असें
मी संध्यासमयीं उदास; – अथवा व्हावें तरी मीं कसें? ६

*. ४ थी ओळ – "लोपाला लहरींत मंडलहि हें जाईल आतां तसें."

खोडून लिहिलेला मजकूर आणि मोडीतील स्थळकालनिर्देश कवीच्या हस्ताक्षरात आहे.

## क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास.

(कवि, चित्रकार आणि तानसेन ~~यांच्या [illegible] दृष्टीस~~ यांस जीं अलौकिक स्वप्नें, ज्या दिव्याकृति आणि जे गन्धर्वालाप भासमान होतात,—अहह!— त्यांपैकीं किती थोडे मात्र त्यांस आपल्या करामतींत गोंवून ठेवितां येतात बरें!)

आत्माराम सुखें वनामधुनि तो होता जरा हिंडत,
तों झाला बघता दुरूनि सहसा कोण्या सुमूर्तीप्रत;
तीच्यामागुनि मोहुनी हळुहळू जायास तो लागला,
"आहे ही पण कोण?" या क्षणभरी प्रश्नावरी थांबला! १
"रम्भे!" "उर्वशि गे!"—तशींच दुसरीं जीं त्यास होतीं प्रियें
नामें, त्यांतिल घेउनी फिरुनि तो बाही त्वरेनें तिये;
ती कांहीं तरिही वळे न, बघुनी तो विस्मया पावला,
जातां सन्निध, "ही नवीनचि अहा! कोणी दिसे" बोलला! २
कांहीं नांव नवीन देउनि तिला जेव्हां तयें बाहिलें,
तों तीनें वळुनी प्रसन्नवदनें त्याच्याकडे पाहिलें;
त्या रूपद्युतिनें दिपूनि नयनें, निर्वाण तो पावला;
तों अन्तर्हित, दृष्टिचा विषय तो, एका क्षणीं जाहला! ३
आकाची हुकुम्यांत हाक परिसे आत्मा, घराला वळे;
आकाच्या हुकुमांत, साक्ष अवघी ती विस्मरूनी, रुळे;
कोणेका दिवशीं तिथेच फिरतां ती गोष्ट त्याला स्मरे,
तच्चित्तीं, पण, रूप नाम अथवा तीचें मुळींही नुरे! ४
आत्माराम सखेद होउनि वदे तों आपणाशीं असें—
"कांहीं सुन्दर देखिलें खचित मीं, यामाजि शंका नसे!
"हा! हा!—हे जर सर्व भास धरतां येतील मातें, तर
"पृथ्वीचा सुरलोक की बनवुनी टाकीन मी सत्वर!" ५

---

मुंबई ता. २४-३-९३.

दुसऱ्या प्रतीत कंसात लिहिलेल्या मजकुरात 'आपल्या' ऐवजी 'आपापल्या' असा बदल असून 'आत्माराम आणि आका कोण हे सांगावयास नकोच' असा मजकूर आहे.

## तुतारी.

एक तुतारी द्या मज आणुनि!
फुंकिन जी मी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें,
अशी तुतारी द्या मजलागुनि! १

अवकाशाच्या ओसाडींतिल
पडसाद मुके जे आजवरी,
होतिल ते वाचाल सत्वरी
फुंक मारितां जीला जबरी,
कोण तुतारी ती मज देइल? २

सारंगी, ती सतार सुन्दर,
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा,
सूरहि, सनई, अलगुज, — माझ्या —
कसचीं हीं हो पडतिल काजा?
एक तुतारी द्या तर सत्वर! ३

रूढी जुलूम यांचीं दुर्मद
सन्तानें राक्षसी — हंतहा! —
खादाड तुम्हां खातात पहा!
जलशाचा का समय असे हा?
तुतारिनें या व्हा तर सावध! ४

अवडम्बरलीं ढगें कितीतरि;
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे :
गाफीलगिरी तरिहि जगावरि! ५

चमत्कार! तें पुराण तेथुनि
सुन्दर सोज्ज्वळ गोडें मोठें,
अलिकडले तें सगळें खोटें;
म्हणती धरुनी ढेरीं पोटें!
थुः त्यांच्यावर! जोडे हाणुनि! ६

जुन्या नभीं या ताजे तारक,
जुन्या भूमिवरि नवी टवटवी,
जुना समुद्रहि नव रत्नें वी;
जुन्यापासुनी निष्पत्ति नवी
काय! नव्हे ती श्रेयस्कारक? ७

जुन्या धरेवर नव तरु सुन्दर,
जुन्या तरूवरि नवी कळी ती,
जुन्या कळ्यांतुनि फळें उपजती,
फळांतूनि त्या नव रस गळती,
का न म्हणावे मधुर खरोखर? ८

जुनें जाउं द्या मरणालागुन,
जाळुनि किंवा पुरुनी टाका!
सडत न एका ठायीं ठाका,
सावध! ऐका पुढल्या हाका!
खांद्यास चला खांदा ~~घांसून~~! भिडवुन! ९

उंच अशा बैसुनि तक्तावर
एक वैभवा थोर भोगितो,
धुळीमधें तो अन्य लोळतो
हाल न कुत्रा त्याचे खातो!
काय असे ही स्थिती बरोबर? १०

वंदुनियां ह्या देवांलागुनि
धाई धाई मानव रडती!
पायपोस त्यां हाणा सम्प्रति!
देव कशाचे! — अश्रु जे पिती
क्रूरतर न का ते असुरांहुनि? ११
रुधिरा दानव, अश्रूंला सुर
पिती; रक्त हे ~~[illegible]~~ देहामधुनी
वाहे, अश्रू पण मेंदूतुनि;
श्रेष्ठ अश्रु ते शोणिताहुनी;
असुरांहुनि हे देवचि आसुर! १२

अव... १३
स्त्रीवर्गाला स्वदास ठेवुनि,
दाससंतती मानव होतो,
स्त्रीला अज्ञानात ठेवतो,
परिणामीं ऱ्हासास पावतो;
धिक्कार! अशा चालीलागुनि! १४
पडली छाया मनुजाची जर,
विटाळ होतो तर मनुजाला,
व्हावें स्नानचि सचैल त्याला;
काय म्हणावें या मूर्खांला? —
~~पशूंहुनीही पशु मानती तर~~! १५
नरेंचे केला हीन किती नर!

वर काकपदाने दाखविलेली कडवी दुसऱ्या पानामागे लिहिली आहेत ती पान एक्याण्णववर मुद्रित केली आहेत.

हल्ला करण्या ह्या दंभावर—ह्या बंडावर,
धीरांनो! या त्वरा करा रे!
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे!
शूरांनो! तर सरा पुढारे
तुतारिच्या या सुराबरोबर! १६

पूर्वीपासुनि अजुनि सुरासुर
तुम्बळ संग्रामाला करिती;
सम्प्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरवीती;
देवांच्या मदतीस चला तर! १७

---

— [illegible] २८-३-८३.

स्त्रीवर्गाला दास्यीं दडपुनि,
दासीपुत्रचि मानव होतो,
स्त्रीला अज्ञानांत ठेवितो;
परिणामीं दुर्दशेस जातो;
धिक्कार अशा चालीलागुनि! १३

पत्नीनिधनीं अन्य वरी नर,
परि पति मरतां स्त्रीच्या, तीतें
बळेंचि देतो संन्यासातें
विसरुनि हें-जनिसा फल्यातें
अवश्य आहे संसृति भूवर. १४

## तुतारी.

एक तुतारी द्या मज आणुनि,
फुंकिन जी मी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें,
अशी तुतारी द्या मजलागुनि. १

अवकाशाच्या ओसाडींतिल
पडसाद मुके जे आजवरी,
होतिल ते वाचाल सत्वरी
फुंक मारितां जीला जबरी,
कोण तुतारी ती मज देईल? २

सारंगी ती, सतार सुन्दर,
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा,
सूरहि, सनई, अलगुज, – माझ्या
कसचीं हीं हो पडतिल काजा?
एक तुतारी द्या तरसत्वर. ३

रूढी जुलूम यांचीं भेसुर
सन्तानें राक्षसी तुम्हाला
फाडुनि खाती, ही हतवेला
जल्शाची का? – पुसा मनाला;
तुतारिनें द्या सावध व्हा तर! ४

अवडम्बरलीं ढगें कितीतरी,
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे!
गाफीलगिरी तरिहि नभावरी? ५

ही प्रत मागाहून लिहिली आहे.

चमत्कार! तें पुराण तेथुनि
सुन्दर, सोज्वळ, गोडें, मोठें,
अलिकडलें तें सगळें खोटें
म्हणती, धरुनी ढेरीं पोटें;
धिक्कार अशा मूर्खांलागुनि! ६

जुन्या नभीं या तेजे तारक,
जुन्या भूमिवर नवी टवटवी,
जुना समुद्रहि नव रत्नें वी;
जुन्यांतून जी निष्पत्ति नवी
काय नव्हे ती श्रेयस्कारक? ७

जुनें जाउं द्या मरणालागुनि,
जाळुनि किंवा पुरुनि टाका,
सडत न एक्या ठायीं ठाका,
सावध! ऐका पुढल्या हाका!
खांद्यास चला खांदा भिडवुनि! ८

प्राप्तकाल हा विशाल भूधर,
सुन्दर लेणीं तयांत खोंदा,
नांवें अपुलीं त्यांवर नोंदा;
बसुनी कां वाढवितां मेदा?
विक्रम कांहीं करा, चला तर! ९

अटक कशाची बसलां घालुनि?
पूर्वज वदले त्यां गमलें तें —
ऐका खुशाल सादर चित्तें; —
परन्तु सरका निशंक पुढते
निरोप त्यांचा ध्यानीं घेउनि! १०

निसर्ग निर्घृण, त्याला मुर्वत
नाहीं अगदीं पहा कशाची!
कालासह जी क्रीडा त्याची,
ती सकलांला समान जाची —
चुरुनी टाकी प्रचंड पर्वत! ११

त्याशीं भिडुनी, झटुनी, झगडत
उठवा अपुले उंच मनोरे!
पुराण पडक्या सदनीं कां रे
भ्याड बसुनियां रडता पोरें?
पुरुषार्थ नव्हे पडणें रखडत! १२

संघशक्तिच्या भुईंत खंदक
रुंद पडुनि शें तुकडे झाले,
स्वार्थनिरपेक्ष जीवीं अपुले
पाहिजेत ते सत्वर भरले;
घ्या त्यांत उड्या तर बेलाशक! १३

धार धरिलिया प्यार जिवावर,
रडातिल, रडोत, रांडा पोरें;
गतशतकांचीं पापें घोरें
क्षालायाला तुमचीं रुधिरें
पाहिजेत! – रे स्त्रैण न व्हा तर! १४

जाऊं बघतें नांव लयाप्रत,
तशांत बनलां मऊ मेंढरें,
अहह! घेरिलें आहे तिमिरें!
परन्तु होऊं नका बावरे —
धीराला दे प्रसंग हिंमत! १५

धर्माचें माजवूनि डम्बर,
नीतीला आणिती अडथळे;
विसरुनियां हें जातात खुळे :—
नीतीचें पद जेथें न ढळे
धर्म होतसे तेथेंच स्थिर. १६

हल्ला करण्या तर दंभांवर—तर बंडांवर,
शूरांनो! या त्वरा करा रे!
समतेचा ध्वज उंच धरा रे!
नीतीची द्वाही पसरा रे
तुतारिच्या या सुराबरोबर! १७

नियमन मनुजासाठीं, मानव.
नसे नियमनासाठीं जाणा;
प्रगतिस जर तें हाणी टोणा,
झुगारुनि तें देउनि, बाणा
मिरवा निज ओजाचा अभिनव! १८

घातक भलत्या प्रतिबन्धांवर
हल्ला नेण्या करा त्वरा रे!
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे!
वीरांनो! तर पुढें सरा रे
आवेशानें गर्जत "हरहर"! १९

पूर्वींपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
सम्प्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरवीती!—
देवांच्या मदतीस चला तर! २०

# फुलांतले गुण.

बांधावरि झुडुप एक,
पुष्प तयावरि सुरेख,
पाहुनि, मी निजहृदयीं मुदित जाहलों,
त्याजवळि चाललों ! १

जाउनियां, त्या सुमनीं
काय असे, हें स्वमनीं
मनन करित, उन्मन मी तेथ ठाकलों,
या पंक्ति बोललों ! — २

पुष्पीं या सुन्दरता
फार असे, ती चित्ता
वेधुनि, संसारताप सारिते दुरी,
उल्लसित त्या करी ! ३

पुष्पीं या प्रीति असे,
ती मीपण हाणितसे,
पर विषयीं तन्मयत्ना प्रेरिते उरीं,
ने दृष्टि अन्तरीं ! ४

मार्दवही यांत फार,
कारण, निज मधुतुषार
ढाळितसे ~~निजकलिका~~ खुलतेच्या पल्लवीं अहा !
तें द्रवतसे पहा ! ५

सद्गुणही यांत वसे,
कारण कीं, तेज असे
तेथें, स्मित करित सदा आढळे पुढें,
त्या तम न आवडे ! ६

दुसऱ्या प्रतीत फरक नाही.

जादूही यांत भरुनि
दिव्य असे, ती पसरुनि
निज धूपा वाऱ्यावरि, दश दिशा भरी,
बेहोष कीं करी! ७

यापरि मी उन्मनींत
होतों आलाप घेत;
आणिक या फुलामधीं काय हो असे?
तें काय हो असे?–८

तों जवळुनि मधमाशी
आली गुणगुणत अशी
"गाणें तें फुलामधें आणखी असे!"
ती बोलली असें! ९

पेल्यामधिं पुष्पाच्या,
गुंगत ती त्याच वचा,
शिरली; त्या वचनाची सार्थता भली
तों व्यक्त जाहली! १०

गुणगुणली मधमाशी—
"पुष्पीं गुण जे तुजसी
आढळले, तुजमध्यें कितिक त्यांतुनी?–
बा, घेइं पाहुनी!" ११

---

[illegible] ३१-३-९३.

## अपूर्णा

हर्षखेद ते मावळले
हास्य निमाले
अश्रु पळाले
कण्टकशल्यें बोंथटलीं
मखमालीची लव वठली
कांहीं न दिसे दृष्टीला
प्रकाशही गेला
~~तिमिर~~ तिमिर हरपला
काय म्हणावें या स्थितीला?—
अपूर्ण

हर्षशोक हे ज्यां सगळे
त्यां काय कळे?
त्यां काय वळे?
हसलिल जरि ते आम्हांला
भय न धरूं हें वदण्याला:-
व्यर्थ ~~[illegible]~~ अधिकाचि अर्थ वसे,
तो त्यांस दिसे
ज्यां म्हणती पिसे;
त्या अर्थाचे बोल कसे?—
अपूर्ण गडे अपूर्ण!

शीतारक कंपनावरून
धीरत्व धरून
उड्डाण करून
निद्रानचपला ही जाते,
नाचत तेथें झगझगते;
~~अंधुक आ~~
अंधुक आकृति तिस दिसती,
त्या गाताती
निगूढ गीती,
त्या गीतींचे ध्वनि निघती —
अपूर्ण गडे अपूर्ण!

नांगरिल्या किंग भुई बरी
असे किती तरी
पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा?—
हजारांतुनी एकादा!
तरी ना, तेथुनि वनमाला
आणायाला
अटक ~~तुम्हाला~~ तुम्हांला;
मात्र गात हा मंत्र चला —
अपूर्ण गडे अपूर्ण!

पेन्सिलीने लिहिली आहे.

पुरुषाशी त्या रम्य अति
    नित्य प्रकृति
    क्रीडा करती;
स्वरसंगम त्या क्रीडांची
अोळखणे हा ध्यानाचा
हेतु; तयाची सुन्दरता
    साध्य चित्ता-
    प्रत ती ज्ञाता,
प्रेमें गा हे आनि हे आतां— वाडें कोडें गा अतां-
        अपूर्व गडे अपूर्व!

सूर्य चन्द्र आणिक तारे
    नाचत सारे
    हे प्रेमभरें
खुषीत खुषीं फिरति जिथें
आहे जर जाणें तेथें,
धरा जरा निःसंगपण
    मारा फिरके,
    मारा गिरके,
नाचत गुंगत म्हण म्हण:—
        अपूर्व गडे अपूर्व!

40
30
5
75
6
81

5
3
8
2/6

120

40

64
84
32

६५

# झपूर्झा!

[आपल्यास जें कांहीं नाहीं असें वाटतें, त्यांतून च महात्मे जगाच्या कल्याणाच्या चिजा बाहेर काढितात. त्या महात्म्यांची स्थिति लक्ष्यांत वागवून पुढील गाणें वाचिल्यास, तें दुर्बोध होऊं नये, असें वाटतें.]

हर्षखेद ते मावळले,
हास्य निवालें,
अश्रु पळाले;
कण्टकशल्यें बोंथटलीं,
मखमालीची लव वठली;
कांहीं न दिसे दृष्टीला,
प्रकाश गेला,
तिमिर हरपला;
काय म्हणावें या स्थितिला?—
झपूर्झा! गडे झपूर्झा!

हर्षशोक हे ज्यां सगळें,
त्यां काय कळे?
त्यां काय वळे?
हंसतिल जरि ते आम्हांला,
भय न धरूं हें वदण्याला:—
~~व्यर्थ अधिका~~
व्यर्थी

भृंग आणि प्रीति या कवितांसह फूलस्केप कागदावर केलेली नक्कल.

# थकलेल्या भटकणाराचें गाणें.

किती रहावें तुजविण आतां! धीर न मजला क्षण धरवे!
गेलें गेलें वय हें वायां! – मरणहि तें वाटे बरवें!
काय करावें मज न सुचे,
मुळीं न मजला किमपि रुचे,
हृदयीं सगळें धैर्य खचे;
भणभण वणवण करित अधिक मज आढ्यींहि जगीं नच फिरवे!
किती रहावें तुजविण आतां! धीर न मजला क्षण धरवे! १

~~शुंयीमध्यें तुज शोधाया कितिक पारिल्या भरारिया!~~
+ ~~व्यर्थ जाहले श्रम ते सगळे! – येति जिव्हाळ्या शिसारिया!~~
पुष्पांनो! ~~जा~~ दूर सरा!
कण्टक हो! मार्गी पसरा!
प्रकाश नलगे – तिमिर बरा!
सर्व चांगलें व्हावें होतें तुजसाठीं – पण लभ्य नव्हे!
किती रहावें तुजविण आतां! धीर न मजला क्षण धरवे! २

शूळ कपाळीं, कंडन हृदयीं, कम्प शरीरीं भरलासे,
सलिल लोचनीं, शीण अवयवीं; हाय! निराशा ~~आशा अम्हीं~~ मनीं वसे;
तरि, माझी ती भेटेल का?
(मनींचा) ~~भेटेल का?~~ पांग फिटेल का?
आलिंगून ती ~~म्ह~~ झटेल का?
क्षमा करिल का मला चुक्यांची? – पुसतों मी माझ्ये ~~मा~~ बरवें!
किती रहावें तुजविण आतां! धीर न मजला क्षण धरवे! ३

पुरव. [illegible] २८/६/९३.

+ कितिक योजिले यत्न मानव्या तुजसाठीं मी उत्सुकतेनें!
व्यर्थ जाहले अवघे; दुर्धर कसें न व्हावें मग जगणें?

# प्रीति आणि तूं.

रानोमाळ कुठेतरी तुजविणें मी हिंडतां वेंचिलीं,
काांहीं रम्य फुलें, परी झडकरी निर्माल्य माझ्या करीं
झालीं मी विरहाग्नितप्त असल्यायोगें; गडे त्यापरी
ओसाडींत दिशांचिया भटकतां गाणीं मला लाभलीं;
डोक्याच्या भ्रमणामुळें बिघडुनी विक्षिप्त तीं जाहलीं.
हीं गाणीं कुसुमेंहि तीं परि दिलीं मीं टाकुनी का दुरी?—
नाहीं!— ठेवियलीं जपूनि असती अद्यापि गे सुन्दरी!
तीं मीं कां?— हृदयीं विचारुनि पहा— कां बुद्धि ही सूचली?
कोणी तीं कचऱ्यावजा समजुनी टाकावया लागला,
त्यालागूनि निषेधिलें, न कथिला हेतू तरी मीं तया;
तो हा कीं जर भेटलीस तर मी दावीन तीं मी तुला,
तेणें व्यक्त तुला न राहिल सरवे हें एवढें व्हावया :—
दुर्दैवें तुज सोडुनी जरि दुरी लागे फिरावें मला,
प्रीती आणिक तूं— शिवाय न सुचे कांहीं मना माझिया!

---

एक्सोदोन

# धूमकेतु आणि महाकवि.

तुम्ही दोघे कोठुनि चुकलां इकडे हो वाटे?
अन्य श्रेयस् विश्वामधुनी खचित, मला वाटे ! १
निश्चिन्त तुम्ही स्वयंप्रकाशी अप्रतिहत फिरतां,
केन्द्र सोडुनी दूरवरी हो स्वैरपणें भ्रमतां ! २
भास्करभसित स्थानापासुनि वेध घेत मोदें,
विश्वान्तींचें तमांत शिरतां आपुल्याचि नादें ! ३
जगांतिल महाक्रान्तींचें तें भविष्य सांगाया
तुम्ही येतसां !– लावितसांही तें लोकां गाया ! ४
जड धातूचे तुम्ही न दिसतां–तेजस्तत्वाचे!
कोठुनि अथवा ब्रह्माण्डीं हो स्वेच्छ गमन तुमचें? ५
कधींमधिं तुम्ही विचित्र पुतळे उगवतसां थाटें !
वदा तर तुम्ही कोठुनि चुकलां इकडे हो वाटे? ६

# विद्यार्थ्याप्रत .

महल भारी आहे या पृथ्वीचें,
त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें;
परि तुजमध्यें महतीचें जें बीज
त्याहुनि कांहीं मोठी नाहीं चीज ;—
ठसव मनीं हें साचें,
बाबा!
हें वच बहु मोलाचें ! १

अग्नि असे हा तेजस्वी रे फार,
त्याहुनि भारी सूर्य नभींचा थोर,
परी किरण जो तुजमध्यें सत्याचा
प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा ;—
घोक सदा हें वाचे,
बाबा!
हें वच बहु मोलाचें . २

पृथ्वीमध्यें रत्नें बहु आहेत,
आकाशीं तर असंख्य दिसताहेत;
परि एक रत्न तुजमध्यें जें सच्छील
कोणाला नच सर त्याची येईल ;—
स्मरण असू दे याचें,
बाबा!
हें वच बहु मोलाचें . ३

स्नायूमध्यें पुष्कळ आहे शक्ति,
नृपवेत्रीं तर फारच आहे म्हणती ;
परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी !—
पठन तर करीं त्याचें,
बाबा!
जग हें बदलायाचें ! ४

# उत्तेजनाचे दोन शब्द.

जोर मणगटांतला पुरा
घाल घाल खर्चीं,
हाण टोमणा, चळ न जरा,
अचुक मार बर्चीं ! १
दे टोले जोंवरी असे
तप्त लाल लोखंड,
येइल आकारास कसें
झाल्यावर तें थंड ? २
उंच घाट हा चढूनियां
जाणें अवघड फार,
परि धीर मनीं धरूनियां
न हो कधीं बेजार. ३
यत्न निश्चयें करूनि तूं
पाउल चढतें ठेव,
मग शिखराला पोंचुनि तूं
दिसशिल जगास देव ! ४
ढळूं कधींही देउं नको
हृदयाचा निर्धार,
मग भय तुजला मुळीं नको,
सिद्धि खास येणार ! ५
झटणें हें या जगण्याचें
तत्त्व मनीं तूं जाण,
म्हणून उद्यम सोडुं नको
जोंवरि देहीं प्राण ! ६

## घड्याळ.

गडबड घाई जगांत चाले,  
आळस डुलक्या देतो पण;  
गंभीरपणें घड्याळ बोले –  
'आला क्षण – गेला क्षण!' १

घड्याळास या नाहीं घाई,  
विसांवाहि तो नाहीं पण;  
त्याचें म्हणणें ध्यानीं घेई –  
'आला क्षण – गेला क्षण!' २

कर्तव्या जे तत्पर त्यांचें  
दृढ नियमित व्हावयास मन,  
घड्याळ बोले अपुल्या वाचे –  
'आला क्षण – गेला क्षण!' ३

कर्तव्याला विमुख आळशी  
त्यांच्या हृदयीं हाणित घण,  
काळ – ऐक! – गातो अपुल्यापाशीं –  
'आला क्षण – गेला क्षण!' ४

ऐवाजम्याचे हृत्ती सुलती,  
लक्ष्य त्यांकडे देतो कोण,  
मित रव जर हे सावध करिती –  
'आला क्षण – गेला क्षण!'? ५

आनन्दी आनन्द उडाला,  
नवरीला वर योग्य मिळाला!  
थाट बहुत मंडपांत चाले –  
भोजन, वादन, नर्तन गान!  
काळ हळू ओठीवर बोले –  
'आला क्षण – गेला क्षण!' ६

'कौतुक भारी वाटे लोकां  
दाखविण्या पाहुण्या दिमाखा,  
तेणें फुकटचि जिणें होतसे!  
सदा! करा तर सत्कृतिला!'  
सुचवित ऐसें, काळ वदतसे –  
'क्षण आला – क्षण गेला!'

वार्द्धक जर सौख्यांत जावया  
व्हावें, पश्चात्ताप जुळनियां,  
तर तरुणा रे! मला वाटते,  
ध्यानी संतत अपुल्या आण  
घड्याळ जें हें अविरत वदतें –  
'आला क्षण – गेला क्षण!'

---

[illegible]. ३।१२।०८

## स्फूर्ति

काठोकाठ भरूंद्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या!
प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणीं ते बदलूं द्या!
अमुच्या भाळीं कटकट लिहिली वटवट करुनी जगण्याची
म्हणेल जग आम्हांस दारुडे, पर्वा कसली मग याची?
चिंतेचीं बंधनें तर ढिलीं करा तीव्र या पेयानें,
यदृच्छतेनें यानापथीं दूरुनि भिरकटती वेगानें!

रंग मानसीं होऊनी
व्हावें तें आणा ध्यानीं
या मग सुचतिल तीं गाणीं

पारीसुनि त्यांचे शब्द स्फूर्तिचे हास सर्वांतें खवळूं द्या!
काठोकाठ भरूंद्या १० १० ५ ५

सोमाचा रस वेद काळच्या ~~ऋषि~~ ऋषिवर्यांनीं उकळीला, (निर्मीला)
शेष तयाचा हा या जौंवर पिपासु जे त्या आम्हांला!
औचित्याच्या फोल विवेका! जा निघ! या दुरवस्थेनें
आम्हां घेरितें, म्हणुनी ~~चिंता विसरुनि तरें या पेयानें~~!
चिंतुनि मत घेती सिंगुनियां हा पानानें!
कुस्तीची मग करुनी नौका व्योमसागरीं तरुं जाऊं
उडुरत्नें या गरीब धरेला तेथुनि फेंकुनीयां देऊं!

~~अन्तर~~ अडवतील जर देव, तरी,
झगडूं त्यांच्याशीं ~~[illegible]~~, निकरीं,
हार न खाऊं रती भरी!

देव दानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कळवूं द्या!
काठोकाठ भरूंद्या पेला २० ५ २५

मागच्या बाजूस तिसरे कडवे लिहिले आहे.

शब्दपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिलीस असे,
टेकुनि टेंकुनि ती जनताशीर्षावर जग उलथुनि या देउं कसें!
~~बं~~ बंडाचा तो झेंडा उभवुनि, धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि, जुलुमाचे या करूं पहा तुकडे तुकडे!
'महादेव! हरररर!' समराचा वाऱ्याच्या झुळुकांवरती
गर्जत पडतो अमुच्या कर्णी, निजती ते मरणि मरती!

उठा उठा! बांधा कमरा!
मारा किंवा लढत मरा!
सत्त्वाचा 'उदयोस्तु' करा!

^ ~~छंद फंद निर्बंध आमचे स्वच्छंदे जगाला टवळूं द्या!~~
कांठोकांठ भरूं द्या पेला फेंस भराभर उसळूं द्या! ॥२॥

---

^ छंद फंद उच्छृंखल अमुचे विस्मित जगाला टवळूं द्या!

# स्फूर्ति

कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या!
प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणी ते बदलूं द्या!
अमुच्या भाळीं कटकट लिहिली सदैव वटवट करण्याची,
म्हणोत जग आम्हांस मद्यपी, पर्वा कसली मग याची?
जिव्हेचीं बन्धनें तर ढिलीं करा तीव्र या पेयानें,
यदुष्णतेनें द्यावापृथ्वी द्रवुनि मिसळती वेगानें!
~~रंग सारखी होउनी~~, होउनियां मग दंग मनीं,
व्हावें तें आणा ध्यानीं,
या मग सुचतिल तीं गाणीं;
पारसुनि त्यांचे शब्द, रूढिचे दास झणीं ते खवळूं द्या!
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या! १

सोमाच्या रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनी उकळीला,
शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या आम्हांला!
औचित्याच्या फोल विवेका! जा निघ! या दुरवस्थेनें
असें घेरिलें, म्हणुनी ~~[illegible]~~ घेतों झिंगुनिवां ह्या पानानें!
कल्पनेची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊं,
उडुरत्नें या गरिब धरेला तेथुनि फेंकुनियां देऊं!
अडवतील जर देव, तरी
झगडूं त्यांच्याशीं ~~[illegible]~~ निकरीं,
हार न खाऊं रतीभरी!
देवदानवां नरें निर्मिलें, हें मत लोकां कळवूं द्या!
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या! २

पद्य-
~~सत्र~~पंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,
टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनि या देउं कसें!
बंडाचा तो झेंडा उभवुनि, धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि, जुलुमांचे या करूं पहा तुकडे तुकडे!
'महादेव! हरहर!' समराचा गर्जत तो वाऱ्यावरती
येउनि घुमतो अमुच्या कर्णीं—"निजती ते गतचि मरती!"
उठा उठा! बांधा कमरा!
मारा किंवा तटत मरा!
सत्याचा 'उदयोस्तु' करा!
छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या!
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या! ३

पुणे, दि २३।१२।४८

## रांगोळी घालतांना पाहून.

श्लोक

होतें अंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुन्दर,
बालार्कें अपुली प्रभा वितरली नेत्रोत्सवा त्यावर;
तीची जी भगिनी अशी शुभमुखी द्वारीं अहा पातली,
रांगोळी मग त्या स्थळीं निजकरें घालावया लागली. १

आधीं ते लिहिले तिनें रविशशी, नक्षत्रमाला तदा,
मध्यें स्वस्तिक रेखिलें, मग तिनें आलेखिलें गोष्पदां,
पद्में, बिल्वदलें, फुलें, तुळसही, चक्रादिकें आयुधें
देवांचीं लिहिलीं; न तें वगळिलें जें चिन्ह लोकीं सुधें. २

होती मंजुल गीत गात वदनीं अस्पष्ट कांहीं तरी,
गेला दाटुनि शान्त तो रस अहा तेणें मदभ्यन्तरीं,
तीर्थ, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना
अन्तर्दृष्टिपुढूनियां सरकल्या; सन्तोष झाला मना! ३

चित्रें मीं अवलोकिलीं रुचिर जीं, काव्यें तशीं चांगलीं,
त्यांहीं देखिल न स्मरेच इतुकी मद्वृत्ति आनन्दली;
लीलेनें स्वकरें परन्तु चतुरे! तूं काढिल्या आकृति,
त्या या पाहुनि रंगली अतिशयें आहे मदीया मति. ४

रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो आर्ये! मला वाटतो,
स्पष्टत्वें इतुक्या अशक्य मिळणें काव्यांत चित्रांत तो;
स्वर्भूसंग असा तयांत इतुक्या अल्पावकाशीं नसे
कोणीं दाखविला अजून, सुभगे! जो साधिला तूं असे. ५

आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व तें उज्ज्वल,
तैसें स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल
पावित्र्याप्रत गोष्पदें तुळसही शोभेस हीं सारसें,
पुष्पें प्रीतिस, चक्र हें सुचवितें द्वारीं हरी या असे! ६
तत्त्वें मंगल सर्वही विहरती स्वर्गीं तुझ्या या, अये
आर्ये! तूं उपचारिकाच गमसी देवी तयांची स्वयें;
नातें, स्नेह निदान ओळख जरी येथें मला आणिती,
होतों मी तर पाद सेवुनि तुझे रम्य स्थळीं या कृती! ७
चित्तीं कल्मष ज्याचिसा वसतसे ऐशा जनालागुनी
या चिन्हांतुनि हा निषेध निघतो आहे गमे मन्मनीं :–
"जा मार्गें अपुल्या, न दृष्टि कर या द्वाराकडे वांकडी,
पापेच्छूवरि हे सुदर्शन पहा आणील कीं सांकडीं!" ८
"आहे निर्मल काय अन्तर तुझें? मांगल्य कीं जाणसी?
लोभक्षोभजये उदात्त हृदयीं व्हायास का इच्छिसी?
ये येथें तर, या शुभाकृति मनीं घे साच अभ्यासुनी" –
आर्ये! स्वागत हें निघे सरल या त्वद्रेखनापासुनी. ९
साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे;
नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा अंधळे!
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणे,
कोठें स्वर्गसमक्षता प्रगटते हें नेहमीं पाहणें! १०

## "तिनें जातां चुम्बिलें असे यातें!"

(ली हंट्च्या "Jenny kiss'd me", या चुटक्याच्या आधारें.)

"असे कान्ता रोगार्त—या घराला"
असा विद्युत्सन्देश मला आला;
चित्त चिन्ताकुल होउनी, त्वरेनें
घरीं गेलों मी ग्रस्त संशयानें. १

मला बघतां, विसरुनी व्यथा गेली,
शेज सोडुनि ती त्वरित पुढें झाली,
मला आलिंगुनि चुम्बिलें तियेनें,
आणि पडली मृत हाय पळार्धानें! २

मधुर-हरण-व्रत काळ जो तयानें
अहह! नेली सुन्दरी प्रिया! तेणें
शक्ति गेली, मम मति भ्रान्त झाली,
टिके मग कां सम्पत्ति? तीहि गेली! ३

हीन म्हण तूं मज दीन तसा, काळा,
आणि म्हण कीं ग्रासला हा जिवाला;
तरी म्हटलें पाहिजे हें हि तूतें—
"तिनें जातां चुम्बिलें असे यातें!" ४

---

ता० २८।१२।८६.

## स्फुट विचार

— — —

विश्वाचा विस्तार केवढा?—
ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा.

— — —

सृष्टिकेन्द्र तो कवण्या ठायीं?—
ज्याच्या त्याच्या आहे हृदयीं.

— — —

स्वीकरणीय जनीं करिते जे
दातव्या, ती कला जाणिजे.

— — —

काय निराशा असे बरें?—
बुजगबाहुलें जगांतलें;
मूर्ख भिउनियां त्या गेले,
सुज्ञ बघे तद्रूप खरें.

— — —

स्वयें भयापासुनि पळणें,
भयसमयीं साहस करिती
त्यां अपजय येतां हंसणें;—
हें विकृत असे या जगतीं
शहाणपण या नांवानें!

— — —

## मूर्तिभंजन.

(अभंग)

मूर्ति फोडा, धावा! धावा, फोडा मूर्ति!
आंतील सम्पत्ति फस्त करा! ॥ १
व्यर्थ पूजाद्रव्यें त्यांस वाहूनीयां
नाकें घाँसूनीयां काय लभ्य? ॥ २
डोंगरींचे आम्ही झाड आड दांड,
आम्हाला ते चाड सम्पत्तीची! ॥ ३
कोंडे घालूनीयां बसली कैदाशीण,
उकलिल्यावीण खाईल ती! ॥ ४
तिच्या खळीमध्यें नाहीं आम्हा जाणें,
म्हणूनि करणें खटाटोप. ॥ ५
मूर्ति फोडूनीयां देऊं जोडूनीयां
परी विकूनीयां टाकूं न त्या. ॥ ६
विकूनि टाकीती तेचिं हरामखोर
तेचि खरे चोर — आम्ही नव्हों! ॥ ७

रुष्ट सुन्दरीस

नादीं लावुनि वेडा केलें ज्याला तूं सुन्दरी,
रुष्ट कशी होऊन बैससी आतां त्याच्यावरी ? ॥ ध्रु० ॥

सकल दैवतें तुच्छ करुनि मी तव भजनीं लागलों,
व्यर्थ का आजवरी भागलों ?
तुझ्या कृपेचा प्रसाद व्हावा म्हणुनी झटलों किती,
असे का त्याला कांहीं मिती ?
कधीं मला तूं उत्तेजनही दिलें,—
स्मरत नसे का स्मित मजला दाविलें ?
अर्थपूर्ण वीक्षणेंहि केव्हां श्रम मम केले दुरी ;
लहर कां आतां फिरली परी ? १

कितीक माल्यें श्रमसाकल्यें गुम्फुनियां तीं भलीं
तुला गे सन्तत मीं वाहिलीं !
आभरणेंही असाधारणें दिधलीं तुजकारणें
फिराया हासाचें पारणें !
परि दुर्भग मम कसें उभें राहिलें ?
काय तयानें न्यून बरें पाहिलें ?
तेणें करुनी रोष असा तव उद्भवला अन्तरीं,
मम मना चिन्तावश जो करी ! २

हाय हाय ! हें विफल जिणें तव सहवासावांचुनी !
निघूं कीं निवटूं मनुजांतुनी ?
प्रीतिविषय तो जरि का परका प्राण्याला जाहला,
तयाचा जन्महेतु खुंटला !
विषण्ण तो मग विषवृक्षांचीं फलें
सुधारसाचीं मानुनि गिळिलचि बळें !
दोष तयाचा काय त्यामधें ? — वद मधुरे सत्वरी ! —
करूं ना मीहि अतां त्यापरी ? ३

तुजवरी

मागच्या बाजूस चौथे कडवे लिहिले आहे.

तुजवरि पद्यें हे अनवधे! कितीतरी गाइलीं;
भक्तिविण कोणीं तीं प्रेरिलीं?
तुजला वाहुनि असे घेतलें, म्हणुनि तिदानीं असें
निरवालस तुजला मी पुसतसें —
निष्ठा माझी काय लाविसी कसा?
की मज पिळिसी रुचि-चढवाया रसा?
किंवा तुझिया कृपेस नाहीं पात्रच मी लवभरी?
सोक्ष कीं मोक्ष बोल लौकरी! ४

---

जुलै १८९७ इ.

# काव्य कोणाचें?

"कवे! कोणीं हें काव्य लिहीयेलें?"
"मींच" कवितें प्रतिवचन बोलिजेलें;
"बरें तर! हें वाचून अतां पाहूं,
श्लोक सुन्दर यातील सदा गाऊं." १

मनीं वाचक तों दंग फार झाला,
क्लृप्ति आढळली सरस एक त्याला;
म्हणे कविला "ही रम्य फार आहे!"
वदे कवि "ती मम क्लृप्ति परी नोहे." २

पुढें हृदयंगम पंक्ति एक आली,
वाचकाची तल्लीन वृत्ति झाली;
कवीला तो "शाबास!" म्हणे, त्यातें
कवी बोले "मम पंक्ति कीं नव्हे ते" ३

पुढें वर्णन पाहून रेखलेले,
वाचकाचें रममाण चित्त झालें;
कविस शंसी तो "धन्य!" अशा बोलें,
त्यास "वर्णन मम न तें" कवी बोले. ४

"काव्य लिहिलें हें सत्य तूं असून,
'नव्हे माझें हें - नव्हे तें' म्हणून
सांगसी तर परकीय कल्पनांतें
तुवां घेउनि योजिलें, गमे मातें." ५

"नव्हे ऐसेंही!" कवी वदे त्यातें,
"काव्य लिहिलें मीं खरें, परी मातें
शारदेनें जो मंत्र दिला कानीं,
तसें लिहिलें मीं; — काव्य तिचें मानीं! ६

"दिव्य शक्तीनें स्फुरे गंध पुष्पीं,
रंग खुलतीही तिनें इन्द्रचापीं;
सृष्टिमाजी जें रम्य असे कांहीं
तीच कारण त्या शक्ति असे पाहीं!" ७

---

भडगांव, ता० ७।८।०७.

---

## सुन्दरी दर्शन.

हें सौन्दर्य तुझें बघून सुभगे! आनन्द होतो मला,
आलेख्यीं लिहिण्या मला गवसला उत्कृष्ट हा मासला;
प्रीतिप्रेरक जो जगीं रस असे शृंगार नामें, रमे,
त्यानें ही भरली लता तनु तुझी माधुर्ययुक्ता गमे! १

वर्णाया कवनीं मला गवसला उत्कृष्ट हा मासला,
बुद्धीनें असल्या जरी तुजवरी मी लाविलें दृष्टिला,
आकांक्षा हृदयांतल्या निकट या आतां पहा धावती—
स्वप्नामादिक सर्वही समजुनी त्या घ्यावया पाहती! २

# फार दिवसांनीं भेट.

(चाल — "इस तन धनकी कौन बढाई")

बहुतां दिवशीं भेट जाहली,
प्रणयसिंधुला भरती आली! ॥ध्रु०॥

आलिंगन दृढ देतां आला
उभयीं हृदयीं त्वरित उमाळा,
नावरून तो रमणीनयनीं
बाष्पें आलीं ऊन होउनी;
गळित शीर्ष निज पतिच्या हृदयीं
ठेवुनि रडली ती त्या समयीं;
तोहि उसासे टाकित, तिजला
चुम्बित, गाळूं टिप लागला;
उभयाश्रुजलें मिसळुनि गेलीं!
बहुतां दिवशीं भेट जाहली! ॥१॥

वियोगसमयीं ~~परस्परांचे~~ झालें त्यांचें
म्लान रूप ~~झालेलें त्यांचे~~ तें परस्परांचे
ध्यानीं येतां, प्रेमग्रंथि
त्यांची झाली अधिकचि दृढ ती;
काळें आणिक कष्टदशेनें
क्षीण व्हाला होतें जाणें
सगळ्यांचेंही, परी प्रीतिचा
जोम वाढतो उलटा साचा! —
कुरवाळित अन्योन्यां ठेली!
बहुतां दिवशीं भेट जाहली! ॥२॥

कितीक वेळपर्यंत तयांना
कांहीं केल्याही वदवेना ;
'प्रिये लाडके!'—'जिवलग नाथा!'
हे रव वदली मग उत्सुकता ;
फुटकळ वाक्यें मग दोघांहीं
परस्परां जीं म्हटलीं कांहीं,
भाव त्यांतला कीं — न च व्हावा
वियोग फिरुनी, किंवा यावा
मृत्युच दोघां त्याच सुवेळीं,
~~बहुतां दिवसीं~~ भेट जाहली! ॥३॥
जेथीं बहु दिनीं

---

ता. २६-१-९८ .

कविच्या हृदयीं जसे गुंगती---

कविच्या हृदयीं जसे गुंगती कवितेचे मधु बोल,
किंवा गायकमतींत झुकती ताना त्या सुविलोल,
तसे माझिया अन्तर्यामीं तुझिया सौन्दर्याचे
विकास हसती सखे निरंतर, हृदयंगम जे साचे !

अलिच्या गुंजारावीं जैशी मधुलोलुपता खेळे,
वसन्ताशी आसक्ति ज्यापरी कोकिलगानीं डोले,
मदीय चित्तव्यापारीं तूं तशीच मधुरे बोले
खेळत असशी; तेणें आहे आमिष मन्मन झालें ! २

\+ \+ \+ \+

## नवा शिपाई.

नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें,
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें!
ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा,
तेच ~~[illegible]~~ पतित की जे आंखडिती प्रदेश साकल्याचा!
खादाडउ असे माझी भूक,
चतकोरानें ~~[illegible]~~ मला न सूख;
कूपांतिल मी नच मंडूक;
मळ्यास माझ्या कुंपण ~~[illegible]~~ पडणें अगदीं न मला साहे!
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें! १

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्यां घरच्या मजला दिसताहेत;
कोठेंही जा— पायांखालीं तृणावृता भू दिसते,
कोठेंही जा—डोईवरतें दिसतें नीलांबर तें;
सांवळीत गोजिरीं मुलें,
उन्हांत दिसती गोड फुलें;
बघतां मन हर्षून डुलें;
तीं माझीं, मी त्यांचा,— एकच ओघ अम्हांतुनि वाहे!
नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें! २

प्राजितसें मी कवणाला?–तर
~~[illegible]~~ मी पूजीं अपत्याला,
आपल्यामधें विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला;
'मी' हा शब्दच मजला न लगे; संपुष्टीं हे लोक
आणुनि तो, निज शिरीं ओढिती अनर्थ भलते, देख!

लहान – मोठें मज न कळे,
साधु – अधम हें द्वयहि गळे,
दूर – जवळ हा भाव पळे;

सर्वच मोठें – साधु – जवळ, त्यॉं सकलीं मी भरुनी राहें!
कोण मला वळणीला आणूं शकतो तें मी पाहें! ३

हलवा करितां तिळावर जसे कण-चढती पाकाचे,
अहंस्फूर्तिच्या केन्द्राभवतें वेष्टन तेंवि जडाचें;
आंत समचि निर्गुण तिलक, वरी सदृश सगुण तो पाक,
परि अन्यां बोंचाया धरितो कांटे कीं प्रत्येक!

अशी स्थिती ही असे जनीं!
कलह कसा जाइल मिटुनी?–
चिन्ता वागे हीच मनीं.

~~अज्ञ जनांचा हा हलवा,~~
~~[illegible] कलह-[illegible]?~~
~~[illegible] भेद ते दुरी [illegible]~~

शान्तीचें साम्राज्य स्थापूनि ~~[illegible]~~ बघत काळ जो आहे,
प्रेषित त्यॉंचा नव्या दमाचा शूर शिपाई आहें! ४

---

ता० ८।३।५८

## वियोगामुळें.

कोणी साम्प्रत लक्ष्य लावुनी जरा पाहील माझेकडे,
ध्यानाची निरखील पाठ तर तो निस्तेज माझ्या मुखीं;
देव्हाऱ्यांत मनाचिया बसुनियां आहेस जी तूं सखी,
त्या तूझ्यावरि तें जडून हसलें या बाह्य शून्या गडे.
नक्षत्रें, सुमनें, सुवर्णनिधिही, मोत्यें, हिऱ्यांचे खडे,
सन्ध्या आणि उषा, तसे रविशशी, विद्युल्लताही निकी,
ऐसे दिव्य पदार्थ जोडुनि तुझ्या रूपास मी पारखीं;
सारेही दिसती फिके!— तुजहुनी मातें सुधा नावडे!
माझ्या गे स्मरणीं तुझे गुण, मुखीं तीं इक्षुखण्डें जशीं,
होती नीरस तीं परी गुण तुझे गोडीस देती सदा,
ज्या मत्कूक्षि तुझ्याविशीं, चघळितों त्या स्वांघ्रि जैशीं मुलें;
तेणें रक्त मदीय आटत असे, निद्रा न येई मशीं,
उत्कण्ठा हृदयीं–मनोज्ञ तव ती पाहीन मूर्ती कदा?
वेडा पीरच जाहलों जिवलगे आहें वियोगामुळें!

# पद्यपंक्ति.

\+ + + +

आम्ही नव्हतों अमुचे बाप,
उगाच कां मग पश्चात्ताप?
आसवें न आणूं नयनीं,
मरून जाऊं एक दिनीं!

अमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनी प्यायाचा;
पितां बुडाशीं गाळ दिसे,
त्या अनुभव हें नांव असे!
फेकुनि द्या तो जगावरी,
अमृत होउ तो कुणातरी!

जें शिकलों शाळेमाजी,
अध्याहृत ही टीप तया :—
"द्वितीय पुरुषीं हें योजीं,
प्रथम पुरुष तो सोडुनियां!"

\+ + + +

## तहान आणि भूक आरम्भीं नव्हती

(अभंग)

तहान आणि भूक आरम्भीं नव्हती,
अन्न मुखें होतीं एक्या ठायीं;
कामाचा विषय नव्हता तो दूरी,
होतीं नरनारी एक्या देहीं;
तेधवां नव्हते हात आणि पाय,
करायाचें काय त्यांहीं होतें?
स्वर्ग आणि पृथ्वी जुळूनियां होतीं,
नव्हतीच खंती तेणेंयोगें.

---

एकशेसात कवितेच्या मागे हा अभंग लिहिला आहे.

# विद्याप्रशस्ति.

असुनि जीभही, ज्याचियाविना
मौन लागतें घ्यावया जनां,
काय तें बरें? बोलिजे खरें.—
ज्ञान तें बरें! ज्ञान तें बरें! १

सम्पदा फिकी जीपुढें पडे,
शक्तिचें जिच्यावांचुनी नडे,
कोण ती बरें? सांगिजे खरें.—
शारदा बरें! शारदा बरें! २

दुःखहेतु ते दूर घालवी,
वसुमतीस जी स्वर्ग भेटवी,
भगवती अशी सांग कोणती?—
ती सरस्वती! ती सरस्वती! ३

दुसऱ्या प्रतीत फरक नाही.

# निशाणाची प्रशंसा.

तुज जरि करिती काठीला
लावुनियां पटखंड,
तरि तुजमध्यें वसत असे
सामर्थ्य बा उदंड ! १
कोण नेतसे समराला
सांग बरें रणधीर
माराया कीं मरावया
कृतनिश्चय ते वीर ? २
शूरशिराःवरि धीटपणें
युद्धाच्या गर्दीत
कोण नाचतें फडकत रे
स्फुरण त्यांस आणीत ? ३
तारूं पसरुनि अवजारें
भेदित सिंधू जाय,
ताच्छिखरीं तत्साहस तूं
मूर्त न दिसशी काय ? ४
उंच उंच देवायतनें,
भव्य राजवाडे,
तुंग दुर्गही शिरीं तुला
धरिताती कोडें ! ५

भक्ति जिथें, दिव्यत्व जिथें,
जेथें उत्सव फार,
तेथें तेथें दिसे तुझा
प्रोत्साहक आकार! ६

वीर्य जिथें, ऐश्वर्य जिथें,
जेथें जयजयकार,
उंचावर तेथें तेथें
दिसे तुझा आकार! ७

म्हणून मानवचित्ताची
उंचावर जी धाव,
तीचें चिन्हच तूं तुजला
निशाण[1] सार्थचि नांव. ८

मिळमिळीत ज्याची कविता
न असे रंडागीत,
खचित जडेलचि त्या कविची
तुझ्यावरी रे प्रीत! ९

संसारा मी समर गणीं;
उचलुनि म्हणुनि निशाण,
साद घालितों — "योद्धे हो!
झटुनि भिडुनि द्या प्राण!" १०

---

[1] निशाण म्हणजे चिन्हच.

## कवितेचें प्रयोजन.

"शान्तीचें घर सोडुनी प्रखर त्या हातीं प्रयत्नाचिया,
प्रीतीचाहि निकुंज सोडुनि रणीं जीवित्व नांवाचिया,
सर्वांहीं सरसावणें झटुनियां हें प्राप्त झालें असे;
या वेळे न कळे कवे! तुज सुचे गाणें अहा रे कसें! १

माता ही सुजला स्वभूमि सुफला, तीच्या परी लेंकरां
खायाला पुरतें पहा नच. मिळे कीं हाल आहे पुरा;
झांकायास तनूस वस्त्रहि न तें आतां पुरेसें मिळे;
या वेळेस कसें कवे! तुज सुचे गाणें न मातें कळे!" २

हें कोणीं म्हणतां जनें कविमनीं खेदोर्मि हेलावल्या,
नेत्रांतून सवेंचि बाष्पसरिता वाहावया लागल्या;
त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा, परी
धीरोदात्त असेचि तो श्रुत असे हें दूरही भूवरी! ३

सोन्याचे सरले अहा! दिवस ते, आली निशा ही कशी!!
सौख्याचा नद तो सुकून पडलों या दुःखपंकीं फशीं!
कालक्रीडित हें बघून रडला, हें व्यस्त कांहीं नसे;
प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवींचा असे. ४

बाष्पान्तीं तरल स्वरें मग कवी निश्वासुनी बोलिला—
"जो पूर्वीं गुण पुण्यभूमिवरि या अत्यन्त वाखाणिला,
तें हें दिव्य कवित्व दुर्विधिवशें हीनत्व कीं पावलें,
त्याची बूज करावया न अगदीं कोणी कसें राहिलें! ५

"गाणें जें परिसावया कविपुढें राजेशही वांकले,
यन्नादेंच लहानथोर सगळे गुंगून वेडावले,
त्याला मान नसे, नसो; पण, अतां त्याची अपेक्षा नसे,
हें कोणी म्हणतां विषाद अहिसा मन्मानसाला डसे! ६

"आलेल्या दुरवास्थितींतुनि तुम्ही उत्तीर्ण व्हाया जर ← री
उद्योगीं रत व्हावया धरितसां औत्सुक्य चित्तीं, तर ← री
गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल,
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुँढल्या साक्षी कवी होइल! ७

"हातीं घेउनियां निशाण कवि तो पाचारितो बान्धवां—
'या हो या झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा!' ← सरस हो
प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करी
आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी? ८

"आशा, प्रेम, तसेंच वीर्य कवनीं तो आपल्या गाइल,
गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल;
द्या उत्तेजन हो कवीस, न करा गाणें तयाचें मुकें;
गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें. ९

"आतां जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी,
याची खूणच गान जें निघतसे तें साच जाणा मनीं;
तारा ताणिलियावरी पिळुनियां खुंट्यांस वाद्याचिया,
त्यांच्यांतून अहा! ध्वनी उमटती जे गोड ऐकावया!" १०

---

समासात दाखविल्याप्रमाणे पेन्सिलीच्या सुधारणा.

## सतारीचे बोल.

काळोखाची रजनी होती,
हृदयीं भरल्या होत्या खंती;
अंधारांतचि गढले सारें
लक्ष्य न लक्षी वरचे तारे;
विमनस्कपणें स्वपदें उचलित
रस्त्यांतुनि मी होतों हिंडत;
एका खिडकींतुनि सूर तदा
पडले — दिड दा, दिड दा, दिड दा! १

जड हृदयीं जग जड हें याचा
प्रत्यय होता प्रगटत साचा;
जड तें खोटें हें मात्र कसें
तें न कळे — मज जडलेंच पिसें;
काय करावें, कोठें जावें,
नुमजे मजला कीं विष खावें!
मग मज कैसे रुचतील तदा
ध्वनि ते — दिड दा, दिड दा, दिड दा? २

ऐकुनि ते मज जो त्वेष चढे,
त्यासरशीं त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मी हात हिसकिला,
पुटपुटलोंही अपशब्दांला;
म्हटलें — "आटप, आटप, मूर्खा!
सतार फोडुनि टाकसी न कां!
पिरपिर कसली खुशालचंद्रा
करिसी — दिड दा, दिड दा, दिड दा!" ४

सोंसाट्याचें वादळ येतें
तरि तें तेव्हां मज मानवतें;
भुतें भोंवतीं जरि आरडतीं
तरि तीं खचितचि मज आवडतीं;
कारण आंतिल विषण्ण वृत्ती
बाह्य भैरवीं धरिते प्रीती;
सहज कसे तिज करणार फिदा
रव ते — दिड दा, दिड दा, दिड दा? ३

सरलों पुढता चार पावलें;
तों मज न कळे काय जाहलें, —
रुष्ट जरी मी सतारीवरी
गति मम वळली तरि माघारी;
ध्वनिजालीं त्या जणूं गुंतलों
असा स्ववशता विसरुनि बसलों
एका ओट्यावरी स्थिर तदा
ऐकत — दिंड दा, दिड दा, दिड दा! ५

तेथ कोंपरें अंकीं टेंकुनि
करांजलींत मस्तक देउनि
बसलों; इतुक्यामाजी करुणा-
रसपूर्ण गती माझ्या श्रवणां
आकर्षुनि घे; हृदय निवालें
तन्मय झालें, द्रवलें; आलें
लोचनांतुनी तोय कितिकदा
ऐकत असतां दिड दा, दिड दा! ६

स्कन्धीं माझ्या हात ठेवुनी
आश्वासी मज गमलें कोणी,
म्हणे — "खेद कां इतुका करिसी?
जिवास कां बा असा त्राससी?
धीर धरीं रे! धरित्री पोटीं    धैर्या-
असती मोठीं फळें गोमटीं!
ऐक, मनींच्या हरितील गदा
ध्वनि हे — दिड् दा, दिड् दा, दिड् दा!"    ७

आशाप्रेरक निघूं लागले
सूर, तधीं मीं डोळे पुशिले;
वरती मग मी नजर फिरविली,
नक्षत्रें तों अगणित दिसलीं;
अस्तित्वाची त्यांच्या नव्हती
हा वेळवरी दाद्च मज ती!
"तम अल्प — द्युति बहु" या शब्दां
वदती रव ते — दिड् दा, दिड् दा!    ८

Juddere hāvesīhi arvise.

वाद्यांतुनि त्या निघती नंतर
उदात्ततेचे पोषक सुस्वर;
तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजी;
दिक्कालांसहि अतीत झालों;
उगमीं विलयीं अनन्त उरलों;
विसरुनि गेलों अखिलां भेदां
ऐकत असतां दिड् दा, दिड् दा!    ९

प्रेमरसाचे गोड बोल ते
वाद्य लागतां बोलायातें,
भुललों देखुनि सकलहि सुन्दर;
सुरांगना तों नाचति भूवर;
स्वर्ग धरेला चुम्बायाला
खालीं लवला, मजला गमला!
अशा वितरिती अत्यानन्दा
ध्वनि ते – दिड दा, दिड दा, दिड दा! १०

शान्त वाजली गती शेवटीं;
शान्त धरित्री शान्त निशीथीं, ती
शान्तच वारे, शान्तच तारे,
शान्तच हृदयीं झालें सारें!
असा सुखें मी सदना आलों,
शान्तींत अहा! झोंपीं गेलों;
बोल बोललों तरी कितिकदा
स्वप्नीं दिड दा, दिड दा, दिड दा! ११

---

(m 20/3/1900

## "कोणीकडून?—कोणीकडे?"

कोणीकडून?—कोणीकडे?
इकडुनि तिकडे, म्हणती गडे;
येथुनि तेथें, मागुनि पुढें,
हें तर नित्यच कानीं पडे;
पण समाधान का कधीं तयानें घडे!
जिवलगे! १

कोणीकडे ग?—कोणीकडून?
तिमिरामधेंच तिमिरामधून;
घडीभर पडे मधेंच ऊन,
अभ्रीं तेंही जातें उडून;
हृदय हें उले त्यामुळें निराशा जडून!
जिवलगे! २

भोगांचीं अवशिष्टें तुसें
घशांत खुपती, लागे पिसें;
मागें पुढें न कांहीं दिसे;
संशयडोहीं नौका फसे;
मग वदे—हरे राम! रे, करावें कसें?
जिवलगे! ३

गोत्यांत अशा आलों कुठून?
कोठें जाइन कैसा सुटून?—
असें विचारी जेव्हां झटून,
भ्रम-बुद्बुद जातो फुटून;
मग अहा! विभिन्नच दिसे दृष्टि पालटून!
जिवलगे! ४

शून्य म्हणूं जें मागें पुढें,
त्यांतुनि दीप्ती दृष्टी पडे,
मधला उजेड तिमिरीं दडे;
निजधामाहुनि आलों, गडे,
तर, ऋणें फेड, चल सुखें स्वधामाकडे!
जिवलगे! ५

भडगाव, ता० १७-१०-१९००

# म्हातारी

घेउनि हृदयाशी सुतेला, स्थित मी दाराशीं;
म्हातारी आली तरंगत, मुलगीला दिसली;
हात पुढें केले धराया तिला तिनें अपुले;
तिच्या शिरावरुनी तधीं ती गिरक्या घे उडुनी;
हसत वरी करुनी हात, ती धरूं झटे फिरुनी;
त्या चलनें वरती उडाली म्हातारी परती;
खिदळत तें बघतां उडाया पाही मम दुहिता!
दडपण संसृतिचें निघालें मम चित्तावरचें;
मन्मनही लागे तरंगूं म्हातारीसंगें!
वारा तों तिजला लागला दूरच न्यायाला.
चुम्बुनि वत्सेला,
वदें मी मग म्हातारीला :—
"थांब, थांब! जाशी अशी कां? फिर ये गे मजशीं.
वयस्कता माझी म्हणुनि जर करिसी इतराजी,
तर माझी सोनी पाहुनी, ये गे परतोनी!
तुजला पाहूं दे तियेला, खिदळत राहूं दे!
मज वय विसरूं दे, मुग्ध-मधु-बाल्यीं उतरूं दे!
ते दिन पुष्पांचे, कोवळ्या किरणीं खेळाचे!
हे दिन — हाय! —
हे दिन चिन्तांचे परन्तू लटिकें हसण्याचे!
हे दिन ..... जाऊं दे!
मला तुज गाणें गाऊं दे!

"म्हणती

"म्हणती म्हातारी तुज, कधीं होतिस तरुण परी?
तवजनि मृति न दिसे, अजामर रूप तुझें भासे.
कोठुनि तूं येशी, न वदवे, कोठें तूं जाशी;
~~स्वैरपणें भ्रमसी, यदृच्छा मूर्तच तूं गमसी~~
स्वैरपणें भ्रमसी,
यदृच्छा मूर्तच तूं गमसी!
"येशी तूं का ग यक्षिणीकुंजांतुनि?—सांगें.
कैशा वागुनियां मिळविती अक्षय यौवन त्या?
झिजवित नित्य जिणें तयांला पडतें का मरणें?
वद त्यांची रीती
घ्यावया आम्ही लागूं ती.
"वा गन्धर्वांचें विमानच सूक्ष्मरूप साचें
वद असशी का तूं तरंगत वातावरणांतून?
सूक्ष्म देह धरुनी असति का तुजवरि ते बसुनी?
दिव्य असें गाणें गात ते असतिल सौख्यानें;
तें मज पाप्याला कशाचें ये ऐकायाला!
परि मम वत्सेतें गमे तें परिसाया मिळतें;
म्हणुनिच उल्हासें
अशी ही वेडावुनि हासे!
"अज्ञातामधला मूर्त तूं गमसी ध्वनि मजला;
अर्थ तुझा कोण मला तो देइल सांगोन?
कळेल जर मज तो, तर जगीं भरला जो दिसतो,
मी तो अंधार
लोपवूं झटेन साचार!

" रवपुष्प

"खपुष्प तूं असशी काय गे?—सांगुनि दे मजसी.
तुझे रंग: वास न कळती मर्त्य मानवास;
जर ते कळतील तर इथें स्वर्गच होईल!
मग *तुज धरण्यातें
मुलांपरि मोठे झटतिल ते!

"स्वरूप सत्य तुझें मुळींही तें मजला नुमजे;
तरी तुझ्या ठायीं वसतसे अद्भुत तें कांहीं;
प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें;
तेथें स्वच्छन्दें विचरतां मोद मनीं कोंदे;
मग गणमात्रांतें
जोडणें केशवपुत्रातें."

ता० २५-१-१९०१.

## आम्ही कोण?

आम्ही कोण म्हणून काय पुससी?— आम्ही असूं लाडके
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके!
सारेही बडिवार येथिल पहा! आम्हांपुढें ते फिके;
+ स्पर्शावांचुनि आमुच्या न शकतें कांहीं जगीं ध्यावया
सौन्दर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;
फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें तथ्य आम्ही निकें! सत्त्व
शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणीं सुरांच्या बरें?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते?
ते आम्हीच, सुधा कृतींमधुनियां ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें!
आम्हांला वगळा — गतप्रभ झणीं होतील तारांगणें,
आम्हांला वगळा — विकेल कवडीमोलावरी हें जिणें!

---

फैजपुर, ता० २९-११-१९०१.

+ पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती ध्यावया

नक्कल या बरहुकूम दुरुस्त करून लिहिली आहे; हस्ताक्षर वेगळे आहे.

—•१३•—

# घुबड.

(एडगर् पो याच्या 'रेव्हन्' या अप्रतिम काव्याची मुख्य कल्पना या चुटक्याच्या आधारास घेतलेली आहे.)

श्यामा राणी गभीर रजनी,
अलंकृता जी नक्षत्रगणीं,
वेत्र आपुलें उंच धरोनी
बसुनी राज्यासनीं, दरारा दावित आहे जों फार,
समोरच्या चिंचेवरुनी तों
घुबड तियेचा बन्दीजन तो
घूघू घूघू महिमा तीचा वर्णी करुनी घूत्कार! १

कवी आपुल्या खिडकीमधुनी
बाहेर बघे शून्यलोचनीं—
स्तब्धत्व जनीं, स्तब्धत्व वनीं,
मनींहि दयितानिधनें वागे स्तब्ध निराशा अनिवार!
अवघड झालें एकलेपणें;
परि त्या तरुवरुनी घुबडानें
"ऊंहूं— मी तुज सोबत!" म्हटलें घूघू करुनी घूत्कार! २

नक्कल वरीलप्रमाणे, पण दुसऱ्या हस्ताक्षरात आहे.

"खाशी सोबत!" कवी म्हणाला;
"माझ्या विरहव्यथित मनाला
वाटे मनुजांचा कंटाळा;
दुःख करित बैसणें आवडे जेथें राहे अंधार!
हा मित्र मला भला मिळाला
धीर मदीय मना द्यायाला!"
"ऊंहूं! ऊंहूं!" उत्तर दिधलें त्यानें करुनी घूत्कार! ३

"नाहीं?— धीर न देशील काय
शोकें मी मोकलितां धाय?
ओढवलें कीं अदृष्ट हाय!
गुणरूपवती प्रिया निमाली!— झालें सारें निस्सार!
विलाप ऐसे ऐकुनि माझे,
द्रवेल काय न बा हृदय तुझें?"
"ऊंहूं! घूघू!" उत्तर बोले त्याचा भेसुर घूत्कार! ४

"हे अप्रतिमे! प्रिये, प्रियतमे!
तुजवीण जिणें निर्माल्य गमे!
अहह! वेढिलें असे मज तमें!
मरून तर मी, जेथ वसे ती दिवंगता दिव्याकार,
तेथ पूजिली सुरांगनांनीं
पाहिन काय न सखी स्वनयनीं?"
"ऊंहूं ऊंहूं!" बोले निष्ठुर त्या घुबडाचा घूत्कार! ५

"बरें बरें! मी नरकीं जाइन,
घोर यातना तेथिल सोशिन,
खेद न त्यांचा अगदीं मानिन
जर त्या स्थानीं वागेल मनीं कान्तेचा पुण्याकार;
तेथ तियेचें ध्याया दुरुनि
स्मृति मम समर्थ होइल काय न?"
"ऊंहूं! घूघू!" बोले निर्घृण त्या दगडाचा घूत्कार! ६

"जा! निघ येथुनि!—मला रडूं दे,
शोकें माझें हृदय कढूं दे!
कानीं परि तव रव न पडूं दे
जो मम खिन्न मनावरि लादी निर्विण्णपणाचा भार!
डाग न देई मम "दुःखावर",
काळें कर तूं येथुनि सत्वर!"
"घूघू—ऊंहूं!" दे प्रत्युत्तर त्या अधमाचा घूत्कार! ७

निशीथसमयीं या अन्धारीं
वेताळाची मिरवे स्वारी,
पाजळूनियां टेंभे सारीं
भुतें नाचती भयानकपणें!—चित्तीं उपजविती घोर!
नैराश्यें मज पुरें घेरिलें,
खिडकीपुढुनी घुबड न हाले,
घूघू घूघू चाले त्याचा घूघू भीषण घूत्कार! ८

---

फैजपुर,
ता० १२-१२-१९०१.

दुसऱ्या प्रतीत फरक नाही. त्यात शेवटी 'केशवसुत' अशी नोंद आहे.

## ~~[illegible]~~ वियुक्ताचा उद्गार.

राहे नित्य वसुंधरेस धरुनी हा भाग्यशाली गिरी;
वेलीला लहरीकरीं निरवधी हा अब्धि आलिंगितो;
रेषेला क्षितिजाचिया बिलगुनी आकाश तो नांदतो;
तैसा तो ध्रुव उत्तरेस न कधीं सोडून जाई दुरी;
चित्रोल्लास चिर प्रकाश सुभगच्छायासखीशीं करी;
~~पोटाशीं धरुनी सदा सुरधुनी स्वर्लोक हा राहतो,~~
पोटाशीं धरुनी सदा सुरधुनी स्वर्लोक हा राहतो;
घेऊनी द्युतिदेवतेस तरणी संगें तसा चालतो;
प्रेमें पूरुष सन्तत प्रकृतिला आश्लेषुनी तो धरी!—
हीं युग्में बघतां सुखी, मम मनीं प्राणप्रिये कालवे;
त्यांचा मत्सर उद्भवून हृदयीं, होतें नकोसें जिणें!
तूतें सोडुनि दूर हाय! न मला आतां मुळीं राहवे;
कैसे तूं असशील गे दिवस हे कंठीत माझेविणें!
धिक्कारीं मज मीच, ज्यास तुजला कष्टांत या लोटवे!—
हीं युग्में बघतां, सखे! विरह हा दे दुःख मातें दुणें!

ता० १६-१२-१९०१.

तिसऱ्या फाटलेल्या प्रतीतील मजकूर पुढच्या पाठांतरीत कवितेप्रमाणे असून तारीख १६-१२-१९०१ अशी दिली आहे.

## वियुक्ताचा उद्गार

(पाठान्तर)

राहे नित्य वसुंधरेस धरुनी हा भाग्यशाली गिरी,
यालागीं दयिता वियोग न कधीं माझ्यापरी जाचितो;
वेल्हेला लहरीकरीं निरवधी हा अब्धि आलिंगितो,
कान्तेपासुनि मी परी विचरितों या दूर देशान्तरीं!
चित्तोल्हास चिर प्रकाश सुभगच्छाया सखीशीं करी;
त्यांचें संगम सौख्य पाहुनि मनीं मी फार वेडावतों;
पोटाशीं धरुनी सदा सुरधुनी आकाश हा नांदतो,
त्याचा मत्सर उग्र दंश करितो वेगें मदभ्यन्तरीं!
तेणें व्याकुल होऊनी झडकरी मी झांकितों लोचनें;
माया-ईश्वर, पूरुष-प्रकृतिही, वागर्थ, ऐशीं द्वयें
सम्यग्युक्त बघून आंत, उघडी त्रासून मी ईक्षणें,
तो नित्य द्युतिदेवतेसह रमे तो दृग्पथीं सूर्य ये!
त्या योगें विरहाग्नि फार भडके!- होतें नकोसें जिणें;
आतां हाय! न राहवे तुजविणें, कैसें करूं गे सये।

## स्मरण आणि उत्कण्ठा.

एकान्तीं असतां घरीं तुज सखे ‘हे सारिके!’ बाहिलें,
‘हे माझे शुकराज!’ हें म्हणुनि तूं मातें मिठी मारिली;
‘माझे जातिलते!’ म्हणून तुजला मी गाढ आलिंगिली,
तों ‘माझे सहकार!’ हें मधुर गे तूं नाम मातें दिलें;
‘माझे रम्य विहारपुष्करिणि गे!’ मीं तूज संबोधिलें,
‘~~मत्कैरवीकुल~~ माझे मानस हंस हो!’ सरस हें वाणी तुझी बोलिली;
‘क्रीडासिंधुमधील हे मम तरी!’ ही साद मीं घातिली,
‘~~हा कोरा तरे कर्णधार~~ माझे नाविक हो प्रवीण कर्णधार!’ ~~वदुनी~~ म्हणुनी मातें तुवां बुम्बिलें!
प्रीतीची सरिता उचंबळुनि त्या आसक्त संबोधनीं,
~~अद्दोघे रतीत परस्परां विकमुची~~ ओघा माजि तिच्या प्रिये उभयतां तैं पावलों मज्जन!
उत्कण्ठा हृदयांत तें स्मरुनियां संदीप्त ती होउनी,
रात्रीं या विरहें तुझ्या तळमळे हा मी अभागी जन!
घेई ध्यास तुझा म्हणून मज हे निद्रा गडे सोडुनी,
तेणें दुर्लभ गे तुझें अहह! तें स्वप्नांतही दर्शन!

ता० २९-१२-०१

## आईकरितां शोक.

अन्तरले पाय तुझे हाय हाय माते! ।ध्रु०।

मागें तव दर्शनि मजलागुनी जहालें,
तदनन्तर लोटुनियां दिवस फार गेले;
फिरुनि तुझ्या चरणांतें
उत्सुक मी बघण्यातें
असतां, अन्तींहि न ते
दिसले कीं—अहह! पूर येत लोचनांतें!
अन्तरले पाय तुझे हाय हाय माते! १

फिरुनि तुझें कोठें तें तीर्थरूप पाहूं!
पादरजीं लोळुनि तव धन्य केंवि होऊं!
जनकामागें जागृत
जननी गे तूं दैवत
उरलिस, तीही साम्प्रत
गेलिस सोडुनि आम्हां दीन बालकांतें!
अन्तरले पाय तुझे हाय हाय माते! २

कठिण जगीं या बघती छिद्र काक सारे,
करुणेचें कोठेंही नसे लेश वारें!
तुझ्यासवें क्षमा दया
प्रीतिहि गेली विलया!
मदंपराध घालुनियां
पोटीं, उरलें कोणी प्रेम करायातें!
अन्तरले पाय तुझे हाय हाय माते! ३

(आणखी एक पद्य
पाठीमागें

चौथे कडवे या कागदाच्या मागे लिहिले आहे.

कष्ट दिले तुजला मीं फार फार आई!
त्यांची मजकडुनि फेड जाहली न कांहीं!
दुर्भग मी असा असें,
म्हणुनि दुःख वाटतसे,
कंठ फार दाटतसे!
~~रडतों तर घालुनियां डोंपसंत माझें!~~
अन्तरले पाय तुझे हाय हाय माते! ४

रडतों गुडघ्यांत म्हणुनि घालुनी शिरांतें!

दूर कोठें एकला जाउनीयां

( दिंड्या )

दूर कोठें एकला जाउनीयां,
एकतारी आपली घेउनीयां,
स्वेच्छ होतों छेडीत ती, मनाला
दुःखिताला आराम द्यावयाला. १

आजवेरी दुःख कसलें?– बहु मनोभंग झाले,
बहुत आशांचे प्राण निघुनि गेले!
तयां शोचाया निर्जनांत जावें,
एकतारी छेडीत मीं बसावें! २

आज देखिल मी तसा अस्तमानीं
वाद्य वेडें वांकुडें वाजवूनी
दंग झालों स्वच्छन्द गायनानें;
खरें संगीतज्ञान कोण जाणे! ३

आत्म्याला हृदय हृदयाला जधीं खेळवीतें,
" हृदय हृदयाला जधीं आळवीतें;
तधीं तुमचें तें नको कलाज्ञान,
तधीं हृदयासम नसे तानसेन! ४

असो; असतां मन गायनांत लीन,
रात्र झाल्याचें भान राहिलें न;
जसें कलहंसा वाहतां प्रवाहीं
प्राप्तमरणाचें ज्ञान नसे कांहीं! ५

अहा! अद्भुत तों काय एक झालें—
'धन्य बन्धो!' हे शब्द वरुनि आले!
वरी बघतां, तारका उंच आहे,
सदय सस्मित मजकडे वरुनि पाहे! ६

"कवे! बन्धो!" ती वदे नभांतून—
"तुझीं गीतें परिसून मी प्रसन्न!
स्वसा आतांपासून समज मातें,
बन्धु माझा तूं—मंगल हें नातें!" ७

प्रसादें त्या वांकतां, काजव्याचें
स्फुरण खालीं बघुनि मी म्हणें—"याचें
साम्य कांहीं तरि असे तुझीं तारे!
माझिया तर जीवितीं तिमिर सारें!" ८

"नको ऐसें रे वदूं बन्धुराया!"
म्हणुनि लागे ती मला आश्वसाया—
"तुझ्या दिव्यत्वापुढें जग भिकारी!
कासया ही खिन्नता — दूर सारीं!" ९

अशा भगिनीचा लाभ मला झाला;
खेद गेला, आनन्द मनीं आला;
तीचा आभारी दुवा देत तीतें
समाधानी मी पातलों घरातें! १०

---

राजा शंतनू

श्री

जा स्वस्थळास हरिणा सुखें; पहा बाण घेतला मागें;
तुजमागें आलों, पण तव लिप्सा मन्मनीं न ती वागे. १
मृगयामिषें त्रिपथगा-तीरीं एकान्त साधुनी रानीं
विचरावें स्वैरपणें, या गोष्टीची असे मज शिराणी. २
तातें प्रतीपरायें कथिलें हितगूज जें मला, तेणें
भ्रम जडला हृदयाला, अन्य विषय तो मुळींहि मी नेणें. ३
भ्रमहेतु तूंच अससी गंगे! तव दर्शनें अहा भंगे
ताप जनांचा, मग मम होती संतप्त कोंवि हीं अंगें! ४
ममजनकदृक्षिणांकीं बैसुनि पूर्वीं तुवांच ना त्यातें
वचन दिलें 'तुमच्याशीं सुनेचिया जुळिन साच नात्यातें'? ५
तें देवि! स्मरसी कीं? पुसतों सुत मी प्रतीपराजाचा
भ्रमवुनि मज कोठवरी दुःसह देसी मदंतरा जाचा? ६
मी मानव म्हणुनी तव शंकित जरि चित्त होय सुरसरिते,
तरि नच वचनविलंघन करिं, मर्त्यांहि हीन जें करितें. ७
देवेन्द्रतुल्य राजे इन्दुकुलोत्तंस विश्वसन्माहित,
तद्वंशज मी असतां शंकित व्हावें तुवां न हें विहित. ८
कां मग

कां मग विलंब करिसी? गुंतवितें कोणतें तुला काम?
धाम न रुचे मज वनीं फिरवी तवपाणिपीडनीं काम! ९
ये, हो प्रकट लवकरी! पाहूं दे दिव्यमूर्ति तव, मग ती
ज्योतिवरी शलभाची होऊं दे तेंवि शीघ्र माम गती! १०
ये ये! धीर न धरवे, करवेना काज मज पहा कांहीं!
बाहीं तुज औत्सुक्यें; टाकीं नभ भरुनि त्या स्व हांकांहीं! ११
जाई नभ त्या भरून हांकांहीं

दुसऱ्या पानावरील कडवी ९ ते ११ वर एकत्र छापली आहेत.

## कांहीं स्वकृत वचनें.

१ इहलोकींची कल्पलता
ती तर उद्योगप्रियता.

२ उद्योगांत वेळ। ज्याचा नित्य जाई।
त्याला दैव होई। अनुकूळ ॥

३ उद्योगाची धरितां कास
होतो आपत्तींचा ऱ्हास.

४ हृदयाचा जो निर्धार
सिद्धीचा तो देणार.

५ स्वयत्नच लागतो करूं,
होय तयाचा तोच गुरू.

६ बोल लावितो दैवास,
त्यास म्हणावें कापुरुष.

७ आधीं भर बांगड्या करीं,
मग हात कपाळावर मारीं.

मागच्या बाजूस "सूर सूर तुलसी..." इत्यादी ओळी आहेत.

८ स्वमस्तकीं ज्याचा भार,
तो नर कांहीं करणार.

९ सिद्ध्यर्थ सुखें मरणार,
तो नर कांहीं करणार.

१० कर्तव्याला [redacted] देई पाठ,
तो चाले नरकाची वाट.

११ स्वकीय ज्याला लेखावें,
त्या न कधीं अन्तर द्यावें.

१२ जेथें धर्म जेथें नीति,
तेथें देवांची वसति.

१३ सत्त्वपूर्ण ज्याची वृत्ति,
त्याचीं दैवतें जागती.

१४ पैशासाठीं जीव देई
त्याचा सौदा सस्ता नाहीं.

१५ पैशासाठीं न्याय टाकी
स्वर्गीं शून्य त्याची बाकी.

१६ हृदयांतून न जे बोल
निघती, ते सगळे फोल.

# प्रतिभा.

ती अत्यद्भुत गूढ शक्ति सहसा संचारतां अंतरीं,
मुक्तात्मा गगनीं उडे, बिथरतो इन्द्राभ्र तें पाहुनी;
दैत्यांचें बल देवसत्त्वहि तसें अंगीं चढे त्या क्षणीं;
सायुज्यव विराट पूरुष अहा! देतो स्वयें लौकरी!
स्वान्तीं मंडल जें हिरण्मय तधीं दिव्य प्रभा विस्तरी,
त्याच्या पाजळिती अरांवरि सुरवे देव स्वशस्त्रें जुनीं;
येती दानव मोहुनी दुरुनि जे त्याचेकडे धावुनी,
ते नाशाप्रत पावती झडकरी तेथें पतंगांपरी!
पिण्डीं जाय विलोपुनी विरुनियां ब्रह्मांड हें सत्वर;
शब्दब्रह्म उचंबळून मग जें दाही दिशा व्यापितें,
त्यांच्यांतून भविष्यवाद निघती, ऐकून ते सादर
ब्रह्म्यातें क्षमता नवीन-रचना-कार्य-क्रमीं लाभते!
देवांची जननी प्रसन्न जर का ही शक्ति कोणावर,
नाहीं यांत विशेष, तुच्छ जग हें त्यालागुनी वाटतें!

---

धारवाड,
ता० २८-७-०४

# हरपलें श्रेय
## ( गाणें )

[ उदात्त बुद्धीला संसारांत राम नाहीं. अलौकिक असें जें कांहीं तिला पाहिजे असतें, तें तिच्या हक्काचें असूनदेखील, त्याच्या प्राप्तीकरितां तिला झुरत पडावें लागत नाहीं काय?]

त्रिखंड हिंडुनि धुंडितसें,
न परि हरपलें तें गवसे ! ॥ध्रु०॥

होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळले परोपरी, त्यें
लटूपटीच्या घरदारीं
लटकीच जाहल्यें संसारी;
तेव्हांचें सुख तें आतां
खऱ्या घरींहि न ये हाता !
चुकचुकल्यापरि
वाटे अन्तरीं,
होउनि बावरि
निज श्रेय मी पाहतसें,
न परि हरपलें तें गवसे ! १

प्राप्त जाहलें तें तुजला
तूं मागितलें जें देवाला,
ज्याचें मोल तुवां दिधलें
तेंच तुझ्या पदरीं पडलें —

या वचनें चुकला सौदा
उमगुनि हृदया दे खेदा!
दिलें हिरण्मय,
हातीं मृण्मय;
हा हतविनिमय!
परत मला मम मिळे कसें?
न परि हरपलें तें गवसे! २

किरण झरोक्यांतुनी पडे,
अणूसवें त्यांतून उडे
परोक्षविषयीं मन माझें
विसरुनियां अवघीं काजें;
हयगय त्यांची मज जाची,
परि न मला पर्वा त्याची!
वेडी होउन
बसल्यें अनुदिन
एकच घेउन—
मज माझें लाभेल कसें?
न परि हरपलें तें गवसे! ३

जेथें ओठे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी;
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते;
म्हणुनी विजनीं मी जाल्यें,
स्वच्छन्दें त्या आळविल्यें.
स्वभास दावुनि
परि तें झटदिनिं
जाई लोपुनि!
मग मी हांका मारितसें!

उभाड माझी फिरली,
जग म्हणतें कीं "ही उठली";
जनमर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे?
एक शब्द बोलेन जरी
सकलां कुण्ठित करिन तरी!
अशी आगळी,
परी बावळी
आहें दुबळी;
कांकीं त्याविण सुचत नसे!
न परि हरपलें तें गवसे! ५

स्वपतिचितेवरि उडी सती
संसृतिविमुखी घेई ती;
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो;
मी न करिन का तेंवि तधीं
माझें मज लाभेल जधीं?
मजपासोनी
हाय! हिरोनी
नेलें कोणीं!—
म्हणुनि जीव पारवडीतसें!
न परि हरपलें तें गवसे! ६

---

चिपळूण
ता. २५-५-०५

या पानामागे "तुझे नाम मुखी" हा अभंग आहे.

## हरपलें श्रेय

चिरवर हिंडुनि धुंडितसे
न परि हरपलें तें गवसे ॥ध्रु०॥

होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळले परोपरी,
लटूपरीच्या घरदारीं
लटकीच जाहल्यें संसारी;
तेव्हांचें सुख तें आतां
खऱ्या घरींहि न ये हाता!
चुकचुकल्यापरि
वाटे अन्तरिं,
होउनि बावरि
निज श्रेय मी पाहतसें,
न परि हरपलें तें गवसे! १

स्वपाति चि तेवरि उडी राती
संस्कृति विमुखी घेई ती;
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो.
मी न करिन का तेंवि तधीं
माझें मज लाभेल जधीं!
मज पासोनी
हाय! हिरोनी
नेलें कोणी! —
म्हणुनि जीव पाखडीतसें,
न परि हरपलें तें गवसे! २

~~अरे मिळतें~~
प्राप्त जाहले तें तुजला
तूं मागितलें जें देवाला,
ज्याचें मोल तुवां दिधलें
तेंच तुझ्या पदरीं पडलें.—
या वचनें चुकला सौदा
उमगुनि हृदया दे खेदा!
दिलें हिरण्मय,
हातीं मृण्मय,
हा हृत विनिमय!
परत मला मम मिळे कसें?
न परि हरपलें तें गवसे! ३

स्वपातें

झरोक्यातुनी किरण पडे
अणूंसवें त्यांतून उडे
परोक्षाकडे मन माझें   परोक्षमार्गें विषयीं
विसरूनियां अवधीं काजें!
द्यगय त्यांची मज जाची,
परि न मला पर्वा त्याची!
बेडी होउन,
बसल्यें अनुदिन
एकच घेउन —
मज माझें लाभेल कसें?
न परि हरपलें जें गवसे! ४

जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी,
कारण कांहीं साक्ष तिथें
मम त्या श्रेयाची पटते,
~~म्हणुनी एकलीं जातें~~
म्हणुनी विजनीं मी जात्यें,
स्वच्छन्दें त्या आळवित्यें;
स्वभास दावुनि   भास दावुनी
परि तें सटकुनि   परी तें क्षणीं
जाई लोपुनि   जाय लोपुनी!
फिरुनी हांका मारितसें, = हांका मग मी मारितसें
न परि हरपलें तें गवसे! ५

भीउ-भाउ माझी फिटली,
जग म्हणतें कीं 'ही उठली';
जन मर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे?
एक शब्द बोलेन जरी
सकळां कुंठित करिन तरी,
अशी आगळी,
परी बावळी
आहे दुबळी;
कांकीं, त्याविण सुचत नसे;
न पारि हरपलें तें गवसे! ५

जन म्हणती कीं 'ही उठली',
माझी मर्यादा फिटली;
ती धरुनि कसें तें मिळसें
न असे मर्यादा ज्यातें?
एक शब्द बोलेन जरी
सकळां कुंठित करिन तरी;

अभंग


तुझें नाम मुखीं। ध्यानें तुझें डोळां॥
वृत्ति ह्यां चंचळा। स्थिरावल्या ॥१
चिंता भय दुःखें। अवघी दूर झालीं॥
अनाथांचा वाली। जवळी केला॥२
भिकार या जगीं। इच्छित न मिळे कांहीं॥
म्हणुनी तुझे पायीं। भिक्षां देहीं॥३
केशवसुत म्हणे। देवा दीननाथा॥
तुझे पायीं माथा। वाहियेला॥४

---

सूर सूर तुलसी ससी उडुगण केसव और
अबके कवि खद्योत भये चमकत जोरई गोर

---

(थोडा) पग धरत चिन्ता करत नेकन साहे शोर (गडनऊ)
सुवर्णकु धूंडत फिरे कवि व्यभिचारी चोर.


कोकिल
देवदर्शन
'चंद्रभाट
कयमाष
'अज्ञातांतील ध्वनि.
कुरकुर
पुण्यदर्शन
घुबड.

तिसऱ्या वहीच्या शेवटच्या पानावर लिहिलेले काही शब्द.

# The Star of Constant Love

Two months are well nigh past, my dear,
    Two months are well nigh past,
Since when we two met last, my dear,
    And flew the night so fast!

The night so quickly fled, my dear;
    We wish'd 'twere longer still,
Because, we knew the morn was near,
    When we should fare but ill!

For, then I was to drag my feet
    O'er dreary downs and dales,
And leave thee lonely to repeat
    Thy tearful tender tales!

The thoughts of parting at the dawn
    Then made us, Dear, the dearer,
To warmer hearts together drawn
    We were by love the nearer!

We slowly drew the lattice nigh,
    And saw the Polar Star;
Said with a sigh both thou and I
    "Like that we constant are!"

Indeed, my Love! we constant are,
    Whate'er the space between;
For, that same Star of Constant Love
    Shines on us both serene!

W.C.D.

An Ap

I pluck thee
For, self is
I am a love
I slight my

I pluck thee f
With all thy
And, breathe
"~~I'll worship~~
"I'll serve her

7-12-89. Bom



On getting my

Whenever dar
To drink,
Whene'er hig
To tread
Whene'er my
Can blos
Regarding m
To ~~[illegible]~~ get
Whene'er the
Visits my
To catch its
A hum in
Such are my
But, sweete
To bend me a
And at its

Kalyan.
April 21, 1891.

## To a Poet.

Whenever dark clouds flit apart,
To drink sweet Luna's liquid ray;
Whene'er high dreams wing up my heart,
To tread bright Heaven's Milky way;

Whene'er my wither'd tree of life
Can blossom forth a charming flower,
Regarding not Want's cutting knife,
To get it pearl'd in Fancy's shower;

~~Whene'er the wand'ring honey-bee~~
~~Comes to my bower desolate,~~
1 ~~To catch its song, and try to be~~
~~A song incarnate soon or late;—~~

Such are my wishes ever sweet;
But sweeter far to find a time
To bend low at a Poet's feet,
And, at its source to taste his rhyme

---

Kalyan,
April 21,
1891.

## Flowers from a Grave

Sick of the busy haunts of men,
With wand'ring spent and care,
I sought a cool and quiet glen,
To find some solace there.

Sick of the busy haunts of men,
Though I'd be busy there,
Still, fortune having play'd me false
And dragg'd me to despair,

I sought the calm of solitude,
To muse and absent be,
From thoughts that on the mind intrude
The hive of world to see.

I brush'd along my grass-grown round,
And on a mound espied
A lowly grave with flowers crown'd,
And there at once I hied

To see the grave so overgrown
With flow'rs—was it a joy?
I can't say 'no', although I own
A touch did me annoy.—

I thought—"The heart that slumbers here
Beneath the grave so green,
And feeds the bloom of buds so rare
How sweet it must have been!

"But for the grave ~~the~~ the heart that would
In living music breathe,
Should only send a flow'r a bud
Its ashes to enwreathe!"

As ~~thus~~ I mused my heart did send
An echo of the same,
I did my listening inward bend
When from my heart this came

"Ah! should in me the Poet die,
—And die he likely may
If this ill luck would always cry
Against me in my way,—


"And, should I continue to be
—How hard to speak it out!—
A living tomb of Poesy
Far worse ~~than~~ death no doubt;

e'er, from that tomb of Song
might rise
A few rhym now and then,
To indicate the spot where lies
The spark Promethean:
"Would, then, a passer by halt there
And think of me, as I
Now do about the heart ~~here~~ that here
Entomb'd for aye doth li ?"
No more my heart its voices ga ,
When, o'ercome forth I stept,
And bending o'er the lowly e
I kiss'd the flow'rs and wept!

---

Bombay }
23 -92. }

And when by ch nce the cuckoo free
Comes to me bower desolate,
To catch its ring and t be
A song incarnate soon or la e;—



Gr

They dance
They fr
~~The world~~
~~How full the~~
But m

What can
Which
For men ar
Ah ble

The breezes
And q
Then sunb
And dis

d/21-12-93

# The Waves


They dance upon the sunlit sea,
  They frisk and play and do not mind
The world so full of misery,
  But move on with the sportful wind!

What can they know of woe and wail
  Which, on the hard earth everywhere,
For men and creatures must prevail?
  Ah blessèd they! why should they care?

The breezes call them from the deep,
  And quick they rise with spirits' grace,
The solar beams kiss them to sleep,
  And dimpling smiles the Ocean's face!

M.C.D.

December 21st 1893.



तिसऱ्या वहीच्या शेवटच्या पानावर लिहिलेली सामानाची यादी.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई